


# महाभारत

## खंड २५ : भिष्मपर्व ३

मराठी अनुवाद :

श्री. अशोक कोठारे

# महाभारत

## महाभारत खंड पंचविसावा
## भिष्म पर्व भाग तिसरा

### अनुवाद : अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor, Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2020

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० फेब्रुवारी २०२०**

# अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळया परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बऱ्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे.

मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा पंचविसावा खंड, भिष्म पर्व भाग तिसरा, आपण आता वाचणार अहात, पांचवा दिवस, सहावा दिवस, सातवा दिवस, आठवा दिवस, नववा दिवस, दहावा दिवस, भिष्म शरपंजरी झोपतात, कर्ण भिष्मांना भेटतो आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील  गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळयासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in



ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# भिष्म पर्व भाग तिसरा

## - पांचवा दिवस -

संजय पुढे सांगत असतो, रात्रभर विश्रांती घेतल्यानंतर सहाव्या दिवशी दोनही बाजूच्या फौजा पुन्हा लढण्यासाठी सज्ज होतात. त्यांच्या हालचालीं मुळें मोठा आवाज होत होता. रथ तयार केले जात होते, हत्ती त्यांच्या अंबाऱ्यांसह बांधले जात होते आणि शिपाई त्यांची शस्त्रास्त्रं पाजळत होते. शंख ध्वनी व तुताऱ्या वाजत होत्या. तो युद्धाचा पांचवा दिवस होता. युद्धाच्या तयारीच्या दृष्टीने युधिष्ठीर धृष्टद्युम्नाला बोलतात, "अहो, सरसेनापती, आज मकर व्युह रचना करावी असें मला वाटते. त्यामुळे शत्रूचा पराबव करणे सोपे होईल". त्या प्रमाणे पांडवांचा सरसेनापती धृष्टद्युम्न सैन्याला आदेश देतो. त्याप्रमाणे द्रुपद, धनंजय त्या व्युहात मकराचे डोके बनतात. नकूल व सहदेव डोळे बनतात. महाबली भिम तोंड बनतो व अभिमन्यू, द्रुपदाचा मुलगा आणि घटोत्कच, सत्यकी, युधिष्ठीर त्याची मान होतात. राजा विराट त्याच्या अवाढव्य लष्करासह त्या मकराची पाठ होतो. केकया बंधू डावे पाय होतात व धृष्टकेतू, चेकीतन उजवा पाय होतात. त्यांचे कार्य असते मकराचे सरक्षण करणे. त्याचे मागचे पाय असतात कुंतीभोज व सतनिक, ते त्यांच्या प्रचंड सेनेनिशी सज्ज होतात. त्याला मदत करण्यासाठी शिखंडी असतो. त्याशिवाय सोमक, इरावत शेपटीशी असतात. अशा तयारीने पांडवांची सेना भल्या पहाटे लढण्यासाठी उभी झाली होती. ते त्यांचे झेंडे ध्वजस्तंभावर फडकवून कौरवांवर चाल करून जातात.

पांडवांची व्युहरचना पाहून देवव्रत कौरवांसाठी बगळयाची रचना तुमच्या सैन्यासाठी ठरवतात. त्यामध्ये, द्रोणाचार्य त्याची चोंच असतात, अश्र्वत्थामा, कृपाचार्य त्याचे नेत्र बनतात, महापराक्रमी कृतवर्मन, कंबोजचा राजा आणि वल्हीक त्याचे डोके असतात. सुरसेन, दुर्योधन मान होतात, त्यांच्या भोवती अनेक राजे त्यांच्या फौजा घेऊन तयार असतात. त्यात प्राग्ज्योतिषचा राजा भागादत्त, सल्य, सौवर आणि केकया त्यांना संरक्षण देण्यासाठी तयार असतात. त्यांच्या फौजा बगळयाची छाती होतात. सुसर्मन प्रशस्थलाचा राजा, त्याची सुसज्ज सेना घेऊन डावे पंख झाला होता. तुषर, शक आणि यवन उजवे पंख होतात. चालुक्य उजव्या पंखाला मदत करत होते. श्रृतसेन, सत्यूश आणि सोमदत्ताचे पुत्र डावे पंख पहात होते. युद्धाच्या प्रारंभीची वाद्य वाजू लागताच पांडवांची सेना कौरवांच्या व्युहात जोराने घुसते. पांचव्या दिवसाचे युद्ध सुरू होते. हत्ती हत्तीवर चाल करतात, घोडेस्वार घोडस्वारावर चाल करतात. जसे युद्धाच्या नियमांत असते.

भयंकर युद्ध झडले जाते. पाईक पाईकावर हल्ला करत असतात. अर्जुन, नकूल व सहदेव आणि भिमांच्या संरक्षणाखाली पांडवांचे सैन्य खुलून दिसत होते. तुमचे सैन्य ज्याच्या अग्रभागी आजोबा भिष्म, कृप द्रोण सल्य व दुर्योधन इतरांसह चमकत होते. भिम द्रोणांच्या सैन्यावर हल्ला करतो. द्रोण भिमाला नऊ बाण मारतात. ते बाण लोखंडाचे धारदार होते व ते भिमाच्या पायांवर मारलेले असतात. त्यामुळें संतापलेला भिम त्यांच्या रथाचा सारथी नष्ट करतो. तेव्हां द्रोण स्वतः रथाचे सारथी बनतात. त्यानंतर ते पांडवांच्या सैन्याचा नाश करण्याचा सपाटा लावतात. द्रोण, भिष्म व श्रींजय, केकया पांडवांच्या सैन्याचा संहार करू लागतात. भिम व अर्जुन कौरवांच्या फौजांचा नाश करत असतात. दोनही बाजूचे राजे सुद्धा एकमेकांशी त्यांच्या शस्त्रांनी लढत असतात.

युद्धाचा पांचवा दिवस भाग एकाहत्तरावा संपला.

# युद्धाचा पांचवा दिवस

## भाग बाहत्तरावा

धृतराष्ट्र विचारतात, अरे संजया आता पहा, आमचे सैन्य उत्तम तयारीने लढत आहे. त्यांची व्युहरचना अप्रतिम आहे, म्हणजे त्याला विरोध करणे साधारणपणे सोपे नाही, ते सगळे सैन्य व त्यांचे अधिपती पैशांनी आम्हाला चांगल्या प्रकारे बांधलेले आहेत. ते लष्कर निर्व्यसनी आहे, त्यांच्या मध्ये कोणताही दोष नाही. ते दुर्गुणी नाहीत. ते आमच्याशी प्रामाणिक आहेत. ते आमच्या आज्ञेत असतात, त्यांचे धाडस, हिम्मत अजोड आहे. त्यांची लष्करी शिस्त वाखाणण्यासारखी आहे. ते सगळया प्रकारच्या अस्त्रं शस्त्रं ह्यांने परिपूर्ण आहेत. त्यांचे युद्धकलेतील प्रशिक्षण निर्दोष आहे, त्यांच्याकडे असलेली सगळी साधनं अत्युत्तम आहे. त्याचा प्रामाणिकपणा निःसंशय आहे, त्याची हत्तीस्वारी, घोडेस्वारी, सारथ्य असे जे कांहीं युद्धासाठी लागते ते सगळे अप्रतिम आहे. त्यांना आम्ही चांगला पगार देतो, त्यांची निवड त्यांच्या गुणवत्तेनुसार केलेली आहे, कोणी वशिल्याचे आलेला नाही किंवा केवळ वारसा आहे म्हणून घेतलेला नाही. त्यांच्या नेमणूकीत कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही. त्यांच्या गुणवत्तेच्या वेळोवेळी चाचण्या घेऊन मगच त्यांची नेमणूक होत असते, ते सगळे प्रतिष्ठीत कुळातील आहेत. त्यांचा कधी आमच्याकडून अपमान झालेला नाही. आम्ही वेळोवेळी त्यांच्यावर कृपा करून त्यांची श्रद्धा प्राप्त केली आहे. त्यातील कित्येक ख्यातनाम आहेत त्यांच्या कर्तृत्वासाठी. ते सगळे कुलिन क्षत्रिय आहेत. आमचे सैन्य एकाद्या सागरासारखे आहे ज्यात अनेक नद्या येऊन मिळतात. त्यामुळें आमच्या सैन्यात अनेक जाती व वंशाचे लोक गुण्यागोविंदाने रहात असतात. त्यांना लढण्यासाठी अप्रतिम प्रतीची हत्त्यारे आम्ही दिली आहेत. त्यांना बक्षिशी, मानमराब दिले आहेत, जेणेकरून ते आमच्याशी प्रामाणिक रहातील. अशा गुणी सैन्याला भिष्म व द्रोणांसारखे सरसेनापती लाभले आहेत, त्याशिवाय कृतवर्मन, कृप, दुःशासन, जयद्रथ, भागादत्त, विकर्ण, अश्र्वत्थामा, शकूनी, वल्हीक असे विख्यात सेनानी त्यांचे नेतृत्व करत आहेत. असे असूनही अरे संजया, आमचे सैन्य कापरासारखे जळून जात आहे ह्या युद्धात, त्याचे पटेल असें कोणतेही कारण मला आढळत नाही. कर्तृत्वात कमी नाही, गुणात कोणी कमी नाही, तरी असें कां होत आहे ते मला समजत नाही. आमचे सैन्य तुलनेने फार मोठेसुद्धा आहे. युद्धशस्त्राच्या अंदाजाप्रमाणे पाहिले तर आमची सरशी व्हावयाला पाहिजे परंतु, प्रत्यक्षात असे दिसते कीं, आमची पिछेहाट होत आहे. मला आठवते, विदूर जे सांगत होते ते सगळे योग्यच होते. परंतु, माझा नालायक मुलगा त्यांचे मानत नव्हता. मोठे नावाजलेले ऋषी व कोणीही जाणकार ह्या पराजयाचे कारण सांगू शकणार नाहीत, युद्धशास्त्राच्या तत्वाप्रमाणे हे मान्य करावे लागेल. एकच स्पष्टीकरण होऊ शकते कीं आमचे भाग्य कमी पडत आहे. कोणी

कितीही गुणवान असो, जर त्याचे गतकर्म त्याला साथ देत नसेल तर तो अपयशी ठरतो असें जे ऋषी सांगतात तेच खरे असे म्हणावे लागेल. कारण अरे संजया, आपल्या गतजन्माच्या कर्मानुसार आपल्या ह्या जन्माचे भाग्य ठरत असते. आमच्या सगळयांच्या गतकर्मात जे खोटे काम झाले त्यामुळें आज आम्हाला असे दुर्भाग्य प्राप्त होत आहे. दूरदृष्टी असलेले जाणकार जे सांगत होते त्याची प्रचीती मला येत आहे.

युद्धाचा पांचवा दिवस भाग बाहत्तरावा संपला.

# युद्धाचा पांचवा दिवस

## भाग त्र्याहत्तरावा

संजय त्यांना उत्तर देतो, "तुम्ही कांही म्हणा परंतु, ह्यात तुमचा मोठा दोष आहे हे मान्य करावे लागेल. प्रत्येक वेळी भाग्याला दोष देऊन पळवाट काढणे कितपत शहाणपणाचे आहे असे म्हणावे लागेल. हे सगळे तुम्ही टाळू शकत होता पण तुमच्या पुत्रप्रेमामुळें ते तुम्ही केले नाही. ह्यात भाग्य कोठे येते"? दुर्योधन पांडवांशी सतत चुकीचा वागत होता ते माहित असतांना तुम्ही त्याला विरोध न करता त्याकडे दुर्लक्ष करत होता त्यामुळें तुमची मुलं बिघडत गेली. आपल्या कर्तव्यातील दोषांना स्वीकारण्यास तुम्ही तयार नाही, हेच ह्या मागील कारण आहे. तुमच्या आग्रहाखातर युधिष्ठीर द्युताला बसला जर तुम्ही तसा आग्रह केला नसता तर हे सगळे सुरूच झाले नसते. तुम्ही जे पाप केले पांडवांशी दुष्टपणा करून त्याची कटू फळं आता भोगत अहात. म्हणून तुम्ही शांत व्हा व मी युद्धाच्या गोष्टी सांगत आहे त्या ऐका. तुमच्या व्युहाचा नाश करून भिमसेन दुर्योधनाच्या सगळयातच लहान भावाकडे जातो. तो दुःशासन, दुर्विश, दुःसह, दुर्मद, जय आणि जयसेन, विकर्ण, चित्रसेन, सुदर्शन, चारूचित्र, सुवर्मन, दुष्कर्ण आणि कर्ण ते सगळे भिमाला घेरत असतात. ते एकमेकांना सांगतात, अरे, मी भिमाला मारणार, असें बोलत असतात. भिम मात्र सूर्यासारखा भयंकर संतापलेला आग ओकत जणू, त्याला त्याच्यावर चाल करून येणाऱ्या चुलत भावांची भिती वाटत नव्हती. जसें इंद्राला दानवांनी घेरले तरी तो घाबरला नव्हता. कौरव त्याच्यावर बाणांचा मारा करू लागतात. भिम त्या कौरवांकडे दुर्लक्ष करत त्यांचे इतर अनेक नामचन राजे मारत असतो. ते राजे हत्तीवरून व घोड्यावरून लढत होते. त्यानंतर तो गदा घेऊन कौरवांना मारण्यास निघतो. ते पाहून धृष्टद्युम्न द्रोणांना सोडतो व शकूनीला मारण्यासाठी तेथे जातो. तो पहातो कीं भिमाचा रथ रिकामा आहे व त्याचा सारथी नुसता बसला आहे, त्याला काय झाले ते समजत नाही कीं, भिम कोठे गेला? ते बेचैन होतो. तो अशोकाला विचारतो, "भिम जो मला प्रिय आहे तो कोठे दिसत नाही"? अशोक त्याला उत्तर देतो, "मला येथे रथाबरोबर थांबायला सांगून भिम कौरवांच्यात गदा घेऊन घुसला आहे. ते मला बोलले कीं, मी येथेच थांबावयाचे आहे. मी त्या जमलेल्या माझ्या चुलत भावांना ठार मारून परत येत आहे". ते ऐकून धृष्टद्युम्न त्याला सांगतो, "मी जगण्यात कांहींच अर्थ नाही जर एक पांडव अडचणीत सापडला, मी भिमाच्या मागे जात आहे, माझ्या क्षात्रतेजाचा काय उपयोग आहे. जर पांडवांना समजले कीं, मी रणभूमीत असतांना भिमाला कांहीं इजा झाली तर ते कसे चालेल. मी भिमाला सोडणार नाही, भिम एकटा

त्या रणधुमाळीत घुसला आहे, इंद्र मला माफ करणार नाही जर मी माझ्या दोस्ताला अशा प्रकारे रणात एकटा सोडून राहिलो. म्हणून मीसुद्धा त्याच्या मागे जात आहे". असें बोलून तो योद्धा भिमामागे त्या रणांगणात शिरतो. भिमाने गदेने ठार मारलेल्या हत्तींच्या ढिगाऱ्याच्या मागांने तो भिमाला शोधत असतो. अखेरीस तो भिमाला पहातो, तो कौरवांच्या सैन्याचा नाश करत असतो त्याच्या गदेच्या मदतीने. सगळे मरणारे सैनिक मोठ्या मोठ्याने ओरडत असतात. ते होत असतांना कौरवांच्या आणखीन एका फौजेने भिमाला घेरले व त्याच्यावर बाणांचा वर्षाव ते सुरू करतात. सर्वांगात बाण घुसलेले व रक्ताने माखलेला तो पंडुपुत्र त्याच्या गदेने शत्रूंचा संहार करतच असतो. गदा हातात असलेला तो यम साक्षात वाटत होता. धृष्टद्युम्न भिमाला त्याच्या रथात घेतो व तेथून निघतो. त्याच्या अंगात घुसलेले बाण तो काढतो, त्याला मिठी मारतो. ते होत असतांना तुमचा मुलगा दुर्योधन तेथे येतो व मोठ्याने बोंबलून त्याच्या सागत असतो कीं, "हा द्रुपदाचा बदमाष मुलगा भिमाला मिठी मारत आहे, आपण सगळे त्या दोघांना तशा स्थितीत मारून टाकू. त्यांच्या ज्येष्ठ भावाच्या आज्ञेमुळें तुमचे मुलगे त्यांची हत्यारे उंच धरून धृष्टद्युम्नावर चाल करतात. ते तुमच्या बाजूचे शूर योद्धे त्यांची धनुष्ये सज्ज करत द्रुपदाच्या मुलावर हल्ला करतात. त्या हल्ल्याने अजिबात न घाबरता तो तुझ्या मुलांवर प्रतीहल्ला करतो. धृष्टद्युम्न प्रमोहन नांवाचे अस्त्र काढतो, जे इंद्राचे खास अस्त्र आहे, त्याच्या प्रभावामुळें तुझी मुलं शुद्ध हरपल्यासारखे इकडेतिकडे पहात रहातात. नंतर ते कांहीं न समजल्यासारखे तेथून निघून जातात. कांहीं तेथेच मूर्च्छित होऊन पडतात. त्यावेळी दुसरीकडे द्रोण द्रुपदाला भिडतात. द्रोण व द्रुपदांचे जुने वैर प्रज्वलित होते. ते दोघे एकमेकांना बाणांनी जखमी करतात. जखमा सहन न झाल्याने, द्रुपद रणभूमी सोडून जातो. द्रोण त्या द्वंद्वात जिंकल्यामुळें त्यांचे शंखू मोठ्याने वाजवतात. ते ऐकल्यावर सगळे सोमक घाबरून जातात. द्रोणांना समजते कीं, कौरवांच्या मोठ्या सेनेला धृष्टद्युम्नाने प्रमोहन अस्त्राने बेहोष केले आहे, ते त्या दिशेने कूच करतात. तो धृष्टद्युम्न व भिमाला तेथून निघून जातांना पहातो. प्रमोहन अस्त्राची प्रभाव कमी करण्यासाठी प्रज्ञात नांवाचे अस्त्र वापरतो. त्याने तुमचे भोवळ येऊन पडलेले पुत्र शुद्धीवर येतात. ते पुन्हा युद्ध करण्याच्या मनस्थितीत येतात. ते भिम व धृष्टद्युम्नाच्या मागे निघतात. युधिष्ठीर भिम आणि धृष्टद्युम्नाच्या गायब होण्यामुळे फार चिंतीत होतो व अभिमन्यूला आज्ञा करतो कीं तो कांहीं सज्ज सैनिक घेऊन भिम कोठे गेला ते शोधण्यास जावे. त्याप्रमाणे ते निघतात. अभिमन्यू व त्याचे सैनिक शोधासाठी निघतात जेव्हा सूर्य मावळतीकडे सरकत होता. अभिमन्यूच्या नेतृत्वाखाली कैकेया, द्रौपदीची मुलं, धृष्टकेतू असे सगळे धृतराष्ट्राच्या सैन्यात चंचूप्रवेश नावाच्या व्युहाने घुसतात. त्या घुसण्यामुळें तुझ्या फौजात घबराट पसरते. नुकतेच भोवळ आलेले ते कौरवांचे सैन्य त्या नवीन हल्ल्याने जास्तच बावचळून जातात.

अभिमन्यूचे सैन्य त्या तुझ्या घाबरलेल्या सैन्यातून भिम व धृष्टद्युम्नाला शोधत जातात. भिम व पांचालपुत्र अभिमन्यूला येतांना पाहून जास्त उत्तेजित होतात. ते त्यांच्याकडे द्रोण येतांना पहातात व तुझ्या मुलांना न मारण्याचे ठरवतात. भिम कैकयांच्या रथात चढतो व द्रोणांवर चाल करण्यासाठी निघतो. द्रोण खाल्लेल्या अन्नाला जागून पांडवांवर बाणांचा वर्षाव करू लागतो. धृष्टद्युम्न द्रोणांवर बाणाचा मारा करत असतो. त्या द्वंद्वात द्रोण पुन्हा एकदा धृष्टद्युम्नाचा तिरकमटा मोडून टाकतो आणि त्यांचे घोडे मारून टाकतो. धृष्टद्युम्न अभिमन्यूच्या रथात चढतो. अशारितीने द्रोण भिमाच्या नजरेसमक्ष पांडवांच्या सैन्याचे मोठे नुकसान करतो. द्रोणांना कोणी आवरू शकत नव्हते. पांडवांचे सैन्य त्यांच्यापासून दूर जाऊ लागते. ते पाहून तुझ्या सैनिकांना फार हर्ष झालेला दिसतो. गुरू फार चिडलेले आहेत हे पाहून तुझे सैनिक द्रोणांच्या स्तुतीचे बोलून मोठा आवाज करतात.

युद्धाचा पांचवा दिवस भाग त्र्याहत्तरावा संपला.

# युद्धाचा पांचवा दिवस

## भाग चौऱ्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, थोड्या वेळांनी दुर्योधनाला शुद्ध येते. तो भिमाला पुन्हा विरोध करू लागतो. अशारितीने पुन्हा तुझे पुत्र एकत्रितपणे भिमावर बाणांचा मारा करू लागतात. भिम सुद्धा त्याच्या रथात चढतो व तुझ्या मुलांवर चाल करून जातो. दुर्योधन भिमावर हल्ला करतो, भिम त्यामुळें रागात तुझ्या मुलाच्या उरात दोन मोठे बाण मारतो. तरीसुद्धा तुजा मुलगा न डगमगता तसांच उभा राहून भिमाशी लढत असतो. त्या दोघांची चुरस पाहून तुझी इतर मुलं जे सुद्धा मोठे लढवय्ये आहेत, भिमाचा नाश करण्याच्या उद्देशाने त्यात सामील होतात. भिम कांहीं कमी नव्हता. तुझ्या मुलाला चित्रसेनाला भिम एक लांबपल्ल्याचा बाण मारतो. त्यानंतर एक एक करून तुझ्या सगळया मुलांना तो पंडुपुत्र मागे ढकलतो. त्यावेळी युधिष्ठीर त्याच्या कडील बाजू सावरल्यावर भिमाला मदत करण्यासाठी त्याच्याकडे जातो. तो चांगला फौजफाटा देऊन बारा महायेद्ध्यांना अभिमन्यूच्या नेतृत्वाखाली भिमाला मदत करण्यासाठी पाठवतो. ते पाहून तुझा मुलं भिमाला तेथेच सोडून निघून जातात. परंतु, कुंतीची मुलं त्यांना तसे करण्यास विरोध करतात. त्यांना लढाई पूर्ण करावयाची असते.

युद्धाचा पांचवा दिवस भाग चौऱ्याहत्तरावा संपला.

## युद्धाचा पांचवा दिवस

## भाग पंच्याहत्तरावा

संजय पुढे सांगतो, अभिमन्यू व भिम तुझ्या मुलांच्या मागे धावत जातात. त्यांच्यावर जोराचा हल्ला करतात. त्यात तुझ्या प्रिय दुर्योधनाला जबर मार लागतो. आता त्यांना प्रिशताचा मुलगा धृष्टद्युम्न सामील होतो. त्यानंतर एक भयंकर युद्ध सुरू होते. अभिमन्यू विकर्णाचे घोडे मारतो त्यानंतर विकर्णाला जहर जखमी करतो. विकर्ण त्याचा रथ सोडून चित्रसेनाच्या रथात जातो. तो दोघे अभिमन्यूवर चाल करू पहातात. त्यावेळी दुर्जय अभिमन्यूला जखमी करतो. त्या जखमी अवस्थेत अर्जुनाचा मुलगा लढत असतो तुझ्या मुलांशी. तुझा मुलगा दुःशासन केकया बंधूमशी लढत असतो. द्रौपदीची मुलं दुर्योधनाला आव्हान देतात. ते प्रत्येक तुझ्या मुलाला बाणांने बेजार करतात. तुझा मुलगा त्या बाणांच्या जखमामुळे स्वताच्याच रक्तात न्हालेला दिसत होता. महाबली भिष्म पांडवांच्या सामान्य योद्ध्यांबरोबर लढत होता. अर्जुनाच्या गांडीवाने सगळी रणभूमी हादरून जात होती. पार्थ तुझ्या सैन्याचा संहार करत जात होता. किड्यामुंगीसारखे तुझे सैनिक मरून पडत होते. त्या रणभूमीच्या भागात अनेक हत्तींच्या सोंडी कापल्या सारख्या मातीत पडलेल्या दिसत होत्या. असंख्य योद्धे त्यांचे हात छाटलेल्या अवस्थेत मरणाची अपेक्षा करत पडलेले दिसत होते. मरून पडलेले हत्ती डोंगरासारखे दिसत होते. त्यांच्यामुळें त्या भागात फिरणे, रथ चालवणे अशक्य प्राय झालेले होते. असे असूनही तुझ्या व पंडुच्या सैन्यातील क्षत्रिय लढण्यास कंटाळलेले दिसत नव्हते. ते सगळे अंतीम विजयासाठी प्राणपणाने लढतच होते.

युद्धाचा पांचवा दिवस भाग पंच्याहत्तरावा संपला.

# युद्धाचा पांचवा दिवस

## भाग श्याहत्तरावा

संजय पुढे सांगत असतो, तसे युद्ध चालू असतांना सूर्य मावळतीकडे झुकू लागलेला दिसतो. दुर्योधनाची लढण्याची इर्षा वाखाणण्यासारखी होती. तो भिमावर चाल करून जातो. ते पाहून भिम मोठ्यानो ओरडत बोलतो, "ज्या प्रसंगाची मी अनेक वर्षे वाट पहात आहे तो प्रसंग आता घडणार आहे. मी आज तुझा वध करणार आहे. तसे करून मी माझ्या मातेची व द्रौपदीची इच्छा पूर्ण करणार आहे. आम्हाला वनवासात पाठवण्याची शिक्षा आज मी तुला करणार आहे. अरे गांधारीच्या मुला, पांडवांचा द्वेष करण्याची किंमत आज तू मोजणार आहेस. कर्ण व शकूनीच्या नादी लागून तू जे क्रुरकर्म केले आहेस ते आता तुझ्याकडे परत येत आहे. तू आमचा प्रिय मावसभाऊ कृष्ण ह्याचासुद्धा उपमर्द केला आहेस. मूर्खाप्रमाणे तू उलूकाला पाठवले आमच्याकडे, अशा सगळया बादमाषगिरीसाठी तुला आज मी शासन करणार आहे". असे बोलून भिम त्याचे धनुष्य ताणतो व बाण फेकण्यास सुरूवात करतो. दुर्योधनावर तो छत्तीस बाण मारतो जे त्याला वर्मी लागतात. त्यानंतर तो दुर्योधनाचे धनुष्य मोडून टाकतो. त्याचे घोडे मारून टाकतो. त्यानंतर भिम मोठ्याने गर्जना करतो. त्यानंतर भिम तुझ्या मुलाच्या रथावर दिमाखाने उभा असलेला ध्वजस्तंभ तोडून टाकतो. तो कोसळतांना सगळे तुझे सैन्य पहात असते. अशारितीने झेंडा खाली पडणे, हे एकापरीने पराभव झाल्यासारखे समजले जाते. त्यामुळे कौरवांचा जोर कमी होतो. त्यानंतर भिम तुझ्या मुलांवर बाणांचा वर्षाव करू लागतो. तुझ्या मुलाच्या संरक्षणार्थ असलेले हत्तीसुद्धा तो मारतो. त्यावेळी सिंधचा राजा आणि तुमचा जामात जयद्रथ तेथे येतो. तुझा मुलगा त्याला झालेल्या जखमांमुळें रथातच खाली बसलेला होता व भिम त्याच्याकडे पहात हसत होता. जयद्रथ भिमाला मारण्यासाठी सज्ज होतो. त्याचे सैनिक भिमाच्या रथाला चारही बाजूने वेढा देतात. त्यावेळी धृष्टकेतू, अभिमन्यू, आणि केकया मुलं व द्रौपदीची मुलं त्या कौरवांच्या सैन्यावर जोराचा हल्ला करतात. मोठे युद्ध छेडले जाते. अनेक योद्धे त्यात मुंग्यासारखे मरून जातात. तो हल्ला तुझे सैन्य झेलू शकत नाही. सुभद्राचा मुलगा त्याच्या दर्जेदार धनुष्यातून बाणांचा वर्षाव करत असतो. तुझी अनेक मुलं त्यात मारली जातात. ते देव आणि असुरांचे युद्ध वाटत होते. तो विकर्णावर चौदा विषारी बाण फेकतो. विकर्णाचा ध्वजस्तंभ खाली पडतो. विकर्णाचे घोडे, सारथी मारून टाकतो. त्याने मारलेले कांहीं बाण विकर्णाच्या अंगात घुसतात व आरपार जाऊन मातीत घुसतात. विकर्ण रक्त ओकत मातात कोसळतो. ते पाहून तुझी इतर मुलं त्याच्या मदतीसाठी त्याच्याकडे धावत जातात. ते पांडवांच्या सैन्यावर हल्ला करतात. त्यांच्याच

धुमश्च्चक्री युद्ध होते. दुर्मुख श्रृतकर्मानाचा झेंडा पाडतो. त्याचे सारथी व घोडे जायबंद करतो. तशा अवस्थेत श्रृतकर्मन रथात राहूनच एक प्रभावी शर दुर्मुखावर फेकतो. ते शर दुर्मुखाचे चिलखत भेदून त्याच्या अंगात शिरून त्याच्या सकट मातीत जाते. त्यावेळी सुतसोम श्रृतकर्मनच्या मदतीला जातो. श्रृतकर्मन सुतसोमाच्या रथात चढतो. ते तुझा मुलगा, जसत्सेनाच्या मागावर जातात. त्यात श्रृतकिर्ती त्यांना सामील होतो. तुझा मुलगा हसत हसत श्रृतकिर्तीचे धनुष्य तोडतो. ते पाहून सतनिक पंडूच्या मुलांच्या मदतीसाठी मोठ मोठ्याने ओरडत तेथे जातो. तो जयत्सेनाला दहा बाणांने जखमी करतो. जयत्सेन जबर जखमी होतो. त्याच वेळी तुझा मुलगा, दुष्कर्ण रागाच्या भरात सतनिकावर हल्ला करतो. तरी त्याने न डगमगता सतनिक त्याचे आव्हान स्वीकारून दुष्कर्णाचा स्तंभ पाडतो. त्याचा सारथी, घोडे तो मारून टाकतो. त्यानंतर चिडलेला सतनिक दुष्कर्णाच्या छातीत बाण मारतो. तुझा पुत्र दुष्कर्ण खाली पडतो, तो मरतो. त्यावेळी तुझे पांच महाबली योद्धे सतनिकाला घेराव करतात. ते बाणांचा मारा करू लागतात. त्यावेळी पांच केकया बंधू सतनिकाच्या मदतीसाठी जातात. त्यांना येतांना पाहून तुझे मुलगे एकाद्या चवताळलेल्या हत्तीसारखे त्यांच्यावर चाल करतात. त्यात तुझे दुर्मुख, दुर्जय, दुर्मर्शन, सत्रंजय, सतृष हे मुलगे केकया बंधूंवर हल्ला करतात. त्यांच्या एक भयंकर युद्ध सुरू झाले. सिंहासारखे ते ओरडत एकमेकांवर वार करत होते. त्यांचे हत्ती त्यात गुंतले होते त्यामुळें ती लढाई फारच विलक्षण ठरली. ती लढाई फारकाळ चालू शकली नाही कारण सूर्य अस्ताला गेला होता व त्यामुळें रणवाद्यांना त्या दिशीचे युद्ध संपले असल्याचे जाहिर केले होते. त्या दिवशीच्या लढ्याने यमाकडे बरेच क्षत्रिय गेले होते. तेथे त्यांची गर्दी झाली होती. त्यात घोडेस्वार, हत्तीस्वार, पाईक असें बरेच योद्धे होते. त्यासुमारास भिष्माने पांडवांच्या सेनेचे बरेच नुकसान केले होते. त्याच पांचालांचे योद्धे जास्त होते. त्यानंतर भिष्मसुद्धा त्या दिवसाचे युद्ध बंदी जाहिर करतात. युधिष्ठीर भिमाचे व धृष्टद्युम्नाचा माथा चुंबून आपले प्रेम व्यक्त करतो. ते सगळे आपापल्या तंबूत जातात आराम करण्यासाठी.

युद्धाचा पांचवा दिवस भाग श्याहत्तरावा संपला.

## युद्धाचा सहावा दिवस

## भाग सत्त्याहत्तरावा

संजय पुढे सांगत असतो, एकमेकांशी वैर जोपासणारे ते दोन पक्ष रात्रीचा आराम करण्यासाठी आपापल्या तंबू जातात. त्यातले सगळेच रक्ताने माखलेले होते. एकमेकांशी झालेल्या लढ्याबद्दल चर्चाकरत रात्र काढतात. पहाटे पुन्हा ते युद्धासाठी त्यांची चिलखतं नेसून सज्ज होतात. दुर्योधन रक्ताने माखलेला ज्याच्या अंगातून रक्त सांडत होते, मोठ्या विवंचनेत असल्यामुळें त्याच्या आजोबाला विचारतो, "आपले सैन्य मोठे सामर्थ्यवान आहे, त्यांच्या अनेक पलटणी आहेत, त्यांची व्युहरचना उत्तम असते, तरी पांडवांचे योद्धे त्यांना प्रत्येक वेळी कसें पराभूत करून सुरक्षितपणे निसटू शकतात? त्यामुळें माझा गोंधळ झाला आहे. भिम आपल्या मकरात घूसतो जे वस्तुतः अभेद्य होते, आणि मला हल्ला करून जखमी करतो, आम्हाला बेशुद्ध करतो, हे पाहून माझे मन अस्वस्थ झालेले आहे. आपण सामर्थ्यवान व सत्याचे अहात म्हणून माझी विजयी होण्याची इच्छा आपण पुरी कराल असें समजतो. मला पंडूची सगळी मुलं ठार मारावयाची आहेत त्यात आपण मदत कराल अशी अपेक्षा करतो". गंगापुत्र जे महाज्ञानी आहेत, ज्यांची ताकद सगळे जाणतात, व जे दूरदर्शीसुद्धा आहेत, ते सांप्रतच्या युद्धात येणाऱ्या अपयशामुळें अस्वस्थ असले तरी त्याच्याकडे पाहून हसतात व त्याला सांगतात, "मी तुला आश्र्वासन देतो कीं, मी त्यांची व्युहरचना तोडून तुला विजयी करून देईन. तुला आनंदी झालेला मला पहायला आवडेल. खरे आहे कीं, पांडवांचे दोस्त भयंकर आहेत व सहसा हरणाऱ्यांपैकीं नाहीत. त्यांची संख्यासुद्धा बरी आहे. ते महारथी असून अजिबात थकत नाहीत हे त्यांचे विशेष आहे. त्यांची सुडाची प्रेरणा अत्यूच्च आहे. अशा मनस्थितीत असलेले, सहसा हार मानत नाहीत. तरी मी तुझ्यासाठी त्यांचा पराभव करण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करीन. आज तुझ्यासाठी मी माझे जीवन पणाला लावीन व तुझी कामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन. तुझ्यासाठी मी दैत्य सुद्धा मारून टाकीन. मी पांडवांचा पराजय करण्याची कोशिस करणार आहे, केवळ तुझ्यासाठी". दुर्योधन ते आश्र्वासन ऐकून उत्तेजित होतो. तो त्याच्या लष्कराला लढण्याच्या तयारीला लागण्याचे आदेश देतो. त्याच्या आदेशानुसार ते सैन्य ज्यात असंख्य हत्ती, घोडे, रथ व पाईक होते, युद्धासाठी सज्ज होते. ते क्षत्रिय पुन्हा लढण्यासाठी मोठ्या उत्साहाने तयार होत असतात. कौरवांचे सैन्य मोठे रुबाबदार दिसत होते. तुमच्या सैनिकांकडे विविध शस्त्रं होती ती ते लढवय्ये दाखवत होते. उगवता सूर्य त्याची लाल किरणं रणभूमीवर टाकत आहे. त्याप्रमाणे तुमचे सैन्य

रणांगणांवर येऊ लागते. कौरवांचे झेंडे आकाशात सूर्याच्या कोवळया किरणात फडफडतांना चमकत होते. नवीन उत्साहाने ते सगळे लढणार होते. धनुर्धारी धनुष्याचे टणत्कार काढत पुढे सरकत होते. त्याचा मोठा आवाज होत होता. कृतयुगात दानव आणि देवांने समुद्र मंथन केले तेव्हां समुद्रातून जसा भयंकर आवाज निघत होता त्या आवाजाची आकाशातून युद्ध पहाणाऱ्या देव, ऋषी ह्यांना आठवण होते. आपल्या शत्रूचा नाश करण्याच्या आवेशांने ते युद्धासाठी जात होते.

युद्धाचा सहावा दिवस भाग सत्याहत्तरावा संपला.

# युद्धाचा सहावा दिवस

## भाग अठ्याहत्तरावा

संजय सांगत असतो, अहो धृतराष्ट्र तुमच्या मुलाचा उत्साह वाढावा म्हणून भिष्म त्याला कांहीं बोलतो ते सांगतो, "ऐक धृतराष्ट्राच्या मुला, मी व द्रोण, सल्य, कृतवर्मन, अश्र्वत्थामा, विकर्ण, भागादत्त, शकूनी, अवंतीचे विंद व अनुविंद, वल्हिक, त्रिगर्त, मगधाचे सैन्य, बृहद्बल, कोसलचा राजा, चित्रसेन, विविंसती, आणि हजारो तुझे सैनिक जे त्यांच्या शौर्यासाठी प्रसिद्ध आहेत, तुझ्यासाठी लढणार आहेत. ते सगळे देवांनासुद्धा हरवू शकतील असें आहेत. म्हणून मी तुला पुन्हा सांगतो कीं, पांडव अजिंक्य आहेत कारण, त्यांच्या कडे वासुदेव आहे. ते सगळे जाणतात कीं, जेथे वासुदेव तेथे जय असतो. मी माझी पराकाष्ठा करणार तुला विजयी करण्यासाठी पण हे सत्य तू लक्षात ठेव. ते आश्र्वासन ऐकल्यावर दुर्योधनाच्या सगळया विवंचना संपतात. त्याचा आजोबा कांहीं खास तोडगा त्याच्या जखमांवर लावतो त्यांने त्याच्या जखमा माठून येतात. सकाळ होते व आकाश निरभ्र असते, तो पराक्रमी योद्धा भिष्म त्याच्या फौजेची नवीन रचना करण्यात दंग होतो. त्या नवीन रचनेचा नांव आहे मंडल. त्या रचनेनुसार, घोडेस्वारांची मोठी पलटण असते ज्यातील प्रत्येक सैनिक तलवार घेऊन तयार होता. प्रत्येक हत्तीभोवती सात रथ होते त्याला संरक्षण देण्यासाठी, प्रत्येक रथाभोवती सात पाईक होते त्या रथाला संरक्षण देण्यासाठी. प्रत्येक घोडेस्वारापाठी धनुष्यधारी सैनिक होते सात, अशी रचना होती भिष्माच्या संरक्षणासाठी. त्यात तुझा मुलगा चित्रसेन प्रमुख होता. ते सगळे चिलखताने सुरक्षित होते. दुर्योधन त्याच्या रथात बसला होता जणूकाय दुसरा इंद्र असावा. तुझे मुलगे मोठ्या मोठ्याने घोषणा करत होते. त्यात रणवाद्ये वाजत होती, कानठळया बसाव्यात असा गदारोळ उठला होता. मंडल हे अभेद्य व्यूह होते. ज्याची रचना भिष्माने स्वतः तयार केली होती. पांडवांच्या बाजूने युधिष्ठीर रचना करतो, त्या रचनेचे नांव असते वज्र. वज्र रचना पूर्ण झाल्यावर ते योद्धे मोठ्याने रणगर्जना करतात. दोनही बाजूचे लष्कर युद्धाला प्रारंभ करतात. द्रोण राजा विराटावर चाल करतो. अश्र्वत्थामा शिखंडीवर चाल करतो. दुर्योधन स्वतः धृष्टद्युम्नावर जातो. नकूल व सहदेव सल्यावर जातात, विंद अनुविंद इरावर चाल करतात. त्याशिवाय अनेक राजे एकट्या अर्जुनाशी लढू लागतात. भिम हृद्रीकाच्या मुलावर जातो. अभिमन्यू त्वेषाने लढत असतो चित्रसेन, दुर्मर्शन व विकर्णाशी. हिडींबाचा मुलगा, घटोत्कच प्रागज्योतिषच्या योद्ध्यांवर चाल करतो. तसेंच कौरवांचा राक्षस दोस्त अलम्बुशाषी तो दोन होत करत असतो. सत्यकी व धृष्टकेतू भुरिश्रवाला

भिडतात. युधिष्ठीर श्रृतायुषाला आव्हान देतो. चेकितन कृपांशी लढत असतो. इतर कौरव योद्धे एकट्या भिमावर तुटून पडतात.

अर्जुनावर कौरवांचे राजे तुटून पडतात तेव्हां तो कृष्णाला सांगतो कीं, "ते सगळे राजे मी आज ठार मारणार आहे. तो त्रिगर्ताचा राजा, त्याचे बंधू, माझ्या शस्त्राने मरणार आहेत". ते यदू कुळातील आहेत व त्यांची माझ्याशी लढण्याची इच्छा आहे, ती मी आज पूर्ण करणार आहे". असें बोलून तो कुंतीपुत्र त्याचे बाण फेकण्यास सुरूवात करतो. ते राजे अर्जुन व कृष्णावर चहोबाजूने बाणांचा वर्षाव करू लागतात. ते दृष्य पाहून आकाशातील प्रेक्षक जे ऋषी, गंधर्व, यक्ष, अप्सरा, उरुग होते ते नवल करू लागतात. त्यानंतर धनंजय वज्र काढतो. त्याच्या प्रभावाखाली शत्रूपक्षाने सोडलेले सगळे बाण निष्प्रभ ठरतात. त्या वज्रामुळें त्या रणभूमीतील सगळे शत्रूपक्षाचे सैनिक घायाळ होतात. असे होते तेव्हां कौरवाची सेना भिष्माकडे संरक्षण मांगते. भिष्म त्यांना संरक्षण देण्यासाठी तयार होतो. त्यामुळें सगळा गोंधळ उडतो व ती व्युह रचना बिघडते. सैनिक लढाई सोडून इतस्ततः पळू लागतात.

युद्धाचा सहावा दिवस भाग अठ्याहत्तरावा संपला.

# युद्धाचा सहावा दिवस

# भाग एकोणऐंशीवा

संजय सांगत असतो, युद्ध जोर घेत होते. तेव्हां शुशर्मन लढावयाचे थांबवतो. पंडुची मुलं कौरवांचे रथामहारथी मारत असतात. तुझे सैन्य एकाद्या सागरासारखे विशाल दिसत होते. त्यावेळी भिष्म धनंजयावर चाल करून जातो. दुर्योधन पार्थाची चाल पाहून त्याच्या इतर राजांना आदेश देतो कीं, ते सगळे एकत्र येऊन अर्जुनाचा मुकाबला करतील. तुम्ही सगळे भिष्माना संरक्षण द्याल. भिष्म वेगांने अर्जुनाकडे त्याचा रथ नेतो. तुझे योद्धे घाबरत ओरडत भिष्माला संरक्षण देण्यासाठी जाऊ लागतात. अर्जुनाच्या रथात सारथी म्हणून कृष्णाला ते पहातात. त्यांना त्याच्याकडे पहाता येत नाही. त्याच प्रमाणे पांडव भिष्माकडे पाहू शकत नाहीत. ते दोघे वेगळयाच तेजाने चमकत होते. अर्जुनाच्या रथाला ज्यावर कपीमुद्राझळकत होता त्रिगर्ताचे लढवय्ये घेरा टाकतात. त्या सुमारास दुसरीकडे द्रोणांने राजा विराटाला जखमी केलेले असते. त्याचा स्तंभ तोडून टाकतो. विराट नवीन धनुष्य घेतो व प्रतिकार करतो द्रोणाच्या बाणांचा. त्यामुळें तो ब्राह्मण चिडतो, ते विराटाचे सगळे घोडे मारून टाकतो. त्याचा सारथीसुद्धा घायाळ होतो. रथ निकामी झाल्याने राजा विराट रथातून उतरतो व जमिनिवरून लढू लागतो. तेवढ्यात त्याचा मुलगा, शंख येतो त्याला त्याच्या रथात घेतो. ते दोघे भारद्वाजाच्या मुलाशी मुकाबला करू लागतात. द्रोण शंखावर एक विषारी बाण फेकतो त्यांने शंख रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळतो. आपला मुलगा मेला आहे हे विराटाला समजते. तो हिम्मत हरतो व लढाई सोडून जातो. त्यानंतर द्रोण महाबली पांडवांच्या पाठी लागतात. शिखंडी द्रोणांच्या कपाळावर नेम धरून बाण मारतो. तो अश्वत्थामाला सुद्धा बाण मारतो. त्यामुळें तो चिडतो. तो शिखंडीचा रथ उलटवतो. त्याचा रथ निकामी झाल्याने तो महाबली शिखंडी रथातून उतरतो व जमिनीवरून शर मारत फिरू लागतो. अश्वत्थामा त्याला मारण्याचा प्रयत्न करतो परंतु, ते त्याला जमत नाही. द्रोणसुद्धा त्याच्यावर अनेक बाण फेकतो पण ते फुकट जातात. शिखंडी त्याच्या तलवारीने ते बाण उलटवतो. द्रोण अखेरीस त्याला गाठतो व त्याची ढाल व तलवार दोनही तोडून टाकतो. त्यानंतर तो शिखंडाला इजा करतो. शिखंडी हार मानत नाही, तो त्याची तुटलेली तलवार घेऊन अश्वत्थामावर चाल करतो. परंतु, ती तलवार द्रोणांवर फेकतो पण द्रोण ती त्याच्या बाणांने उडवून टाकतो. शिखंडी जखमी झालेला सत्यकीच्या रथात चढतो. सत्यकी त्यावेळी राक्षस अलम्बुषाला बाण मारतो. तो राक्षस त्याचे (सत्यकीचे) धनुष्य मोडून टाकतो. तो सत्यकीला जखमी करतो. सिनीचा नातु सत्यकी अजिबात घाबरत नाही. तो मंत्राने भारलेले ऐंद्र अस्त्र जे त्याला अर्जुनाने शिकवले होते ते काढतो. त्यामुळें तो मायावी राक्षस भस्म होतो. त्यानंतर तो

सत्यकीच्या मागे लागत नाही. त्यामुळें आनंदी होऊन सत्यकी मोठ्याने गर्जना करतो. त्याचा उत्साह वाढतो व तो कौरवांचे सैनिक मारू लागतो. ते पाहून तुझे सैनिक पळू लागतात.

त्याच वेळी धृष्टद्युम्न दुर्योधनाला घेरतो. तरी तुझा मुलगा घाबरत नाही. न घाबरता तो त्याच्यावर बाणांचा मारा करू लागतो. ते पाहून आकाशात असलेले ऋषी त्याचे कौतुक करतात. धृष्टद्युम्न संतापतो व दुर्योधनाचे घोडे मारून टाकतो. दुर्योधन रथ निकामी झाला म्हणून रथातून उतरतो व हातात समशेर घेऊन प्रिशताच्या मुलाकडे धावत जातो. सुवलाचा मुलगा आपल्या धन्याच्या मदतीला धावतो. त्याला त्याच्या रथात घेतो. त्यानंतर धृष्टद्युम्न तुझ्या सैन्याची कत्तल करण्यास सुरूवात करतो.

कृतवर्मन भिमावर चालून जातो. सतवत घराण्याचा अतिरथी योद्धा कृतवर्मन अनेक बाण भिमावर मारतो. भिमसेन त्याच्याकडे हसत हसत पहात त्याचे बाण उलटवतो. कृतवर्मन भिमाला वर्मी बाण मारून जखमा करतो. भिम त्याचे घोडे मारतो. त्याचा रथ उलटवतो. त्याचा ध्वजस्तंभ कोसळतो. भिम त्यानंतर अनेक विविध प्रकारचे बाण त्याच्यावर फेकत असतो. त्यामुळे तो घायाळ होतो. कृतवर्मन पटकन वृशलाच्या रथात चढतो. तेथे सल्याच्या समक्ष भिम त्यांच्यावर चालून जातो. चिडलेला वृकोदर तुझ्या सैन्याचा त्याच्या गदेने यमासारखा संहार करू लागतो.

युद्धाचा सहावा दिवस भाग एकोणऐंशीवा संपला.

## युद्धाचा सहावा दिवस

## भाग ऐंशीवा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, "तू मला बऱ्याच विलक्षण व विलोभनीय द्वंद्वांची माहीती सांगत आहेस. त्या सगळयात तू सांगतोस कीं, पांडव प्रत्येक वेळी जिंकत आहेत. माझे हरत आहेत, ह्याचे कारण काय असू शकते संजया? केवळ दैव ह्याला कारण आहे असें समजावयाचे कां"?

त्यावर संजय राजाला सांगतो, हे सैनिक त्यांच्या कुवतीनुसार व अनुभवा प्रमाणे जास्तीत जास्त चांगले लढत आहेत. परंतु, जसे नद्यांचे गोड पाणी समुद्राच्या खाऱ्या पाण्यात गेले कीं, त्यांचा गोडपणा घालवून बसते त्याप्रमाणे तुझे सैनिक पांडवांच्या बरोबर लढायला गेले किं, त्यांचे शौर्य घालवून बसतात. ते त्यांच्यापरीने खूप मेहनत करतात परंतु, यश येत नाही. म्हणून आपण आपल्या योद्ध्याना दोष देऊ नये. गेल्या पांच दिवसात कित्येक योद्धे यमसदनाला गेले आहेत. ते तुमच्या मुलाच्या पापप्रवृत्तीमुळें घडत आहे. राजे नेहमीच प्रजेचे संरक्षण करत नाहीत, कधी ते त्यांच्या प्रजेच्या नाशास सुद्धा कारणीभूत होत असतात. राजे त्यांच्या व्यक्तीगत महत्वाकांक्षांमुळे प्रजेचा नाशसुद्धा करत असतात. तुझा मुलगा तेंच करत आहे व तुमची मुकसंम्मती त्याला असल्यामुळे तुम्हीसुद्धा त्या पापाचे भागीदार झाला अहात. प्राचीन काळी देव आणि असुरांत जे युद्ध झालेले त्याची पुनरावृत्ती ह्या युद्धात होत असलेली दिसत आहे. अहो राजश्री आता ऐका नीटपणे आज काय झाले युद्धात.

अवंतीचे दोन राजपुत्र महारथी व धनुर्धारी, इरावताशी दोन हात करतात. त्यांच्यातील लढाई महाभयंकर होती. ती पाहून कोणाच्याही अंगावर शहारे उठतील असें ते युद्ध होते. इरावत त्या दोघांना बाणांने जखमी करतो. ते दोघे इरावतला बाणाने जखमी करतात. त्या लढाईत कोणी कमी ठरत नव्हते, त्यावेळी इरावत त्या अवंतीच्या पुत्राचे रथाचे घोडे मारून टाकतो. त्यामुळें गोंधळलेल्या अवंतीपुत्रांचे, अनुविंदचे धनुष्य तो मोडून टाकतो. तो त्याचा रथ सोडून विंदच्या रथात चढतो. ते दोघे मिळून इरावतावर बाणांचा वर्षाव करू लागतात. इरावत कांहीं कमी नसतो, तो त्यांच्या रथावर बाणांचा वर्षाव करतो व तो रथ निकामी करून टाकतो. ते दोघे अवंतीपुत्र रथातून खाली पडतात आणि त्यांचा रथ रिकामा कोठेतरी पळून जातो. तो नागराजाचा नातु इरावत पुढे तुझे आणखीन योद्धे ठार मारत असतो. हिडींबाचा मुलगा भागादत्ताच्या मागे लागतो. भागादत्त त्याच्या हत्तीवर असतो. तेथून तो बाणांचा वर्षाव करत असतो. आकाशात असलेल्या ऋषींना मात्र भागादत्त व घटोत्कच ह्यांतील फरक समजत नव्हता. भागादत्ताच्या

आरोळयांनी घाबरून पांडवांचे सैनिक पळाले पण घटोत्कच हलला नाही. त्यानंतर पांडवांची सेना घटोत्कचाच्या नेतृत्वाखाली भागादत्तावर चालून जाते. भागादत्त भिमाच्या मुलाच्या पायावर बाण मारून त्याला इजा करतो. तो राक्षसांचा राजा त्यामुळें न घाबरता तसांच लढत असतो. त्यामुळें चिडलेला प्रागज्योतिषचा राजा राक्षसावर चौदा भाले फेकतो. ते सगळे भाले राक्षस तोडून टाकतो. त्या नंतर राक्षस भागादत्तावर सत्तर भाले फेकतो. ते सगळे भाले भागादत्त हसत हसत उलटवतो. त्या लढाईत राक्षसाचे घोडे मात्र मरतात. ते पाहून राक्षस भागादत्ताच्या हत्तीवर एक तीक्ष्ण शर फेकतो. भागादत्त त्या शराचे तीन तुकडे करून ते निष्प्रभ करतो. ते झाल्यावर हिडींबाचा मुलगा लढाई सोडून निघून जातो. त्यानंतर भागादत्त पांडवांचे सैन्य मारण्यास सुरूवात करतो. सल्य त्याच्या बहीणीच्या मुलांशी, नकूल व सहदेव ह्यांच्याशी लढत असतो. ते दोघे भाचे त्यांच्या मामाला बाण मारून जेरीस आणतात. सल्याला ते पाहून फार आनंद होतो. त्याला त्याच्या भाचांचे कौतुक वाटते. त्यानंतर सल्य नकूलाचे चार घोडे मारतो. नकूल रथातूबन उतरतो व त्याच्या भावाच्या रथात चढतो. सल्य त्याच्या भाच्यांचे युद्ध कौशल्य पाहून संतुष्ट होतो. त्या भाचांनासुद्धा आपल्या मामाला त्यांचे कसब दाखवावयाला मिळाले म्हणून आनंद होत असतो. नकूल वसहदेव त्यांच्या मामाच्या रथावर अनेक बाण मारत होते पण त्याला मारत नव्हते. सल्य न डगमगता तसांच तेथे रथात थांबला होता. तो त्यांचे कौतुक करत होता. सहदेव मात्र रागाच्याभरात त्याच्या मामावर एक बाण मारतो. तो गरुड प्रकारचा बाण सल्याला जखम करून मातीत पडतो. त्या जखमेमुळें अस्वस्थ झालेला त्यांचा मामा तेथेच रथात बसतो. ते पाहून त्याचे भाचे त्याला त्याच्या रथातून काढतात व आपल्या रथात घेतात. सल्याचा रथ रिकामा इतस्ततः धावत जातो. तो पाहून नेमके काय झाले ते न समजल्यामुळें तुझ्या बाजूंचे लोक चिंता करू लागतात. अशारितीने सल्याला बाद केल्यानंतर तो मांद्रीचे पुत्र आपला आनंद व्यक्त करण्यासाठी शंखनाद करू लागतात. त्यानंतर ते दोघे तुझ्या फौजांवर चाल करून जातात, जसे इंद्र व उपेंद्र दैत्यांच्या सैन्यावर गेले होते प्राचीन काळी.

युद्धाचा सहावा दिवस भाग ऐंशीवा संपला.

# युद्धाचा सहावा दिवस

## भाग एक्याऐंशीवा

संजय पुढे सांगत असतो, सूर्य मध्यान्हीला आला असतांना युधिष्ठीर त्याच्या सारथ्याला त्यांचा रथ श्रृतयुशाच्या रथाकडे नेण्यास सांगतो. त्याच्यावर नऊ बाण मारतो. त्यावर श्रृतयुश उलटवार करून कांहीं बाण युधिष्ठीरावर फेकतो. ते युधिष्ठीराच्या चिसलखतात घूसतात. त्याचे रक्त रणभूमीवर सांडते. तो जखमा झाला होता तरी पुन्हा श्रृतयुशावर बाण फेकतो. ते त्याच्या हृदयाला लागतात. श्रृतयुश खाली पडतो. त्या परिस्थितीत तो राजा पार्थावर बाण मारून त्याचा झेंडा पाडतो. ते पाहून रागावलेला युधिष्ठीर पाहून आकाशात असलेले गंधर्व व राक्षस अस्वस्थ होतात. सगळे ऋषी त्याला शांत करण्यासाठी प्रार्थना करतात. तुझे सगळे योद्धेसुद्धा घाबरून जातात. युधिष्ठीर श्रृतयुशाचे धनुष्य तोडतो. त्याचे घोडे मारून टाकतो. श्रृतयुश त्याचा रथ सोडून युद्धातून बाहेर होतो. तुझे लोक ते पहात रहातात. त्यानंतर यमाचा पुत्र तुझ्या सैन्याचा संहार करण्यास सुरूवात करतो. चेकितन जो वृश्नी आहे, गौतमाच्या रथाला त्याच्या बाणाने घेरतो. शरदवताचा मुलगा कृप चेकितनाला अडवतो. तो चेकीतनाचे धनुष्य तोडतो. त्यानंतर तो त्याचा सारथी घायाळ करतो. चेकितन रथातून उतरतो व गदा घेऊन गौतमाचे घोडे मारतो. त्यानंतर गौतमाचा रथ मोटून टाकतो. जमिनीवर उभा राहून कृप चेकितनावर सोळा बाण मारतो. त्यामुळें चिडलेला चेकितन त्याची गदा कडपाचार्यांकडे भिरकावतो. त्यानंतर कृप त्याची तलवार काढतो व चेकीतनाकडे धावत जातो. त्यांच्यात तलवारीचे द्वंद्व सुरू होते. ते दोघे थकून जमिनीवर पडतात. दोघे निपचीत पडलेले असतात, जणूकाय मेले आहेत. करकर्श ते पाहून चेकितनाला त्याच्या रथात घेतो व शकूनी, तुझा साला, गौतमाला त्याच्या रथात घेतो व ते युद्धभूमीतून जातात.

दुसरीकडे धृष्टकेतू सोमदत्ताच्या मुलाला बाणाने जखमी करतो. ते बाण त्याच्या छातीवर लागतात. तरी तो डगमगत नाही. तेथे तेव्हढ्यात भुरिश्रव येतो धृष्टकेतूला अडवतो त्याचे घोडे मारून. भुरिश्रव आणि धृष्टकेतू ह्यांच्यात लढाई जुंपते. त्यानंतर धृष्टकेतू सतनिकाच्या रथात चढतो. दुसरीकडे चित्रसेन, विकर्ण, दुर्मर्शन अभिमन्यूच्या मागावर असतात. अभिमन्यू त्यांचे घोडे मारतो त्यांना हवालदील करतो पण त्यांना ठार मारत नाही कारण त्यांना ठार मारण्याची प्रतिज्ञा भिमानी घेतली होती. तो त्याना भिमासाठी सोडतो.

त्या युद्धाच्या दरम्यान अर्जुन त्याचे शुभ्र घोडे असलेला रथ घेऊन भिष्माकडे निघतो. कारम त्यांने अभिमन्यूला अडकवलेले असते. तो महाबली योद्धा कृष्णाला विनंती करतो, "अहो हृषिकेषा

आपला रथ तेथे ने जेथे असंख्य रथी जमलेले आहेत. घोडे असे ने कीं, ते आपल्या पलटणीना घेरू शकणार नाहीत". ते ऐकल्यावर माधव, त्या रथींच्या मध्ये नेतो. ते राजे भिष्माला संरक्षण देत होते. अर्जुन त्यांतील राजांना उद्देशून बोलतो, "अरे सुशर्मना, मी जाणतो कीं, तू आमचा जुना शत्रू आहेस व मोठा पराक्रमी आहेस, परंतु, मी आज तुला तुझ्या पितरांकडे पाठवणार आहे". ते ऐकून तो पराक्रमी राजा त्याला कांहीं उत्तर देत नाही. परंतु, उत्तरा दाखल तो तुझ्या मुलांसह असलेल्या अवाढव्य सैन्याला कृष्णाचा रथ घेरण्याचे आदेश देतो. अर्जुनावर चहोबाजूने बाणांचा वर्षाव होऊ लागतो. इतका कीं, सूर्य दिसेनासा होतो. त्यानंतर एक महाभयंकर लढाई होते तुझ्या मुलांत व पार्थात. तेथे पाण्यासारखे रक्त वहात होते.

युद्धाचा सहावा दिवस भाग एक्याऐंशीवा संपला.

# युद्धाचा सहावा दिवस

## भाग ब्यांऐंशीवा

संजय पुढे सांगत असतो. धनंजय ते बाण झेलल्यानंतर एक दीर्घ श्वास घेतो आणि त्याच्या गांडीवाने उलटवार सुरू करतो. प्रतिस्पर्ध्यांचे बाण मोडत, त्यांचे धनुष्य तोडत तो आणि त्या राजाना बाणांनी जखमी करत त्याचा प्रतिकार दाखवतो. त्याच्या प्रतिकारामुळें अनेक राजे मरून पडतात. कित्येकांची डोकी तुटून पडलेली दिसतात. ते पाहून त्रिगर्ताचा राजा पुढे सरसावतो. त्याचे पाहून आणखीन कांही राजे अर्जुनावर चाल करतात. त्यांचे बाणाचे वर्षाव वाढतात. त्या वाढत्या वर्षावामुळे अर्जुनाचा संताप होतो. तो साठ तेली बाण त्याच्या पिछाडीला असलेल्या राजांवर फेकतो व त्यांचा कायमचा बंदोबस्त करतो. अशारितीने त्या साठजणांचा बंदोबस्त केल्यावर त्याला मजा वाटते. तो खूष झालेला दिसतो. त्या राजांच्या फौजांचा चुराडा केल्यानंतर जिश्नू भिष्माच्या सैन्याचा विध्वंस करण्याच्या इराद्याने त्याच्याकडे निघतो. त्रिगार्त राजा त्या साठ राजांचा नाश अर्जुनाने केला हे पाहून पार्थावर चाल करण्यासाठी आगेकूच करतो. त्याला धनंजयाला ठार मारावयाचे असते. त्रिगार्त अर्जुनाकडे जातो आहे ते पाहून शिखंडी त्याला अडवण्यासाठी त्याच्या दिशेने जाऊ लागतो. अर्जुन त्या राजांना त्याच्याकडे येतांना पाहतो व त्यांच्यावर गांडीवाने बाण फेकून त्यांना जायबंदी करतो. त्यानंतर तो भिष्माकडे जात असतांना त्याला दुर्योधन दिसतो त्याच्याबरोबर जयद्रथ व इतर राजे असतात. त्या येणाऱ्या राजांचा बंदोबस्त तो करतो, दुर्योधन व जयद्रथ ह्यांना तो मारत नाही. त्यानंतर तो भिष्माकडे जाऊ लागतो. जिश्नु भिष्माकडे जात आहे ते पाहील्यावर राजा युधिष्ठीर व भिम त्याला साथ देण्यासाठी त्या दिशेने सरकू लागतात. त्यांच्या बरोबर माद्रीची मुलं असतात. ते सगळे न घाबरता त्यांच्या आजोबाला शह देण्यासाठी मोठ्या तयारीने आगेकुच करत असतात. त्याना वाटेत दुर्योधन अडवतो व युधिष्ठीरावर हल्ला करतो. त्याच्या बरोबर असलेले भिम व नकूल आणि सहदेव सुद्धा त्याच्या हल्ल्यात येतात. तो अग्नीबाणाने त्यांच्यावर वर्षाव करतो. त्याच वेळी कृपाच्या बाणांना त्याना सामोरी जावे लागते. त्यात सल्य व चित्रसेन कृपाबरोबर असतात. प्राचीन काळी झालेल्या देव दानव युद्धाची प्रचीती येत आहे, असें आकाशात बसलेले ऋषी हे युद्ध पाहून एकमेकांना सांगत असतात. युधिष्ठीर शिखंडीला पळतांना पहातो जेव्हां भिष्म त्याचे शस्त्र तोडतो. त्याचा फार रांग त्याला येतो. तो शिखंडीला बोलतो रागाच्या भरात, "अरे शिखंडी तू सगळयांच्या समक्ष शपथ घेतली आहेत कीं, तू भिष्माचा वध करणार, मग हे काय होत आहे? तुला तुझ्या शपथेचे भान कसले रहात नाही? तुझ्या कुळाची, वंशाची, प्रसिद्धीची लाज बाळगून वागले पाहिजेस. तू

पहातोस कीं, तो भिष्म त्याच्या शस्त्रास्त्राने आपली सेना उध्वस्त करत आहे. अशा परिस्थितीत तू तुझ्या दोस्तांना सोडून पळून कसा जाऊ शकतोस? तू खरोखरच घाबरलेला दिसत आहेस. तुझ्या चेहऱ्याचा रंग पडला आहे. तेथे धनंजय त्याच्याशी एक भयंकर लढा देत आहे ते तुला माहीत नाही. अशा परिस्थितीत तू घाबरून कसे चालेल"? युधिष्ठीराचे ते कठोर बोलणे ऐकल्यावर आपली चूक झाली ते तो तरूण योद्धा उमगतो व परत फिरतो. तो परत फिरलेला पाहून सल्य त्याला आव्हान देतो. त्याच्या शस्त्रांना तोंड देणे सोपे नव्हते. द्रुपदाचा मुलगा त्या अग्नीसारख्या तळपत्या शस्त्राने घाबरणारा नव्हता. तो त्या हल्ल्याला चोख उत्तर देतो. शिखंडी वरूण शस्त्र घेतो सल्याला रोखण्यासाठी. भिष्म मधल्या काळात युधिष्ठीराचे धनुष्य तोडून टाकतो. त्यामुळे तो यमाचा मुलगा घाबरून जातो. धनुष्य सोडून तो गदा घेतो. भिमसेन त्याच्या मदतीला जातो. भिम त्याच्या मोठ्या भावाला मदत करण्यासाठी जात आहे, ते पाहून सिंधूचा राजा जयद्रथ भिमावर लोखंडी बाणांचा वर्षाव करतो.  ते बाण भिमात चारही बाजूने घूसतात. त्याकडे दुर्लक्ष करत भिम सिंधूच्या राजाचे अत्तारी घोडे मारून टाकतो. भिमाला चालत असल्याचे पाहून तुझा मुलगा चित्रसेन त्याचा रथ घेऊन भिमाकडे जातो. हातातील शस्त्रं वर उगारून, तो भिमाला ठार मारण्याच्या इराद्याने मोठ्यानो ओरडत भिमावर हल्ला करतो. त्याचा तो अवतीर पाहून तुझे सैनिक घाबरून पळून जातात. तो रथ सोडून जमिनीवर येतो. त्याच्या हातात गदा असते. ती फेकलेली गदा रथावर पडल्याने तो रथ मोडला जातो. त्याचे घोडे विस्कळीत अवस्थेत तसेंच तेथे उभे असतात. इतर सगळे लढण्याचे थांबवून त्यांचे द्वंद्व सगळे पहात रहातात. तुझ्या मुलाच्या हिम्मतीकरता तुझे सैनिक त्याची वहाव्वा करत असतात.

युद्धाचा सहावा दिवस भाग ब्यांऐंशीवा संपला.

## युद्धाचा सहावा दिवस

## भाग त्र्यांऐंशीवा

संजय पुढे सांगत असतो, तुझा मुलगा चित्रसेनाला त्याच्या रथात घेतो. त्या रणधुमाळीत भिष्म युधिष्ठीरावर चाल करतो. त्यात श्रींजय त्यांच्या हत्तीसेनेसह तेथे येतात. त्यांना वाटत असते कीं, युधिष्ठीराला भिष्म आता मारणार. परंतु, वस्तुस्थिती तशी नव्हती. तो त्याच्या दोन धाकट्या भावांबरोबर भिष्माला भिडण्याच्या तयारीत असतो. त्याच्या हजार बाणांनी भिष्माला घेरले होते. ते बाण व भिष्माने मारलेले बाण आकाशात किडे फिरत आहेत असे वाटत होते. भिष्म युधिष्ठीराचे सगळे वार परतवत होता मोठ्या शिताफीने. युधिष्ठीर विविध प्रकारचे बाण वापरत होता परंतु, ते सगळे भिष्म परतवत होता. अखेरीस त्या द्वंद्वाला कंटाळून भिष्म युधिष्ठीराचे घोडे मारून टाकतो. युधिष्ठीर त्याचा रथ सोडतो व नकुलाच्या रथात चढतो. भिष्म चिडतो व त्या माद्रीच्या मुलांवर चाल करतो. युधिष्ठीर त्याच्या राजांना आज्ञा करतो कीं भिष्माचा नाश हा आता आपला कार्यक्रम झाला आहे, तेव्हां त्यासाठी एकत्र येण्याचे तो आवाहन करतो. ते जाहिर झाल्याबरोबूर ते राजे त्यांची सगळी सेना भिष्माच्या भोवती गोळा करतात. परंतु ती अशी लढाई दिसते कीं अनेक हरणं सिंहाला घेरत आहेत. भिष्माच्या गर्जनानी ते घाबरत होते. भिष्म त्यांतील राजांना टिपून मारत होता. त्या समरात सगळया सैनिकांत एकच गोंधळ उडाला होता. कोणी कोणाला मारावयाचे ते समजत नव्हते. त्यामुळें त्यांची व्युहरचना मोडली गेली. सगळेजण सैरावैरा पळत होते. कांहीं मार चुकवण्यासाठा तर कांहीं पळून जाण्यासाठी असे ते इकडेतिकडे धावत होते.

शिखंडी भिष्माला आव्हान देतो पण भिष्म त्याला स्त्री समजत असल्याने त्याच्या आव्हानाला नजरअंदाज करत श्रींजयांच्या वर चाल करून जातो. श्रींजय तो त्यांचा सन्मान समजतात व मोठा जल्लोष करतात. ते रणवाद्ये, शंखवाद्ये वाजवू लागतात. त्या लढाईत हत्ती व घोडे एकमेकांत गुंतल्यामुळें रथ चालवणे दुरापास्त झाले होते. सूर्य मावळतीकडे झुकला होता. धृष्टद्युम्न व सत्यकी तुझ्या सैन्याची धुळधाण करत असतात. त्यांच्या धारदार बाणांनी सगळे तुमचे सैनिक घायाळ झालेले दिसत होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात संहार होत होता परंतु, दोनही बाजूचे क्षत्रिय हटत नव्हते. जो तो आपापल्या कुवतीनुसार लढत होता. मारले जाणारे तुझे सैनिक मोठ्याने ओरडत होते, त्यांच्या किंकाळया ऐकवत नव्हत्या. त्यामुळे चिडलेले अवंतीचे राजपुत्र धृष्टद्युम्नाच्यावर चाल करतात. त्यांच्या हल्ल्याने त्याचा रथ बिघडतो तेव्हां तो शूरयोद्धा त्याचा रथ सोडून सत्यकीच्या रथात चढतो.

युधिष्ठीर एक मोठी फौज घेऊन अवंतीच्या मुलांवर चालून जातो. त्यांना चारहीबाजूने घेरून त्यांच्यावर मारा होत असतो. अर्जुन तुझ्या बाजूचे इतर राजे मारून टाकतो. द्रोण तुझ्या मुलासाठी कांहींही करण्यास सदैव तयार असतात ते पांचालांवर हल्ला करतात. आता सूर्य पश्चिमेकडे जास्त उतरत असतो. त्याचे बिंब लालबुंद झाले होते. दुर्योधन अजून लढण्याच्या मनस्थितीत होता पण अंधार दाट होत होता. दिवसभर लपलेले कोल्हे, लांडगे, गिधाडं असे हिंस्र प्राणी मेलेल्या माणसांवर तुडून पडत असलेले दिसत होते. ती रणभूमी भयंकर दिसत होती. रक्ताच्या नद्या वहात होत्या. त्यात अनेक मुडदे वहात जातांना दिसत होते. प्रेतं खाणारी राक्षस, पिशाच्च जमू लागली होती. त्यांना त्या मांसाची भूक लागली होती. कांहीं ठिकाणी ते आधीच मेलेल्यांचे मांस खेचून काढत खाण्यास सुरूवात केली होती. गिधाडं सावकाशपणे आकाशातून खाली उतरत होती. रात्रभरात ते सगळे मृत लोक, घोडे आणि हत्ती सकाळ पर्यंत सफाचाट होणार होते. कित्येक पिशाच्च जमिनीवरून वहाणारे रक्त चाटत होती. त्या सहाव्या दिवशी अर्जुनाने शुशर्मनाचा पराभव केला होता. युद्ध संपल्याची वाद्ये वाजू लागली दोनही बाजूंची त्यामुळें सगळे आपापल्या तंबूत जात होते. भिमाने दुर्योधनाचे अनेक योद्धे ठार मारले होते त्या खूषीत तो त्याच्या तळावर जात होता. भिष्माचा घेराव करून तुझे सेनानी व इतर पदाधिकारी त्यांच्या घराकडे जात असतात. त्याच प्रमाणे सत्यकी, धृष्टद्युम्न, त्यांचे सैन्य त्यांच्या तळाकडे नेत असतात. उद्या कसे लढावयाचे त्यावर चर्चा करत दोनही पक्षाचे योद्धे गप्पा मारत असतात. अंगात धुसलेले बाण शर काढण्यात व त्यावर औषधी लावण्यात कांहीं गुंतलेले होते. आज सहाव्या दिवशी दोनही बाजूचे सैन्य संख्येने कमी झालेले होते कारण अनेक योद्धे आता यमाच्या घरी गेलेले होते. ब्राह्मण त्यान जखमी सैनिकांसाठी मंत्रविधी करून त्याना उद्याच्या युद्धासाठी सज्ज होण्यात मदत करत होते. भाट योद्ध्यांचे कौतुक करत होते. योद्ध्यांच्या मनोरंजनासाठी खास व्यवस्था होत्या. कांहीं शांतपणे मेलेल्यांच्या आठवणीत गपचुप बसलेले होते. कांहीं अश्रू ढाळून आपले दुःख हलके करत होते. अनेक योद्धे त्यांच्या जखमांमुळें कण्हत होते. आता कोणी युद्धाच्या गोष्टी करणार नव्हते. सगळे शांत झाले होते.

युद्धाचा सहावा दिवस भाग त्र्यैऐंशीवा संपला.

## युद्धाचा सातवा दिवस

## भाग चौऱ्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, रात्रभर पूर्ण विश्रांती घेतल्यानंतर ते दोनही पक्षांचे राजे सुरू होणाऱ्या दिवसाच्या युद्धासाठी सज्ज होतात. दोनही फौजा त्या रणांगणात शिरत असतांना मोठा गदारोळ ऐकू येत होता. माणसांचे व प्राण्यांचे ओरडणे सारखे चालू होते. आकाशात गडगडाट व्हावा असें आवाज होत होते. राजा दुर्योधन, चित्रसेन, विविंसती, भिष्म आणि द्रोण त्यांची चिलखतं नेसून युद्धासाठी तयार होतात. भिष्म मालव फौजा घेऊन रणांगणात जातात. त्यांच्याबरोबर दक्षिणेकडील राजेसुद्धा असतात. भिष्माच्या मागून द्रोण पुलिंद, पराडी, क्षद्रक, मलय ह्यांच्या फौजा घेऊन निघतात. त्यांच्या मागून भागादत्त मगध, कलिंग आणि पैशाची (पठाण) असतात. भागादत्ताच्या मागे बृहद्बल, कोसल, मलक, त्रिपुरी, चिंचिलं (चीनी) होते. त्यांच्या मागून त्रिगर्त, प्रिशथ्ल, कंबोज, यवन हजारांच्या संख्येने होते. त्रिगर्ताच्या मागून द्रोण त्यांच्या फौजेसह जात होते. त्या मागून दुर्योधन, कृप आणि त्यांचे बंधू होते. त्यांचे ध्वज त्यांच्या स्तंभावर फडफडत होते. ते कौरवांचे सैन्य युधिष्ठीर पहातो. तो त्याच्या सरसेनापती धृष्टद्युम्नला श्रृंगटक नांवाची व्युहरचना करावयाला सांगतो. त्या व्युह रचनेत भिमसेन व सत्यकी आघाडीला असतात. त्यांच्या मागे अर्जुन त्याच्या फौजेनिशी असतो. अर्जुनाचा रथ त्याच्या शुभ्र घोड्यानी सजलेला होता, त्यात कृष्ण सारथी होऊन बसला होता. त्याच्या केंद्रस्थानी युधिष्ठीर होता. त्याला मदत करण्यासाठी माद्रीचे मुलगे होते. ते त्यांच्या फौजांनी सज्ज होते. त्यांच्या मागे अभिमन्यू, विराट, द्रौपदीची मुलं आणि राक्षस पुत्र घटोत्कच अशी व्यवस्था होती. दोनही बाजूचे लष्कर त्यांची रणवाद्ये वाजवू लागली होती. दोनही फौजा एकमेकांकडे तीक्ष्ण नजरेने पहात होत्या, एकमेकांचा अंदाज घेत होत्या. युद्ध प्रारंभाचे शंख नाद होतात आणि दोनही बाजूंकडून बाणांचा वर्षाव सुरू होतो. शत्रूवर फेकलेले धारदार टोके असलेले बाण व शर सूर्याच्या प्रकाशात चमकत असतात. रथ एकमेकांत अडकतात. हत्ती एकमेकांना टक्कर देत असतात, त्यामुळें त्यांच्यावरील अंबाऱ्या व छत्र्या खाली कोसळत होत्या. पुन्हा अनेक मारले जाऊ लागतात. दर दिवशी दोनही पक्षांच्या सैन्याची संख्या कमी होत होती. तलवारीने लढणाऱ्यांच्या तलवारींची पाती सूर्याच्या प्रकाशात चमकत होती. भिष्म त्याचा गडगडाट करणारा रथ घेऊन पांडवांवर  तुटून पडतो.

सातव्या दिवसाचे युद्ध सुरू झाले होते.

युद्धाचा सातवा दिवस भाग चौऱ्याऐंशीवा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग पंच्याऐंशीवा

संजय पुढे बोलतो, भिष्माकडे पहाण्याचे धैर्य पांडवांत नव्हते. इतका त्यांचा आवेश होता. पांडवांचे सैन्य प्रतिविंध्याच्या नेतृत्वाखाली गंगापुत्रावर चाल करून जाते. भिष्माचे लक्ष्य आजा आहे श्रींजय आणि पांचाल. पांचाल सोमकांच्या मदतीने भिष्माचा मुकाबला करत होते. ते असें लढत होते जणूकाय त्यांना मृत्यूची भिती नव्हती. भिष्म पांडवांच्या सैन्यातील हत्तींचे स्वार, घोडेस्वार असें नेमके मारत होता. त्यांमुळे ती जनावरं अस्ताव्यस्तपणे हुंदाळत होती. पांडवांना आता भिष्मापासून वाचवण्यासाठी एकच पांडव दिसत होता व तो आहे भिमसेन. त्यानंतर भिष्म आणि भिम ह्यांच्यात अपेक्षेप्रमाणे लढाई सुरू होते. त्या लढाईत तुझा मुलगा त्याच्या भावंडासह भिष्माना मदत करण्याचा प्रयत्न करत होता. भिम भिष्माचा सारथी मारून टाकतो. त्यानंतर भिम तुझा मुलगा सुनभ ह्याचे डोके कापून टाकतो. ते तुझी इतर मुल, आदित्यकेतू, वव्हसिन, कुंदधर, महोदर, अपराजित, पंडीतक आणि शूर वीर विशालाक्ष पाहू शकत नाहीत. तरी ते भिमावर चाल करून जातात. ते भिमसेनाला जखमी करतात. भिमाला ते अनेक धारदार बाणांने जखमी करत असतात. परंतु, त्याचा भिमावर कांहीं परिणाम झालेला दिसत नव्हता. भिम तुझ्या देखण्या अपराजिताचे मुंडके तोडून टाकतो. नंतर भिम कुंदधराला ठार मारतो. त्यानंतर भिम पंडीतकाच्या वर वार करतो. त्यानंतर भिम विशालक्षाचा वध करतो. त्यानंतर भिम मंहोदराच्या छातीत बाण मारतो. तो मरतो. त्यानंतर तो पंडुपुत्र तुझ्या आदित्यकेतूला ठार मारतो. तुझ्या मुलांची मुंडकी भिम तोडत असतो. त्यानंतर वव्हसिनाला मारतो. त्यानंतर इतर तुझी मुलं जी भिमाला मारण्यासाठी जमली होती ती सगळी तेथून पळून जातात. राजसभेत जसे भिम बोलला होता तसे होत होते. त्याच्या भावांचे होणारे शिरकांड पाहून तुझा मुलगा फार दुःखी होत होता. दुर्योधन जोरांने ओरडून त्याच्या सैनिकांना आदेश देतो कीं ते भिमाला मारून टाकतील. विदूरांने जे सांगितले होते ते प्रत्यक्ष होत आहे त्यावरून तो किती दूरधोरणा आहे ते समजत होते. ज्या प्रकारे भिम कौरवपुत्रांचा संहार करत होता, असें वाटत होते कीं, त्याचा जन्म कौरवांचा नाश करण्यासाठीच झाला आहे. दुःखावेगांने असवस्थ झालेला दुर्योधन भिष्मांना भेटतो. सांगतो, "माझे शूरवीर बंधू भिम मारत आहे. आपली सेना जरी चांगली लढत आहे तरी ती सगळीकडे हरत आहे. आपण आमच्या हिताकडे दुर्लक्ष करत अहात असें वाटते. तुम्हाला मनातल्या मनता जे होते ते चांगले वाटत असावे असे मला वाटते. माझे दुर्भाग्य पहा". दुर्योधनाचे ते कटू बोलणे ऐकल्यावर भिष्माच्या डोळयांत पाणी येते. ते बोलतात, "अरे पुतण्या, मी तुला हे असें होणार

असें आधीपासून सांगत आहे, पण तू व तुझा पिता ते मानत नाहीत. हा संहार होण्यामागे तुझा स्वार्थ आणि लालचीपणा कारणीभूत आहेत हे समजून घे".

संजय पुढे सांगतो, भिष्म पुढे सांगतात, कीं, त्याच्या मूर्खपणामुळें ते स्वतः आणि द्रोणसुद्धा ह्या युद्धाच्या निमित्ताने कालवश होणार आहेत. ती नियती आहे कीं, ज्यांच्यावर भिमाची नजर पडेल ते सगळे तो मरून टाकणार आहे. आता एकच तू करू शकतोस, तुझी सगळी ताकद एकवटून पांडवांशी लढत राहून स्वर्गाचा रस्ता तुझ्यासाठी खुला कर. त्यातच तुझे व तुझ्या भावंडांचे हित आहे. पृथ्वीचे राज्य तुम्हाला आता मिळण्याची सुतराम शक्यता नाही. पांडव जिंकण्यासाठी आले आहेत. त्यांचा दुर्दैवयोग संपलेला आहे. जो तू घडवून आणला होतास. जर ते वनात तपस्या न करते तर ते आज असें विजयी झाले नसते. तुझ्या कुकर्मामुळें पांडवांचे भले झाले आहे. म्हणून आता स्वर्गात जाण्यासाठी तू व तुझे बंधू लढतील तर ते चांगले होईल.

युद्धाचा सातवा दिवस भाग पंच्याऐंशीवा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग श्यांऐंशीवा

धृतराष्ट्र बोलतात, "माझे इतके मुलगे भिम मारत असतांना भिष्म, कृप आणि द्रोण काय करत होते? दररोज माझ्या मुलांची संख्या कमी होत आहे. मला वाटते माझ्या मुलांवर पापशक्तींची छाया पडली आहे. कारण मला दिसते कीं ते शूर असून फक्त मार खात आहेत. आपल्या बाजूला भिष्म, द्रोण, कृप, भागादत्त, अश्र्वत्थामा असें नरकेसरी असून आपण फक्त मार खातो त्याचा काय अर्थ, जर तो नियतीचा खेळ नाही"? ताया नालायक मुलाला सगळ्यांने सांगितले परोपरीने मी विनंती केली, विदूर बोलले, त्याची आई स्वतः त्याला दम भरली तरी त्याच्या बुद्धी भ्रष्ट झालेली तो कोणांचे ही ऐकत नव्हता. त्याचा परिणाम स्वरुप भिम त्यांना एका मागोमाग एक यमाकडे पाठवत आहे. ते सांगत होते तेव्हां त्याचे महत्व मलासुद्धा समजले नव्हते. आमच्या भल्याचा सदैव विचार करणाऱ्या विदूराचासुद्धा माझ्या बदमाष मुलांने कधी विचार केला नाही. त्याचे परिणाम भोगावे लागले तर भिष्माला कशाला तो जाऊन विचारतो? विदूराने त्या द्युताला विरोध केला होता पण मी समजले कीं ते केवळ एक खेळ आहे, परंतु, त्या मागे माझ्या मुलांचा व त्याच्या पाजी मित्रांचा काय डाव होता ते मला कधींच समजले नाही.

दुपारी सातव्या दिवसाची लढाई फारच भीषण झाली. प्रचंड प्रमाणात नरसंहार झाला. ज्याचे वर्णन करणे अवघड आहे. युधिष्ठीराच्या नेतृत्वाखाली धृष्टद्युम्न, सत्यकी, शिखंडी असें नामचंद योद्धे एकज्ञ येऊन भिष्माचार्यावर हल्ला करतात. त्याचवेळी विराट, द्रुपद, सोमक, कैकेया, धृष्टकेतू, कुंतीभोज त्यांना आधार देण्यासाठी जातात. त्याचवेळी अर्जुन, चेकीतन, द्रौपदीची मुलं त्यांच्या फौजा घेऊन दुर्योधनावर चाल करतात. त्याच वेळी अभिमन्यू, घटोत्कच कौरवांच्या इतर सेनेशी लढत असतात. कौरवांच्या फौजा द्रोणाच्या नेतृत्वाखाली पांडवांच्या सेनेचे शिरकण करत होते. द्रोण रागात सोमकांचे, श्रींजयांचे सैनिक यमाकडे पाठवत होते. द्रोण श्रींजयांची कत्तल करत असतांना त्यांचे मोठ्याने किंचाळणे हृदयाला भिडत होते. फक्त दुःख जाणवत होते. भिम त्याच्या जोषात कौरवांचे सैन्य कापत होता. ते करत असतांना त्याला मजा वाटत होती. त्या संहारामुळे रणांगणावर रक्ताच्या नद्या वाहू लागल्या होत्या.

भिम त्यानंतर कौरवांच्या हत्तीदलावर हल्ला करतो. अनेक हत्ती त्यात मारले जातात. हत्तींचे तुटलेले अवयव सगळीकडे पडलेले दिसत होते. सहदेव आणि नकूल कौरवांच्या उभ्या पलटणांवर चाल करतात. त्यांचे घोडे जे दागिन्याने सजवलेले होते ते मरत असतात. त्यांचे अवयव तुटून

पडलेले दिसतात. अनेक अश्व शेवटचा श्वास घेत जमिनीवर पडलेले दिसत होते. तुटलेले रथ, झेंडे, स्तंभ असें बरेच इतस्ततः विखूरलेले होते. भिष्म आणि द्रोण पांडवांच्या बाजूचे मोठे नुकसान करत होते. त्यात कृप आणि अश्ववत्थामा, कृतवर्मन भर घालत होते. जसे पांडवांचे नुकसान होत होते त्याच प्रमाणे तुझ्या बाजूचेसुद्धा कमालीचे नुकसान होत होते. त्यामुळें पांडव खूप चिडलेले दिसत होते.

युद्धाचा सातवा दिवस भाग श्यांऐंशीवा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग सत्त्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, अशारितीने दोनही बाजूंचे शिरकाण होत असतांना त्यात सुवलाचा मुलगा शकूनी पांडवांवर चाल करून जातो. हृदिकाचा मुलगा सुद्धा पांडवांवर आक्रमण करतो. कंबोज देशामे उत्तम घोडे त्याच्या फौजेत असतात. त्याशिवाय पांच नद्यांच्या प्रदेशातील मर्द अरठ्ठ, मही व सिंधू तसेंच वनायूचे गोरे लोक त्यांच्या फौजांत होते. त्यांचे घोडे तित्री जातीचे आहेत. त्यांच्याशी मुकाबला महाबली इरावत, अर्जुनाचा पुत्र करत असतो. कौरवांची ती फौज त्याच्या सैन्याला भिडते. अहो राजर्षी धृतराष्ट्र, अर्जुनाला नाग राजपुत्रीपासून इरावत झाला होता. तो पांडवांच्या बाजूने लढत होता.

धृतराष्ट्र विचारतात, "अरे संजया हा इरावत कोण ते मला सांग". संजय सांगतो, नाग कन्येचा पती गरूडाने मारला होता. त्यावेळी मी असहाय्य झाली होती. तिला पुत्र नव्हता. तेव्हा राजा ऐरावत नागांचा अधिपती ती अर्जुनाला दान करतो. पार्थ तिला पत्नी म्हणून स्वीकारतो. तो त्याच्या आईच्या संरक्षणाखाली नागांच्या राज्यातच लहानाचा मोठा होतो. तो जन्मताच अनेक विद्या व शस्त्र ह्यांत प्रवीण होता. त्याला जेव्हा समजते कीं, त्याचा पिता स्वर्गात शस्त्रविद्या संपन्न करण्यासाठी गेला आहे, तो गुणी पुत्र अर्जुनाला भेटतो व हात जोडून स्वताची ओळख करून देतो. तो त्याच्या पित्याला स्मरण करून देतो कीं तो कोणत्या परिस्थितीत जन्मला होता. त्यानंतर तो त्याच्या आईला अर्जुनासमक्ष आणतो. ते पाहून अर्जुन त्याला आनंदाने मिठी मारतो. इरावत अर्जुना सारखाच दिसत असतो. त्यानंतर ते दोघे स्वर्गात एकत्र रहातात. त्याचे पुढचे सगळे शिक्षण तेथेंच होते. जेव्हां युद्ध सुरू होणार असें समजते, तेव्हा तो पांडवांच्या बाजूने लढण्यास स्वर्गातून आलेला होता. इरावताचे युद्धकौशल्य अप्रतिम होते. त्याच्या हालचाली अत्यंत चपळ होत्या. शकूनीचे सैन्य चांगलेच कापले गेले ते पाहिल्यावर तो धूर्त उरलेले सैन्य घेऊन काढता पाय घेतो. गांधार राजाचे सहा मुलगे, गय, गवाक्ष, वृषल, चर्मवत, अर्जव, आणि शुक त्यानंतर त्यांच्या नवीन सैन्यासह पांडवांवर पुन्हा हल्ला करतात. त्यांची लढण्याची ताकद मोठी होती. सहसा हरणारे वाटत नव्हते. त्यांना पुन्हा येतांना पाहून तो इरावत त्याच्या हुशार लढवय्याने आदेश देतो कीं कांहीं करून ह्या गांधारच्या शूरांना ठार मारावयाचे. त्यांचे सैन्य मोठ्या हुशारीने तयार होतात. आपले सैन्य हरवले जात आहे ते पाहून ते गांधार वीर इरावतावर थेट चालून जातात. इरावताला त्यांच्या भाल्याने जागोजागी जखमा झालेल्या होत्या. त्यात तो क्षत्रिय खुलून दिसत होते. इरावत संतापतो व त्याच्या शत्रूंवर जोराचा हल्ला करतो. त्याची तीक्ष्ण धार असलेली तलवार हातात

घेऊन तो रथातून उतरून त्यांच्यावर लढण्यासाठी पुढे होतो. परंतु, ते त्याला तोंड देतात. इरावत पायी होता व ते गांधारचे घोड्यावर होते, त्याचा फायदा घेऊन ते इरावताला कैद करण्याच्या उद्देशाने घेराव घालतात. इरावत त्याच्या तलवारीने गांधार पुत्राचे हात पाय व घोडे कापून टाकतो. ते त्या स्थीतीत जमिनीवर पडतात. फक्त वृषल जखमा झाल्यातरी जीवानिशी सुटतो.

दुर्योधन त्या गांधारच्या राजपुत्रांना खाली पडलेले पाहून संतापतो. तो राक्षस सेनापती ऋष्यसिंगाचा पुत्र अलमवुषाला त्याच्यावर जाण्यास सांगतो. पहा त्या इरावताने त्याची मायावी ताकद वापरून आपल्या सैन्याची काय दशा केली आहे. तू सुद्धा तुझ्या मायावी शक्तीने त्यांचा बिमोड केला पाहिजेस. राक्षस त्यावर ते करण्यासाठी पुढे सरकावतो. अर्जुनाच्या मुलास तो मारणार असतो. त्याच्या बरोबर त्याचे सैन्य असते. इरावताला त्याचा अंदाज येतो तो आणखीनच त्वेषाने त्या राक्षसांवर चाल करून जातो. राक्षस त्याची मायावी शक्ती वापरण्याचे ठरवतो. तो मायावी राक्षस सेना तयार करतो ज्यांच्या हातात अनेक प्रकारची शस्त्रं होती. इरावताला ते मायावी आहेत हे समजते व तो सुद्धा त्याची भ्रमसिद्धी वापरून त्या खोट्या सेनेचा नाश करतो. ते पाहिल्यावर अलमवुष इरावतावर त्वेषाने जातो. तो एक भयंकर रुप धारण करतो. त्याला वाटते कीं, त्यामुळे अर्जुनाचा मुलगा घाबरून जाईल. परंतु, तो न घाबरता उलट प्रतिवार करण्यासाठी पुढे होतो. ती भ्रमसिद्धीची लढाई पाहून आकाशातील ऋषी प्रसन्न झाले होते. कांहींतरी वेगळे पहायला त्यांना मिळाले होते. आता राक्षसांनी गरुडाचे सोंग घेतले होते. त्या रुपात तो राक्षस उरावताला घाबरवण्याचा प्रयत्न करतो. ते पाहून इरावत थोडा बावचळतो. अशारितीने इरावताचे मुंडके तो कापतो, ते आकाशात तरंगत असते. इरावत मेला हे समजल्यावर कौरवांच्या आघाड्यांत समाधानांचे वातावरण निर्माण होते. त्या दिवशी दोनही बाजूंचे पुष्कळ लोक मारले गेलेले असतात. त्यात किती हत्ती, घोडे गेले त्याचा हिशोब नव्हता. अर्जुनाला अजून माहीत नव्हते कीं, त्याच्या मुलाची अलमवुषाने कपटाने हत्त्या केली आहे. तो त्याच वेळी अनेक राजांची हत्त्या करत होता जे भिष्माला संरक्षण देत होते. त्या दिवशी तुझे व श्रींजयाचे अनेक सैनिक त्यांच्या रक्ताने ती रणभूमी धुऊन काढत होते. कांहींजणाने त्यांची शस्त्रं घालवली होती म्हणून ते हातानेच मारामारी करत होते. त्या दिवशी भिष्म पांडवांची मोठी सेना ठार करून राहीला होता. भिष्म त्या दिवशी इंद्रासारखी लढत होता. त्यात सत्यकीसुद्धा कांहीं कमी नव्हता. द्रोणांचा अवतार त्या दिवशी पांडवांना घाबरवणारा होता. भाज्या चिराव्यात तसें तो पांडवांचे सैनिक कापत होता. दोनही बाजूचे सेनिक अंगात राक्षस, दानव घुसले आहेत असें लढत होते. आकाशातील ऋषी सांगत होते की, अशी भयंकर लढाई त्यांने आधी कधी पाहिलेली नाही.

युद्धाचा सातवा दिवस भाग सत्त्याऐंशीवा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग अठ्ठ्याऐंशीवा

धृतराष्ट्र बोलतात संजयाला, "मला सांग अरे संजया, इरावत मेला हे जेव्हां त्या शूरवीर पांडवांना समजले तेव्हां ते काय करतात"?

संजय सांगू लागतो, इरावताला ठार मारले ते पांडवांना समजते. तेव्हां घटोत्कच राक्षस मोठ्याने किंचाळतो. पृथ्वी जिचे वस्त्र आहे सागर थरकापून उठते. सर्व सैनिकांची हृदयं धडधडू लागतात. पांडव दुःखी होतात. सर्व योद्धे लढण्याचे थांबवून जागच्या जागी गप्प उभे रहातात. घटोत्कच हातात समशेर घेऊन त्याच्या मायावी राक्षस सेने सह युगांतात जसे घडावे तसे होते. दुर्योधनाचे सैन्य त्याला घाबरून पळून जाते तेव्हां स्वतः दुर्योधन घटोत्कचाला सामोरी जातो. त्याच्या हातात त्याचे धनुष्य होते व त्याच्या समर्थकांत होते वंगचे हजारांचे सैन्य. दुर्योधनाला येतांना पाहून घटोत्कचाला जास्त क्रोध होतो. त्यानंतर राक्षसांचे सैन्य व दुर्योधनाचे सैन्य ह्यांत लढाई सुरू होते. ती भयंकर होती, पहाणाऱ्याच्या अंगावर कांटा उभा रहावा असें ते युद्ध होते. त्यायुद्धात सर्व प्रकारची शस्त्रं वापरली जात होती. जे हातात येईल ते घेऊन राक्षस दुर्योधनाच्या टोळींवर घसरले होते. दुर्योधनाच्या हत्तीदलाचा पूर्णपणे सत्यानाश राक्षसांनी केला होता. दुर्योधनाचे लोक राक्षसांवर बाणांचा वर्षाव करत होते. परंतु, त्याचा फारसा परिणाम होत नव्हता. दुर्योधनाने तरीसुद्धा त्यांचे चार प्रमुख राक्षस, वेगवत, महारुद्र, विद्युजिव्ह आणि प्रमथीन ह्यांना यमाकडे धाडतो. त्यावेळी भिमपुत्र तुझ्या मुलाला बोलतो कीं, तो आज मातापित्यांच्या ऋणातून मुक्त होणार आहे. तो त्या तुझ्या पुत्राला त्या घटणांची आठवण करून देतो जेव्हां त्याच्या सावत्र मातेला, कृष्णाला कौरवांनी द्युताच्या वेळी भर सभेत अपमानित केले होते. त्या आणि अशा अनेक अपकर्मांच्या बदल्यात मी तुला शासन करणार आहे. तुमचा जामात सिंधचा राजा त्यांनेसुद्धा माता द्रौपदीचा उपमर्द केला होता त्या सगळया पापांचा वचपा मी आज काढणार आहे. असे बोलून तो त्याचा अवाढव्य तिरकमटा घेतो व बाणांचा वर्षाव सुरू करतो.

युद्धाचा सातवा दिवस भाग अठ्ठ्यांऐंशीवा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग एकोण नव्वदावा

संजय पुढे सांगतो. तो बाणाचा वर्षाव कोणी सहन करण्यासारखा साधारण नव्हता. तरी तुझा मुलगा ते सहन करत त्याला प्रत्युत्तर देत असतो. तुझा मुलगा मोठ्याच संकटात सांपडला होता. दुर्योधनाच्या बाणांमुळें राक्षसाला ज्या जखमा झाल्या हत्या त्यातून रक्त वाहू लागले. त्यामुळें तो राक्षस तुझ्या मुलाचा बळी घेण्याच्या इराद्याने पुढे होतो. त्यावेळी वंगचा राजा जो त्याच्या उंच व भल्यामोठ्या हत्तीवर स्वार झाला होता, तो राक्षसाला अडवण्यासाठी पुढे होतो. त्याच वेळी भागादत्त त्याचा हत्ती दुर्योधनाच्या पुढे असा आणतो कीं, घटोत्कचाला त्याचा शर तुझ्या मुलावर मारणे शक्य होत नाही. राक्षस रागाच्या भरात त्याचा शर वंगच्या हत्तीवर मारतो. ते वंगचा हत्ती मरून पडतो. वंगच्या राजाला त्याची कल्पना येते कीं त्याचा हत्ती कोसळणार आहे म्हणून तो मोठ्या शिताफीने सुरक्षित जागी उडी मारून स्वताला वाचवतो. दुर्योधनाला समजते की, त्याचे सैन्य अस्ताव्यस्त झाले आहे व ते लढण्याच्या मनस्थितीत नाहीत, तो व्यथित होतो. क्षत्रिय कुळाले शोभेल असा त्या मनस्थितीतसुद्धा तो कुरु खंबीरपणे युद्धाच्या जागी उभा असतो. घटोत्कचाच्या भयानक राक्षसी आरोळयांनी तुझे सैन्य आणखीनच बिथरलेले होते. भिमाच्या मुलाच्या त्या आरोळया सहन न झाल्याने भिष्म द्रोणाचर्यांना बोलतात, "ह्या सैन्याला घाबरवणाऱ्या आरोळया ऐकल्यास कां"? त्याचा अर्थ हिडींबाचा मुलगा दुर्योधनाच्या मागे लागला आहे. राक्षसाला हरवणे सोपे नसते. म्हणून तुम्ही जाऊन दुर्योधनाला संरक्षण द्यावे, कारण तेआपले प्रथम कर्तव्य आहे. ती आज्ञा ऐकल्यावर द्रोण त्यांचा रथ घेऊन तुझ्या मुलाच्या संरक्षणासाठी जातात. दुर्योधनाला मदत करण्यासाठी सोमदत्त, वल्हिक, जयद्रथ, कृप आणि भुरिश्रव असें इतर योद्धेसुद्धा सज्ज होतात. त्यांच्या बरोबर सल्य, अवंतीचे दोघे, बृहद्वथ, अश्र्वत्थामा, विकर्ण, चित्रसेन, विविंसती आणि इतर अनक जमा होतात. ते दुर्योधनाला येणारे पाहूनसुद्धा राक्षस न घाबरता तसांच तेथे आव्हान देण्याच्या तर्हेने मैनक पर्वतासारखा उभा होता. घटोत्कच त्याचे धनुष्य हातात घेऊन उभा होता त्याच्या बरोबर त्याचे राक्षस सैनिक होते व दुसऱ्या बाजूला तुझ्या मुलाच्या संरकक्षणार्थ जमलेले मानवी योद्धे होते, प्रसंग मोठा बाका होता. मोठ्या मोठ्याने ते ओरडून गोधळ वाढवत होते. कोणीही गप्प बसावयाला तयार नव्हते. द्रोणांनी राक्षसांवर त्याच्या बाणांचा बर्षाव सुरू केला. त्या मागोमाग वल्हिक, सोमदत्त, कृप, अश्र्वत्थामा व इतर तुझे राखणकर्ते राक्षसांवर हल्ला करू लागले. घटोत्कच त्याच्या बाणाने त्या शुरांना जखमा करण्यास प्रारंभ करतो. ते तुझे योद्धे त्या विषारी बाणांच्या मारामुळें त्यांच्या रथात

विव्हळत तसेंच बसतात. त्यानंतर तो भिमाचा मुलगा भुरिश्रवाकडे त्याचे लक्ष देतो. त्याला जखमा केल्यावर तो विविंगसतीचा रथ मोडून टाकतो. त्यानंतर अश्र्वत्थामाचा समाचार घेतो. अश्र्वत्थामा त्याच्या रथातच पडतो. घटोत्कच आता जयद्रथाकडे पहातो. त्याचा ध्वजस्तंभ तो मोडून टाकतो. त्याचे चारही घोडे मारून टाकतो. तो अवंतीच्या राजपुत्राचीसुद्धा तशीच गत करून ठेवतो. त्याच्या तीक्ष्ण धार असलेल्या विषारी बाणांने तो बृहद्बलाला जखमा करतो. त्यानंतर तो भिमसेनाचा सुपुत्र सल्याला बाद करून ते युद्ध सिद्ध करतो.

युद्धाचा सातवा दिवस भाग एकोणनव्वदावा संपला.

## युद्धाचा सातवा दिवस

## भाग नव्वदावा

संजय पुढे सांगत असतो, त्या युद्धामुळें तुझे सगळे सैन्य रणांगणाकडे पाठ फिरवते. त्या एका राक्षसाने ते केलेले असते. त्यानंतर तोराक्षस दुर्योधनावर धावून जातो. त्याला तुझ्या मुलाला मारावयाचे असते. इतर कांहीं योद्धे तुझ्या मुलाला संरक्षण देण्यासाठी पुढे होतात.

ते सगळे त्या एका राक्षसावर चाल करून जातात. त्याच्यावर मोठ्या प्रमाणात बाणांचा मारा होतो तेव्हां तो उंच उडी मारून आकाशात जातो. आकाशातून तो ढगांप्रमाणे गर्जना करू लागतो. त्या गर्जना ऐकल्यावर युधिष्ठीर समजतो कीं, त्याचा पुतण्या संकटात आहे. तो भिमाला सांगतो कीं, त्याला मदत करण्यासाठी त्यांने जावे कारण तो हिडींबाचा मुलगा दुर्योधनाशी लढत आहे. येथे अर्जुन भिष्माला सांभाळत आहे तेव्हां, भिमाने घटोत्कचाला मदत कण्यासाठी जाणे श्रेयस्कर होईल. मोठ्या भावाचे ऐकल्यावर तो पांडव मोठ्यानो गर्जना करत व कौरवांच्या सैन्याला घाबरवत त्या जागी पोहोचतो जेथे दुर्योधन व त्याचे दोस्त होते. भिम त्यानंतर सत्यध्रीती व सौचिती जे अजिक्य समजले जातात त्यांना हरवतो. त्यानंतर तो श्रेनिमत आणि वसुदनाला जो काशीचा राजपुत्र आहे, हरवतो. त्याकड अभिम्यन्यू मोठा फौजफाटा घेऊन राक्षसाला मदत करण्यासाठी जात असतो. त्याबरोबर द्रैपदीची मुलं, पराक्रमी क्षात्रदेव, क्षात्रधर्मन, दक्षिणेकडील नील त्यांच्या फौजा घेऊन घटोत्कचाला मदत करण्यासाठी जात असतात. तुझे सैनिक पांडवांच्या पलटणी घटोत्कचाला वाचवण्यासाठी आलेल्या पाहून युद्धातून काठता पाय घेतात. त्यानंतर तेथे मोठे युद्ध होते. त्यात विविध शस्त्रांचा वारेमाप वापर होतो कित्येक मरतात. घोडे हत्ती बेसुमार मारले जातात. माणसांच्या मृत्यूची गणना करू नये इतकी होते. मृतांचे ढीग लागतात. त्यामुळे हवेत इतकी धूळ उडत असते कीं कांही दिसत नव्हते. त्या स्थितीत कोण कोणाला मारत आहे ते समजत नव्हते. सगळी हाणामारी अंदाजाने होत होती. जमिनीवरून हत्ती, घोडे व माणसांचे रक्त एकत्र मिसळून वहात होते. त्याची नदी तयार झाली होती. योद्धे कशाचीही पर्वा न करता एकमेकांवर आघात करत होते. त्या मारामारीत ते मरून पडत होते. हत्ती त्यांच्या सुळयांनी माणसांना, रथांना, घोड्यांना भोसकत होते, त्याच्या ताकदीपुढे कोणाचे कांहीं चालत नव्हते. तलवारीच्या धारदार पटक्यांने जखमा झालेले हत्ती वेगांने पळून जात असतांना त्यांच्या पायाखाली कित्येक पाईक मारत होते. ते कोणाचे ते समजत नव्हते. पांडवांचे हत्ती पांडवांचे पाईक सुद्धा मारत होते. असा सगळा गोंधळ चालू होता. धावणाऱ्या हत्तीवरून त्यांचे चालक

कधी खाली फेकले जात ते समजत नव्हते. त्यांच्या पाया खाली अनेक रथ व घोडे चिरडले जात होते त्यात कोणाच्या हत्तीने कोणाच्या रथाचा चुराडा केला ते सांगता येत नव्हते.

हत्ती कसेही धावत होते तरी एकंदर पहाता कौरवांचे सैनिक जास्त मारले जात होते कारण त्यांचीच संख्या रणांगणात खूप जास्त होती.

युद्धाचा सातवा दिवस भाग नव्वदावा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग एक्याण्णवावा

संजय पुढे सांगत असतो, आपल्या पलटणी मारल्या जात आहेत हे पाहून दुर्योधन फार रागावला होता. तो त्यान रागात भिमसेनावर चाल करून जातो. तेथे गेल्यावर तो इंद्राच्या धनुष्यासारख्या मोठ्या धनुष्याने भिमावर सतत बाणांचा वर्षाव करण्यास सुरूवात करतो. त्याने तो भिमाचे धनुष्य तोडून टाकतो. त्यानंतर त्याच्या चातीवर बाण मारतो. त्या बाणामुळें भिमाला फार कळा मारतात. तो त्याच्या रथाच्या स्तंभाला धरून उभा राहिलेला पहातो. तो त्याचे दातओठ चावत आहे तेसुद्धा दुर्योधन पहातो. ते त्याचा मुलगा घटोत्कच पहातो व ताबडतोब त्याच्या म्हणजे पित्याच्या मदतीला धावून जातो. त्याच प्रमाणे पांडवांचे इतर सेनापती त्यात अभिमन्यू होता त्याला आधार देण्यासाठी जातात. ते भिमाच्या मदतीला जात आहेत ते पाहून द्रोण त्यांच्या म्हणजे तुझ्या सेनापतींना बोलतो, जा आणि तुमच्या राजाला म्हणजे दुर्योधनाला मदत करण्यासाठी सज्ज व्हा. तुझा मुलगा आता मोठ्या संकटात पडला होता कारण, ते पांडव एकत्र होऊन तुझ्या मुलाच्या पाठी लागले होते. त्यात जखमी अवस्थेतील भिम त्यांच्या पुढे होता. पांडवांचे तुझ्या मुलाला ठार मारण्याच्या इराद्याने त्वेषाने त्याच्यावर चाल करत असतात. ते मोठ्याने आव्हानं देत व तुझ्या मुलाला भिती वाटावी व त्याचे मनोधैर्य नष्ट व्हावे अशाप्रकारच्या गोष्टी करत होते. तो गदारोळ ऐकून सोमदत्त त्या पाठलाग करणाऱ्या पांडवांच्या टोळीला आव्हान देतात. त्याबरोबर सल्य त्याला मिळतो. त्या पाठोपाठ द्रोण, विविंगसती, चित्रसेन, विकर्ण, सिंधूदेशाचा राजा जयद्रथ आणि बृहद्वल अवंतीचे राजपुत्र दुर्योधनाला संरक्षण देण्यासाठी आघाडी करतात. पांडवांच्या व तुझ्या सैन्यात तुंबळ युद्ध सुरू होते. द्रोण त्यांच्या मोठ्या तिरकमठ्याने भिमावर कांहीं लांबडे बाण फेकतो त्यामुळें भिमाला आणखीन जखमा होतात. त्याच्या अंगातून रक्त वाहू लागते. त्यानंतर तुझे योद्धे भिमाला घेराव घालतात. जखमा असला तरी पांडव तुझ्या वीरांवर बाण मारत असतो व त्यांचे बरेच नुकसान करत असतो. भिमाच्या बाणाने जखमी झालेले द्रोण रथात खाली बसतात. तो भोवळ आल्यामुळें तसे बसतात. त्यांच्या वृद्धत्वाचा प्रभाव त्यांना जाणवू लागतो. त्यांना अशाप्रकारे बेशुद्ध पडलेले पाहून त्यांचा मुलगा व दुर्योधन त्यांना मदत करण्यासाठी पुढे होतात. त्या दोघांना भिमाचा फार राग आलेला असतो. भिमावर ते दोघे चालून जातात.त्यांना येतांना पाहून भिम यमासारखा पुढे होतो. तो त्याची गदा घेऊन रथातून उतरून त्यांच्यावर धावून जातो. त्याला ठार मारण्यासाठी अश्वत्थामा व दुर्योधन त्याच्यावर धावून जातात. जमिनीवर असलेल्या भिमाला ते सगळे घेराव करतात. तो भिमासाठी मोठा बाका प्रसंग होता. पांडवांचे अनेक योद्धे त्याला संरक्षण देण्याच्या उद्देशाने तेथे पोहोचतात. त्यात प्रमुख होते

दक्षिणाचा राजा नील. नील नेहमी द्रोणांच्या मुलाला आव्हान देण्यात आनंद मानत असे. नील त्याच्या मोठ्या धनुष्याने अश्ववत्थामाला बाण मारतो. जसे इंद्राने दानव विप्रचित्तीला मारला होता. जो विप्रचित्ती स्वर्गाला भारी झाला होता. त्यामुळें तो द्रोणांचा पुत्र संतापला होता, त्याला झालेल्या जखमेमुळें तो बेचैन झाला होता. त्यानेसुद्धा एक बाण निलावर मारला. त्यानंतर तो त्याचे घोडे मारता व त्याचा ध्वजाचा खांबसुद्धा पाडतो. नीलच्या छातीत एक बाण मारतो. ते पाहून घटोत्कच त्याच्या राक्षस सहकाऱ्यांबरोबर अश्ववत्थामावर जातो. अश्ववत्थामा त्या धावून येणाऱ्या राक्षसांवर बाम मारतो व त्यांचा वेग कमी करतो. ते पाहून प्रचंड आकाराचा घटोत्कच संतापतो. तो त्याचे भयानक मायावी रुप धारम करतो व द्रोणाच्या मुलाचा गोंधळ करतो. त्या भ्रमदृष्यामुळे त्यांना असे दिसते कीं त्यांचे सहसैनिक मरून पडलेले आहेत. तुझे सैनिक त्या भ्रमदृष्याने प्रभावित होऊन तेथून निघून जातात. द्रोण, दुर्योधन, सल्य आणि अश्ववत्थामा जे मुख्य योद्धे तेसुद्धा त्या मायावी दृष्यामुळें घाबरून तेथून निघून जातात. त्या दृष्यात त्याना असे दिसे कीं, त्यांचे सगळे राजे व इतर सैनिक मरून पडले आहेत. त्या दृष्यामुळें सगळे तुझे सैन्य त्यांच्या तंबूकडे धावत जाऊ लागतात. जरी भिष्मावर त्याचा परिणाम होत नव्हता व तो ओरडून सगळयाना सांगू पहात होता कीं, ते खरे नाही ते भ्रमदृष्य आहे, तरी ते ऐकण्याच्या मनस्थितीत कोणीही नव्हते अगदी दुर्योधन सुद्धा. त्यांचे तसे पळणे पाहून पांडवांच्या गटात आनंद व्यक्त होत होता. घटोत्कचासह सगळे मोठ्याने आनंद दाखवण्याच्या घोषणा करू लागतात. शंखनाद होतात, विजयाची वाद्ये वाजतात. त्यावेळी सुर्य मावळतीकडे झुकत होता.

युद्धाचा सातवा दिवस भाग एक्यांण्णवावा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग ब्यांण्णवावा

संजय पुढे सांगत असतो, त्या पराजयानंतर दुर्योधन भिष्माला भेटतो व नम्रपणे त्यांना वंदन करून बोलतो, तो भिष्माना त्या पराजयाबद्दल सगळे सांगत असतो. तो कुरुवंशाचा राजा त्याच्या आजोबाला सांगतो, "जसें पांडव कृष्णावर विसंबून आहेत तसे मी तुमच्यावर अवलंबून आहे. तुमच्या जोरांवर मी हे युद्ध आरंभ केले आहे. माझे अकरा अक्षौहिणी सैन्य माझ्या प्रमाणे आपल्या आज्ञेत आहे. तरी आज आपण भिमसेनाकडून मार खाल्ला आहे, त्याच्या राक्षस मुलाच्या भ्रमसिद्धीमुळें. मी अशा प्रसंगामुळें सर्वांगाने जळत आहे. माझे स्वप्न पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे". दुर्योधनाचे ते बोलणे ऐकल्यावर आजोबा त्याला सुनवतात, "ऐक मी काय सांगत आहे ते, युद्धात कसे वागावयाचे ते प्रथम तू समजून घे. तू एकतर युधिष्ठीराशी लढ, अथवा भिमाशी अथवा अर्जुनाशी असें कोणा एकाशी लढ. तुझी राजा म्हणून जी प्रतिमा आहे ती जपणे तुझा काम आहे. राजा फक्त राजाशी लढतो, तू इतरांशी लढावयाचे नसते, त्यांच्याशी जसे तो राक्षस, आम्ही म्हणजे मी, कृप, द्रोण, सोमदत्त, भागादत्त, विकर्ण, सल्य आणि कृतवर्मन आहोत लढण्यासाठी, तेथे तू कां गेलास? जर तुला तो राक्षस जास्त मोठा वाटत असेल तर तू त्याच्याशी लढत रहाणार आहेस कां"? एवढे बोलून भिष्म भागादत्तला बोलावून त्या राक्षसाशी लढण्याचे आदेश देतात. त्यानंतर तो भागादत्त दुर्योधनाला सांगतात, "मी त्या राक्षसाशी लढणार आहे. जसें पूर्वीच्या काळी इंद्राने राक्षसांचा पराभव केला होता तसा आज मी ह्याचा करणार आहे". त्यावर भिष्म बोलतात भागादत्ताला, "आपल्याकडे स्वर्गीय आयुध आहेत. जसे पूर्वी असुरांचा पराभव केला होता देवांनी तसे आता होऊ दे". भिष्माकडून आज्ञा झाल्यानंतर तो राजा मोठी आरोळी ठोकतो व राक्षसाकडे जाऊ लागतो. राक्षसाच्या संरक्षणासाठी पांडवांचे सैन्य खडे होते. त्यात भिमसेन, अभिमन्यू, राक्षस स्वतः, द्रौपदीचे पुत्र, सत्यध्रीती, क्षात्रदेव, छेड्डीचा राजा, वसुदन, देसर्नचा राजा असें होते. भागादत्त त्याच्या उंच हत्तीवर बसून ज्याचे नांव होते, सुप्रतीक, निघतो. आता भागादत्त व पांडवांत युद्ध प्रारंभ होते. दोनही बाजूचे सैनिक, हत्ती एकमेकांत गुंतून लढत होते. हत्ती त्यांच्या तलवारी लावलेल्या सुळयांनी शत्रूपक्षाचे लोक, घोडे, हत्ती ह्यांना घायाळ करत होते. पाईक तलवारी, गदा अशा शस्त्रांनी लढत होते. नरसंहार होत होता. यमाच्या दारात त्यांची रांग लागली होती.

भागादत्त भिमावर चाल करतो. तो एक हजार बाण मारतो. भिमासा त्या बाणांचा त्रास होतो. त्यामुळे वृकोदर चिडतो, भिम भागादत्ताचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांचा नाश करतो. भागादत्त त्याच्या डोंगरासारख्या प्रचंड हत्तीवरून भिमाकडे जाऊ लागतो. पांडवांचे सैनिक भिमाला मुख्य ठेवून त्या हत्तीवर प्रहार करावयाला सुरूवात करतात. पांडवांचे सगळे राजे भागादत्ताच्या हत्तीवर तुटून पडतात. त्यात केकया बंधू, अभिमन्यू, दशर्न, क्षत्रदेव, द्रौपदीची मुलं, छेड्डीचा राजा, चेकीतन, चित्रकेतू रागाच्या भरात हल्ला करतात. त्याच्या हातातील स्वर्गीय आयुध घेऊन ते लढत असतात. ते सगळे त्या विशाल काय हत्ती भोवती फेर धरून त्याच्यावर शस्त्रांचे वार करत असतात. त्याला अनेक ठिकाणी जखमा होत असतात व त्यातून रक्त भळाभळा वहात असते. त्याच वेळी दशर्न राजा तशाच मोठ्या हत्तूवरून भागादत्तावर हल्ला करतो. परंतु, भागादत्ताचा सुप्रतीक त्या हत्तीला दाद देत नाही. तरी दशर्नच्या हत्तीचे पांडवांचे लोक कौतुक करतात. त्याला उत्तेजन देत रहातात. भागादत्त त्याच्या दांडपट्ट्याने दशर्नच्या हत्तीवर जोराने प्रहार करतो. त्याच्या वाराने त्या हत्तीचे संरक्षक कवच फाटते व त्याला खोल जखमा होतात. त्यामुळें विव्हळत तो हत्ती उलट फिरून जोरांनो चिंचाळत ओरडत पळून जातो. तो पळतांना पांडवांचे कित्येक सैनिक पायाखाली तुडवत जातो. पांडवांचे रथी मोठ्या संख्येने त्या हत्तीवर चाल करतात. भागादत्त त्याच्या सुप्रतीकाला पर्हाणीने टोचतो तसे तो हत्ती त्या पांडवांच्या रथींवर चालून जातो. त्या गोंधळात सुप्रतीक जे करतो त्यांने समव्रताच्या अग्नीची आठवण आकाशात बसलेल्या ऋषी व देवांना होते. शेकडो सैनिक त्याच्या धमालीत मारले जातात. कोणाही त्याला थांबवू शकत नाही. पांडवांच्या सैन्याचा फळी तोडली जाते. घटोत्कच आता आणखीन एक भयंकर रुप धारण करतो, तो एक आगीने पेटलेला भाला त्या सुप्रतीकावर जोराने फेकतो. प्रागज्योतीषचा राजा भागादत्त ते पहातो व त्याचा एक बाण असा फेकतो कीं, राक्षसावे मारलेला भाला तुटून पडतो. त्या जळत्या भाल्यामुळें खाली सगळीकडे आग पसरते. आता भागादत्त त्याचा एक भाला उचलतो व राक्षसांवर नेम धरतो. राक्षस तो भाला उंच उडी मारून त्याच्या हातांने पकडतो व त्यानंतर मोठी गर्जना करतो. राक्षस तो भाला हातांने तोडून टाकतो. घटोत्कचाची ती करामत पाहून आकाशातील सगळे प्रेक्षक फार खूष होतात. पांडव त्याची स्तुती करू लागतात. शाब्बास पठ्ठे असें सगळे त्याचे कौतुक करू लागतात. भिमाला विशेष आनंद होतो. भागादत्त हा त्याचा अपमान समजतो. तो राजा त्याचा भलामोठा तिरकमटा काढतो व पांडवांच्या जमलेल्या सैन्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्यातील एक बाण भिमाला लागतो. राक्षसाला नऊ अभिमन्यूला तीन केकया बंधूं ना पांच असें ते बाण लागतात. एक मोठा बाण तो क्षात्रदेवाला मारतो. द्रौपदीच्या मुलांना बाण लागतात, भिमाचे घोडे घायाळ होतात. भिमाचा झेंडा पाडतो. भागादत्ताच्या त्या बाणांमुळें भिमाचा सारथी घायाळ होतो तो रथाच्या टपावर

जाऊन बसतो. भिम ते सहन करू शकत नाही. त्या हल्ल्यामुळे पांडवांचे सैन्य सावध होते. ते होत असतांना अर्जुनाचा रथ ज्याचा सारथी कृष्ण आहे, तेथे त्याचे संहाराचे सत्र चालवत येऊन पोहोचतो. त्याच्या नातेवाईकांना लढतांना पाहून तो त्यात सामील होतो. तो त्याच्या बाणांने भागादत्तावर जोराचा हल्ला करतो. अर्जुन तेथे पोहोचला आहे ते समजल्यावर दुर्योधन त्याच्या राखीव सैन्याला तेथे भागादत्ताला मदत करण्यासाठी पाठवण्याचे ठरवतो. तोपर्यंत भागादत्त पांडवांचे शिरकाण करत युधिष्ठीराकडे गेलेला असतो. आता एक भयंकर युद्ध सुरू होते त्यात पांडवांच्या बाजूने पांचाल, श्रींजय, केकया, भिमसेन लढत होते एकट्या भागादत्ताशी. तेथे भिम कृष्णाला व धनंजयाला त्याच्या मुलाच्या इरावताच्या, मृत्यूची वार्ता सांगतो. ज्या प्रकारे त्याला मारले ते अर्जुनाला समजते तो संतापतो.

युद्धाचा सातवा दिवस भाग ब्यांण्णवावा संपला.

# युद्धाचा सातवा दिवस

## भाग त्र्यांण्णवावा

संजय पुढे सांगत असतो, अर्जुनाला त्याच्या शूरवीर मुलाच्या मृत्यूने फार दुःख होते. तो सुडाच्या भावनेने सापासारखे फुत्कार टाकू लागतो. कृष्णाकडे पहात धनंजय उद्गारतो, "आपले काका विदूर हे सगळे कुरु व पांडवांचे संहार पहात होते म्हणून ते ह्याच्या विरूद्ध होते ते योग्य सांगत होते. अरे माधवा, असंख्य कौरव आता पर्यंत नाहक मारले गेले आहेत. त्याच प्रमाणे पांडवांचे सुद्धा खर्च झाले आहेत, त्या क्षुल्लक जमिनीच्या तुकड्यासाठी आणखीन किती मरणार आहेत? आपल्याच आप्तांचे संपत्तीसाठी संहार करणे कितपत योग्य ठरेल? तो दुर्योधन त्याचा मामा शकूनी व दोस्त कर्ण ह्या तिघांच्या आग्रहाखातर हे सगळे मरत आहेत. क्षत्रिय वंश नष्ट होत आहे. केवळ पांच गांव मागितली होती, ती जर दिली असती तर हे झालेच नसते. किती क्षत्रिय आणखीन मरणार आहेत माधवा? क्षत्रिय वर्णाची छीः थू मी करत आहे. आपल्याच लोकांची हत्त्या करावयाची व ती सुद्धा कांहीं धनासाठी हे मला आवडत नाही". पुढे तो कृष्णाला बोलतो कीं, त्याला धृतराष्ट्राच्या लष्कराकडे जावयाचे आहे. मला तेथे घेऊन जा. आपल्याकडे फार वेळ नाही. त्याचा दिव्य रथ ज्याचा सारथी साक्षात भगवान होते तेथून निघतो वेगांने. त्या सातव्या दिवसाच्या दुपारी भिष्म व पांडव ह्यांच्यात धुमष्चक्री युद्ध झाले होते. तुझे पुत्र त्यांची सेना घेऊन भिमाला घेराव घालतात. त्याच वेळी कृप, सुशर्मन, भागादत्त अर्जुनावर चाल करतात. हृदिकाचा कृतवर्मन आणि वल्हीक सत्यकीला भिडतात. राक्षस अलमवुष अभिमन्यूला सामोरी जातो. त्याचे धमासान युद्ध सुरू होते. तुझा मुलगा भिमावर चाल करतो त्यावेळी तो त्याच्यावर अनेक बाण मार असतो. परंतु, भिम तुझ्या मुलाला एक धारदार बाण मारून जखमा करतो. त्याने तो मरतो. त्यानंतर भिम कुंडलिनला बाण मारतोत्याच्या बाणांने तुझी मुलं मरत होती. ती त्यांची नियती होती. ह्या सातव्या दिवशी तो कुंतीपुत्र तुझ्या ज्या मुलांना मारतो त्यांची नांव संगतो ती ऐक, अनध्रीती, सुवाहू, कुंदभेदीन, विराट, दीर्घवाहू, दीर्घलोचन, कन्यकध्यज ते सगळे त्यांच्या रथांतून पडल्या मुळे मेलेले होते. तुझी इतर मुलं भिमाला पाहून पळून जात होती. द्रोण भिमाला बाणांच्या गराड्यात पकटत होते. तरी कुंतीपुत्राचे धैर्य कौतुकास्पद होते हे निश्चित. द्रोणांकडून होणारा बाणांचा वर्षाव भिमाला थांबवू शकत नव्हता. द्रोणांचा बाणांचा वर्षाव होत असतांना भिम तुझ्या मुलांना टिपत होता. एकाद्या वाघाने हरणं मारावीत अशाप्रकारे तो कुंतीचा मुलगा तुझ्या पुत्रांचा फडशा पाडत होता. त्या सुमारास भिष्म, भागादत्त, कृप अर्जुनाला तोंड देत होते.

अतिरक्ताने तुझ्या अनेक योद्ध्यांना यमाकडे धाडले होते. अभिमन्यू सुद्धा तेंच करत होता. राजा अंवशाचा रथ त्याने मोडला त्याचे घोडे पळून गेले. तो थोडक्यात बचावला होता. त्यानंतर तो महारथी राजा हृद्रीकाच्या मुलाच्या रथात चढला. ते पाहून सगळे सुभद्राच्या मुलाचे कौतुक करतात. दुसरी कडे धृष्टद्युम्न तुझ्या इतर राजांचा समाचार घेत होता. ती सगळी युद्धे फार भयंकर अटीतटीची होती. कोण जिंकतो व कोण हरतो ते समजत नव्हते. कांहीं योद्धे मेल्यावरसुद्धा त्याच्या प्रतिस्पर्ध्याला धरून ठेवत होते त्यामुळें त्याला त्या मरणमिठीतून मोकळे होता येत नव्हते. त्यातच कांहीं मारले जात होते. सोन्याच्या मिठी असलेल्या असंख्य तलवारी मातीत पडलेल्या दिसत होत्या. त्याशिवाय गदा, भाले, बाण विविध प्रकारचे सर्वत्र पडलेले होते. त्याच प्रमाणे मेलेले घोडे, हत्ती, रथ सगळीकडे विखूरलेले होते. अनेक शत्रूघ्नी मातीत धूळ खात पडलेल्या होत्या. मरणप्राय वेदनांमुळें कण्हणारे योद्धे जमिनीवर तडफडत पडलेले दिसत आहेत, अहो राजे. अतिशय दारूण दृष्य आहे सगळीकडे साक्षात मृत्यूचे तांडव चालले होते. माणसे त्यात नाचत होती. कित्येकांची कलेवरं रक्तात माखलेली पडलेली होती. ती एकमेकांवर पडलेली होती. सैनिकांच्या अंगावरील सोन्या मोत्याचे दागिने सूर्याच्या उन्हात चमकत होते. मरून पडलेल्या घोड्यांच्या जिभा लांब बाहेर आलेल्या होत्या त्यावर माशा गोंगावत होत्या. अनेक हत्ती व घोडे मरणाच्या किंकाळया मारत तडपडत होते. त्यामध्ये विविध शस्त्रं, अस्त्रं मृत सैनिकांच्या हातात असलेली दिसत होती. विविध दागिन्यानी मढलेले राज्यांचे मुडदे सर्वत्र पडलेले होते, आता ते राजे राहिले नव्हते फक्त एक मुडदा झाले होते. असे सगळे दृष्य होते त्या सातव्या दिवशीच्या संध्याकळी त्या कुरुक्षेत्राच्या रणभूमीचे. अंधार झपाट्याने पसरत होता, युद्ध करणे अशक्य होते त्यावेळी युद्ध बंदीची वाद्ये वाजू लागली दोनही बाजूंकडून. दोनही बाजूचे योद्धे आवरत असतात व आपल्या मेलेल्या मित्रांच्या आठवणी करत दुःखी अंतःकरणाने ते आपापल्या तंबूकडे जात होते.

युद्धाचा सातवा दिवस भाग त्र्यांण्णवावा संपला.

# युद्धाचा आठवा दिवस

## भाग चौऱ्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, सातवा दिवस फारच वाईट ठरल्यामुळें दुर्योधन त्याचे दोस्त शकूनी, त्याचा भाऊ दुःशासन आणि कर्ण एकत्र येतात. त्यांची सल्लामसलत सुरू होते. पांडवांचा पराभव कसा करावयाचा ह्या एकाच मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी ते एकत्र आले होते. राजा दुर्योधन कर्णाला उद्देशून बोलतो, भिष्म, द्रोण, कृप, सोमदत्त, सल्य, अजून पर्यंत पांडवांना आवरू शकलेले नाहीत. त्या पांचांपैकी कोणीही आजपर्यंत मारला गेलेला नाही. त्यांची सततजीत होत आहे ते तुम्ही पहात अहातच. त्यामुळें मी बेचैन झालो आहे. माझी शस्त्र संपत्ती कमी होत आहे, सैन्याची संख्यासुद्धा अर्धी झाली आहे. चवताळलेले हत्ती पांडवांच्या पेक्षा माझ्याच सैनिकांना त्यांच्या पायाखाली जास्त तुडवत आहेत. सगळे सांगतात कीं, पांडवांना देवसुद्धा जिंकू शकणार नाहीत, त्यामुळे माझ्या मनाचा शंकासुरांनी ताबा घेतला आहे. काय करावे ते सुचत नाही, म्हणून मी तुम्हाला विचारत आहे, कीं, अशा परिस्थितीत पुढे काय करावयाचे. ते ऐकल्यावर सुतपुत्र कर्ण त्याला बोलतो कीं, तो प्रथम चिंता करावयाचे बंद कर. तुझ्यासाठी मी कांहींही करावयाला तयार आहे. अगदी माझा जीवसुद्धा द्यावयाला तयार आहे. परंतु त्यासाठी तुझा आजोबा सरसेनापतीपदा वरून गेला पाहिजे. त्यानंतर मी व सोमदत्त, भागादत्त असें, भिष्माच्या नजरेसमोर त्या पांडवांचा खत्मा करून टाकू. मी तुला शपथेवर हे वचन देत आहे. भिष्म मनाने पांडवांचे आहेत, त्याचप्रमाणे द्रोण, कृप पांडवांच्या बाजूने अप्रत्यक्षरित्या व दाखवायला तुझ्या बाजूने असें वागत आहेत. हे तुझ्या लक्षात येत नाही कारण, तुझा त्यांच्यावर अंध विश्वास आहे. भिष्म जास्त करून सामान्य योद्ध्यांचे वध करत असतो व बाणांचा वर्षाव करतांना त्याचा ओघ असा ठेवतात की, आकाशात फेकलेले जास्त करून बाण तुझ्या सैनिकांवर लागतील. ते सहजपणे सिद्ध करतां येणार नाही अशी युक्ती ते करत असतात. पण मला तो म्हातारा फसवू शकणार नाही. मी अगदी पहिल्या दिवसांपासून ते पहात आहे. तुझ्या अक्षौहिणी सैन्यातील जे मेले ते जास्तकरून भिष्माच्या व द्रोणांच्या बाणाने मेले आहेत हे तुला समजले तर सगळे कांहीं तुझ्यासाठी स्पष्ट होईल. ते साध्य करण्यासाठी तुला एक गोष्ट केली पाहिजेस ती अशी कीं, आता तू भिष्माच्या तंबूत जाऊन त्यांचा सरसेनापती पदाचा राजीनामा घे. एकदा त्याने ते पद सोडले कीं समज, ते पांडव त्यांच्या सगळया गोतावळयासकट मेल्यात जमा आहेत, हा माझा वादा आहे. कर्णाचे ते बोलणे मनावर घेत दुर्योधन त्याच्या भावाला, दुःशासनाला सांगतो, माझ्या तंबूतील सगळयांना सज्ज रहाण्यास सांग. त्यानंतर तो कर्णाकडे पहात त्याला सांगतो कीं, जर आजोबा तयार झाले तर तुला सुद्धा सज्ज व्हावे लागेल. भिष्माने शस्त्रं खाली ठेवली कीं, तुला तुझी

कामगीरी करावी लागेल हे लक्षात ठेव. ते बोलून झाल्यावर तुमचा मुलगा व त्याचा भाऊ सरंजामाचे कपडे नेसून भिष्माकडे जाण्यास निघतात. दुर्योधन त्या रुबाबदार कपड्यात इंद्रासारखा सुंदर दिसत होता. ते भिष्माच्या शामियान्यात येतात. त्याचे खास शूरवीर योद्धे त्याच्या बरोबर होते. ते एका मागून एक असें चालत त्या शामियान्यात प्रवेश करतात. तुझ्या मुलाचे चाहते त्याला वाटेत जातांना अभिवादन करत होते. असें ते भिष्माच्या समोर जातात. त्याच्या बरोबर त्याचे सहोदर म्हणजे तुमचे पुत्र त्याच्या मदतीसाठी तेथे आलेले असतात. दुर्योधन त्याचा उजवा हात वर करून त्या चाहत्यांचे अभिनंदन करत होता. तो त्याच्या तळयातून जात असतांना त्याला विविध भिन्न भाषांतून लोक बोलत असल्याचे ऐकू येत होते. कांहीं त्याचे स्वागत करण्यासाठी आरती घेऊन येतात, ज्यामध्ये सुगंधी तेल निरांजनात वापरलेले होते. त्यामुळें एक सुगंधी वातावरण तेथे झालेले होते. भाट त्याच्या स्तुतीची कवने गाऊ लागले होते. ते सगळे वैभव उपभोगत तुझा मुलगा भिष्माच्या जागी जात होता. तो व त्याचे लोक जात असतांना रस्त्यावरील वरदळ लगबगीने बाजूला होत होती. अखेरीस अशा रुबाबात तो तुझा मुलगा त्याच्या आजोबाच्या ठिकाणी पोहोचतो. तेथे भिष्माला सलाम करून तो व त्याचे साथी तेथे असलेल्या सोन्याच्या आसनांवर बसतात. भिष्म त्याला अशारितीने अचानक येण्याचे कारण विचारतात, तेव्हां तो डोळयात पाणी आणून बहिवरल्या सारखे करत बोलतो, "आपल्या मदतीने आम्ही हे युद्ध छेडले, जसे देवांचे दानवांशी असावे. परंतु, मला बोलावयास शरम वाटते कीं, आपल्या नेतृत्वाखाली आम्ही पांडवांना पराजित करू शकू कां? कीं काय, अशी शंका येऊ लागली आहे. स्पष्ट बोलतो म्हणून आपण कृपया रागावू नये. म्हणून आता माझ्यावर कृपा करा व पंडुच्या मुलांवर सरळ हल्ला करण्याचे ठरवा. महेंद्रा सारखे आपण सगळया प्रधान योद्ध्यांवर जातीने चाल करण्याचे मला आश्र्वासन द्यावे त्यात आपण पांचाल, सोमक, करुष, केकया अशा पांडवांच्या खास मंडळींचा फडशा पाडण्याचे वचन घेण्यासाठी मी आपल्याकडे आलो आहे. ते वचन आपण पाळाल ह्याबद्दल मला शंका नाही. सगळया पार्थांचा निर्वंश आपण कराल असे मला सांगा. त्याबरोबर त्यांच्या इतर मित्रांचासुद्धा नाश कराल असे मला सांगा. जर पांडवांबद्दल आपल्याला कांहीं खास भावना असतील तर ते मला आताच सांगा. तसे असेल तर आपण रजा घ्यावी आणि माझा मित्र कर्ण ह्याला सरसेनापतीपदी नेमण्याची मला परवानगी द्यावी. त्याने मला अभिवचन दिले आहे कीं, जर तो सरसेनापती झाला तर तो पांडवांचा व त्याच्या दोस्तांचा पुरता नाश करून दाखवेल व हे युद्ध आपल्या बाजूनी जिंकेल". तुमचा मुलगा असें बोलल्यावर कांहीं न बोलता गप्प बसतो.

युद्धाचा आठवा दिवस भाग चौऱ्यांण्णवावा संपला.

# युद्धाचा आठवा दिवस

# दुर्योधनाची सल्लामसलत

# भाग पंच्यांण्णवावा

संजय पुढे सांगतो, महारथी भिष्म तुमच्या मुलाच्या त्या बोलण्यांने दुखवले जातात. तरी ते त्याला वाईट वाटेल असें न बोलण्याचे ठरवतात. भिष्मांच्या दीर्घ श्र्वासातून सापाचे फुत्कार जाणवत होते पण शब्दाने ते कांहीं दाखवत नाहीत. आपला संताप आवरत पण त्यामागील भावना न लपवता ते तुमच्या पुत्राला बोलतात, "अरे दुर्योधना, तुझ्या अशा बोलण्यांने मला फार दुःख झाले आहे. तू माझ्या प्रामाणिकपणा वर संशय दाखवत आहेस. मी आजपर्यंत जे केले ते तुझ्या भल्यासाठी केले आहे. मी माझे आयुष्य त्यासाठी संपवण्यास तयार आहे, पांडव हे खरोखरच अजिंक्य आहेत कारण त्यांच्या पाशी कृष्ण म्हणजे साक्षात विजय आहे. तुला माहीत आहे जेव्हां अग्नीला जिश्नु व कृष्ण मदत करण्यासाठी जातात खांडव अरण्यात तेव्हां मी नव्हतो. अर्जुन इंद्राला शंकराला हरवत आला आहे. तुम्ही वनात गेला होता तेथे तुम्हाला गंधर्वाच्या कचाट्यातून कोणी सोडवले ते आठव, तेथे तुझा कर्ण होता पण तो पळून गेला होता जेव्हां तू व तुझे साथी गंधर्वांने पकडून ठेवले होते. तुम्ही विराटाची खिल्लारं पळवण्यासाठी गेला होता तेथे तुम्हाला अर्जुनानेच पकडले होते जरी तो बाई वेषात होता, तेव्हां सुद्धा तुझा मित्र तुझ्या बरोबर होता पण तो तेव्हां अर्जुनाला हरवू शकला नाही, उलट अर्जुनाने त्याला नागडा करून पाठवले होते ते तू विसरला आहेस वाटते. त्या युद्धात द्रोणांनासुद्धा त्याने पाणी पाजले होते ते तू विसरला आहेस कां? तुला आठवते कां, त्यावेळी तुझ्या कर्णा प्रमाणे द्रोणांनासुद्धा त्याने विवस्त्र केले होते. ह्या गोष्टी तू लक्षात घेतल्यास तर तुला लक्षात येईल कीं कर्णाचा दावा किती फोल आहे. केवळ फुशारक्या मारण्या व्यतिरीक्त तुझ्या मित्राने आजपर्यंत काय केले आहे ते मला सांग. त्याला विचार जेव्हां गंधर्वांनी तुला अटक केली तेव्हां तो कोठे पळाला होता, तेव्हां त्याने काय केले? तुझे कान भरावयाचे माझ्या विरुद्ध हे एकच काम तो सुतपुत्र चांगले करू शकतो. पार्थाने राक्षस कुळ निवतकवच कसे नष्ट केले ते तुला चांगलेच माहीत आहे. हे पहा दुर्योधना, अर्जुनाचे सामर्थ्य आहेच व त्याबरोबर तो शंख गदा चक्रधारी त्याच्या सह सतत असतो, त्याला तुझा कर्ण कसा पराभूत करणार ते सांग. ह्या गोष्टी तू समजतोस इतक्या सोप्या नाहीत. अनेक ज्ञानी त्या धराधराची स्तुती करत असतात, त्यात नारद, मार्कंडेय असे थोर ऋषी आहेत. अरे दुर्योधना, तुला समजत नाही कोणाशी काय बोलावयाचे व कसे बोलावयाचे. आम्ही तुला किती सांभाळून घेतो पण तू जशाच्या तसाच राहिला

आहेस. ज्याचा अंतकाल समीप आला आहे त्याला सगळे उलटे दिसू लागते असे तुझे झाले आहे. तू पांडवांशी व श्रींजयांशी दुष्मनी करून काय मिळवले आहेस ते पहा. कोणाशी दोस्ती करावी व कोणाशी दुष्मनी ह्याचे साधारण ज्ञान तुझ्याकडे नाही ह्याचे मला वाईट वाटते. केव्हातरी तुला अक्कल येणार आहे कां? माझ्याबद्दल थोडे बोलतो, मी सगळे सोमक व पांचाल एक शिखंडी सोडून मारून टाकू शकतो. शिखंडी मला मारून टाकणार आहे, त्यानंतर मी स्वर्गात जाणार आहे. आता तू थकलेला आहेस, शांतपणे जाऊन झोप, उद्या पुन्हा लढावयाचे आहे. मी उद्या अशी लढाई करणार आहे कीं, ती आकाशातील ऋषी व देव आठवतील". त्यानंतर कांहीं न बोलता तुझा मुलगा आजोबाला लवून नमस्कार करतो व निमूटपणे आपल्या ठिकाणी जातो. त्याच्या ठिकाणी गेल्यावर तो त्याच्या कर्मचाऱ्यांना जायला सांगतो व स्वतः निजतो, त्याला भिष्माचे आश्वासन आठवते कीं, उद्या ते सोमकांचा नाश करणार आहेत, तेवढे तुझ्या मुलाला खूष करण्यासाठी पुरेसे होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे तुझा मुलगा सगळ्यांना लढण्यासाठी तयार व्हावयाला सांगतो. आज शंतनुचा मुलगा सोमकांवर जाणार तेव्हां त्याला फार मजबूत संरक्षण द्यावयाला पाहिजे ते तो ओळखतो. त्या प्रमाणे व्यवस्था केल्या जातात.

भिष्म रात्रभर विचार करत असतो, अर्जुनाशी कसे लढणार ह्याचा, ते सोपे नव्हते.

भिष्माच्या संरक्षणासाठी तगडी व्यवस्था केलेली असते. त्यासाठी खास दुःशासन स्वतः जातीने लक्ष गेत असतो. पांडवांचा नाश हे कौरवांचे जुने स्वप्न होते. ते आता साध्य होणार म्हणून ते आनंदात होते. भिष्म शिखंडीला नाही मारणार कारण तो सुरूवातीला जन्मता मुलगी होता. भिष्म कोणाही स्त्री वर वार करार नाही. स्त्रीला मारणे हे पुरूषार्थात येत नाही. इतर क्षत्रियांचा ते पराभव करणार आहेत त्यात सोमक आहे. भिष्म सांगतात कीं, जर पांडवांनी माझ्यावर हल्ला केला तरच मी त्यांच्यावर प्रतिकार करीन व त्यामुळें ते मरू शकतात. म्हणजे त्यासाठी पांडवांनी सुरूवात केली पाहिजे, ह्या आणि असा इतर गोष्टींची चर्चा दुर्योधनाच्या गोटात होत होती. भिष्मापर्यंत शिखंडी पोहोचणार नाही असे आपल्याला केले पाहिजे ते एकमेकांना सांगत होते. शकूनी, विविंगसती, सल्य, कृप, द्रोण भिष्माचार्यांना संरक्षण देतील असे ठरते. ते झाले म्हणजे आपला विजय निश्चित असें दुर्योधन मनापासून समजत असतो. दुर्योधनाच्या मनाप्रमाणे सगळी व्यवस्था केली जाते. त्या लष्कराच्या हालचालीने पृथ्वी हादरत होती. भिष्माजवळ कोणी जाणार नाही अशी व्.वस्था केलेली होती. जसें देव दानव युद्धात देव इंद्राला संरक्षण देत होते त्याची आठवण आकाशातून पहाणाऱ्या देव व ऋषीना होत होती. दुर्योधन त्याच्या सेनापतींना सांगत असतो, "युधमन्यू अर्जुनावर डाव्या बाजूने लक्ष ठेवील. उथमौजूस उजव्या बाजूने लक्ष ठेवील.

कौरव असे करतात कीं शिखंडी भिष्मापर्यंत जाऊ शकला नाही पाहिजे. परंतु, अर्जुन शिखंडीला संरक्षण देत होता हा मोठाच प्रश्न त्यांना पडला होता. दुःशासन मोठी फौज घेऊन भिष्माला संरक्षण देत पुढे जात होता. कौरवांची ती चाल पाहून धनंजय धृष्टद्युम्नाला बोलतो, "शिखंडीला कसे ही करुन भिष्मापुढे आणण्याची व्यवस्था झाली पाहिजे. मी पुढचे पाहून घेईन".

युद्धाचा आठवा दिवस भाग पंच्यांण्णवावा संपला.

## युद्धाचा आठवा दिवस

## भाग श्यांहृण्णवावा

संजय पुढे सांगत असतो, भिष्म त्याची फौज घेऊन निघतो व रणांगणात आल्यावर सर्वताभद्र नांवाचे व्युह रचतो. त्यात सगळया पलटणी चौरस आकारात उभ्या रहातात व चौफेर आक्रमण करतात असें होते. त्यात कृप, कृतवर्मन, सैव्य, शकूनी, सिंधचा राजा जयद्रथ, कंबोजचा राजा सुदक्षिण, त्यात भिष्म व तुझे सगळे पुत्र ठिकठिकाणी नेमलेले असतात. द्रोण व भुरिश्रव, सल्य आणि भागादत्त उजव्या बाजूचे संरक्षण करत असतात. अश्र्वत्थामा, सोमदत्त, अवंतीचे राजपुत्र डाव्या बाजूचे संरक्षण करणार असतात. दुर्योधन त्रिगर्ताने सुरक्षित केला होता, पांडवांवर हल्ली करण्याचे काम अलमवुषाचे ठरले होते. त्याला मदत म्हणून महायोद्धा श्रृतयूश सज्ज होता. अशाप्रकारे सगळी व्यवस्था केलेली होती.

पंडुचे मुलगे युधिष्ठीर, भिम माद्रीचे नकूल व सहदेव त्यांच्या रचनेत पुढे होते. त्यांचे नेतृत्व धृष्टद्युम्न करत होता. त्याला मदत म्हणून राजा विराट, सत्यकी सज्ज होते. शिखंडी आणि विजय (अर्जुन) राक्षस पुत्र, चेकितन, कुंतीभोज त्यांच्या मोठ्या सैन्यानिशी सज्ज होते. अभिमन्यू, द्रुपद, कैकेया बंधू असें पांडवांचे सैन्य लढण्यासाठी तयार होते. रणवाद्ये वाजली व युद्ध प्रारंभ झाले तसे कौरवांचे सैन्य जोरात मुसंडी मारून पांडवांच्या व्युहाला तोडून आत घुसण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या रणगर्जना सगळया आसमंताला हादरवून सोडतात. कौरवाचे सैन्य भिष्माना पुढे ठेवून लढत होते व त्यांचे लक्ष्य अर्जुन होता. त्याचवेळी पांडवांचे भिमसेन तुझ्या मुलांवर आक्रमण करुन जातो. चौफेर आरडाओरड सुरू होते. रक्ताच्या चिळकांड्या सर्वत्र उडत होत्या जसे योद्धे एकमेकांना भोसकत होते. शंखनाद, शिंग, क्रकच अशी फुंकण्याची वाद्ये ऐकू येत होती. त्याशिवाय नगारे व ढोलकी सुद्धा जोरांने वाजत होती. पांडवांच्या फौजा जोरात तुमच्या फौजांवर दबाव आणत होत्या. रणांगणाचे दृष्य होते जसे आधीचे होते. तोंच गोंधळ तींच आरडाओरड तसेंच सगळे होत होते. त्या आवाजामुळें आकाशात उडणारे पक्षी घाबरून पळत होते. कोल्हेकुई भर दिवसा ऐकू येत होती म्हणजे आज कांहीं विशेष संहार होणार असें वाटत होते. सगळे प्राणी एकदम रडत होते. आकाशातून रक्त व मांस आणि हाडाचे तुकडे पडत होते. ही अशुभ लक्षणं मानली जातात. राक्षसांच्या पलटणी मोठ्याने गर्जना करत होत्या. त्या आवाजाने कानठळया पडत होत्या. कुत्री, कोल्हे, कावळे, गिधाड विचित्र प्रकारे आवाज काढत होती. सागराच्या लाटांचा गजरा होतो तसा धीरगंभीर आवाज सगळीकडे घुमत होता. भितीचे वातावरण झाले होते. कांहीं भयंकर होणार

असे वाटत होते. आकाशातील प्रेक्षक पुढे आठव्या दिवशी काय होणार म्हणून एकमेकांना विचारत होते.

युद्धाचा आठवा दिवस भाग श्यांहृण्णवावा संपला.

## युद्धाचा आठवा दिवस

## भाग सत्यांण्णवावा

संजय पुढे सांगत असतो, अभिमन्यू त्याच्या लालसर रंग असलेल्या घोड्यावर बसलेला, दुर्योधनाच्या दिशेने त्याचा मोर्चा वळवतो. त्याच्या बाणांच्या वर्षावाने कौरव असहाय झालेले होते. अभिमन्यू त्याच्या शस्त्रांसह कौरव सेनेच्या अफाट सागरात घुसला. तेथे कौरवांचे असंख्य क्षत्रिय त्याने यमाकड पाठवले. अनेक रथ मोडून टाकले, रथींना अस्वस्थ केले. त्याच्या विषारी बाणांने कितीतरी योद्धे घायाल झाले होते. त्याचा जर सतत वाढत जात होता. हत्तीदलाला सुद्धा त्याने धडक दिली होती. त्याला ते करतांना फार आनंद होत होता. त्याचे शौर्य व हिम्मत पाहून स्वर्गातील राजे, ऋषी त्याची स्तुती करू लागले होते. त्याच्या हल्ल्यापासून कोणालाही संरक्षण नव्हते. साक्षात इंद्र लढत आहे असें ते दृष्य होते. त्याचे सोन्याचा मुलामा असलेले धनुष्य जसा तो गोल फिरत असें, सूर्याच्या उन्हात चमकत होते. त्याची शिताफी इतकी जलद होती कीं, कृप, द्रोण, जयद्रथ असे बरेच त्याच्यावर नेम धरू शकत नव्हते. जणूकाय दोन फाल्गुनी रणांगणांत लढत आहेत असे दृष्य होते. ते पाहून स्वर्गातील देव फार आनंदात होते. तुझे सैन्य त्यांच्या मारामुळें विव्हळत किंचाळत होते. दुर्योधन राक्षस ऋष्यशिंगाच्या मुलाला, अलमवुषाला अभिमन्यूचा पाडाव करण्याची आज्ञा करतो. तो त्याला सांगतो, आम्ही पार्थाला मारत आहोत तेवढ्यात तू त्याच्या मुलाचा वध करून टाक. ती आज्ञा प्रमाण मानून तो राक्षस अभिमन्यूवर चाल करून जातो. त्या राक्षसाच्या भयानक आरोळ्याने पांडवांचे सैन्य हादरून गेले होते. तो राक्षस त्याच्या रथाच्या टपावर धनुष्य घेऊन नाचत होता. त्याला फार आनंद झाला होता कीं, त्याला अभिमन्यूचा वध करण्याचे काम दिले. प्रथम तो अभिमन्यूच्या पलटणीच्या सैनिकांचे वध करण्यास सुरूवात करतो. जसा वली देवांचा संहार करत होता तसे ते होते. पांडवांच्या सैन्याची फारमोठी हानि होत होती. त्यामुळें पांडवांची सेनी पळून जाऊ लागली. त्यानंतर तो राक्षस द्रौपदीच्या मुलांवर घसरला. द्रौपदीच्या मुलांनी त्या राक्षसाची आगेकूच थांबवली होती. त्यांच्या जबरदस्त मारापुढे राक्षसाचे कांहीं चालेना. त्यांपैकी प्रतिविध्य राक्षसाला जखमी करण्यात कामयाब होतो. त्यानंतर सगळेच त्याच्यावर बाणाचे वार करत रहातात व त्याला तो राक्षस सहन करू शकत नाही. अलमवुष संतापाने लालेलाल झालेला अखेरीस बेशुद्ध होऊन रथातच पडतो. थोड्या वेळांनी तो शुद्धीवर येतो व त्यानंतर तो द्रौपदीच्या मुलांचे ध्वज स्तंभ पाडतो, त्यांचे घोडे मारून टाकतो. अशाप्रकारे रथ, घोडे नसलेले ते द्रौपदीपुत्र तसे असतांना राक्षस त्यांचा नाश करण्यासाठी त्यांच्यावर धावून जातो. त्यांची ती अवस्था झालेली पाहून अभिमन्यू त्यांच्या दिशेने त्याचा रथ नेतो. त्यानंतर राक्षस व अभिमन्यू असे द्वंद्व सुरू होते. वृत्र आणि वासवाच्या

द्वंद्वाची आह्ववम देणारे ते होते असें आकाशात बसलेले ऋषी सांगतात. त्या द्वंद्वाकडे सगळे योद्धे पहात होते, तुमच्या आणि पांडवांच्या बाजूचे योद्धे सुद्धा लढाई थांबवून ते पहात राहिले होते, कारण ते होतेच तसे प्रेक्षणीय. शक्र आणि समराचे द्वंद्व किंवा देव आणि असुरांचे जसे होत होते अतिप्राचीन काळी, तसे ते प्रेक्षणीय होते.

युद्धाचा आठवा दिवस भाग सत्यांण्णवावा संपला.

## युद्धाचा आठवा दिवस

## भाग अठ्ठ्यांण्णवावा

धृतराष्ट्र बोलतात, अरे संजया मला सांग अलमवुष आणि अभिमन्यू ह्यांच्यातील द्वंद्वाची जास्त माहिती मला समजून घ्यावयाची आहे तरी ती सांग. त्याच प्रमाणे त्यात भिमांने काय केले तेसुद्धा मला ऐकावयाचे आहे. पांडवांचा राक्षसपुत्र घटोत्कच, नकूल आणि सहदेव त्या वेळी काय करत होते, तेसुद्धा मला ऐकावयाचे आहे. तू एक चांगला कथा वाचक आहेस म्हणून मला तुझ्याकडून ते ऐकावयाचे आहे. त्यावर संजय नम्रपणे बोलतो, मी आता तुम्हाला अलमवुष आणि अभिमन्यू ह्यांचे द्वंद्व सांगितले, त्यावेळी अर्जुनांची काय अवस्था होती तेसुद्धा सांगतो. भिमसेन, नकूल व सहदेव त्यांचे धैर्यशील कार्याचा सुद्धा परामर्‍ष मी घेणार आहे यथावकाश कर्माकर्माने. त्याशिवाय भिष्म, द्रोण आणि कृप ह्याची करामत सुद्धा आपण पहाणार आहोत.

अलमवुष जोराजोराने ओरडत अभिमन्यूवर धावून गेला. अभिमन्यूसुद्धा तसाच ओरडत त्याच्यावर धावून गेला. त्यांच्यात देव आणि दानवा सारखी लढाई जुपली. राक्षसाकडे भ्रमसिद्धी होती व अभिमन्यूकडे दैवी अस्त्रं होती. त्यांच्यामध्ये बाणांच्या बर्षावाचे द्वंद्व सुरू झाले होते. अभिमन्यू अलमवुषाच्या छातीत बाण मारतो. त्यानंतर त्याच्या सगळया प्रमुख इंद्रियांवर तो बाण मारतो. राक्षस रक्ताने भरलेला होतो. राक्षस सुभद्रापुत्रावर लहान बाणांचा वर्षाव करतो. ते बाण अभिमन्यूच्या अंगातून आरपार गेले व जमिनीत घुसले. अभिमन्यूच्या बाणांच्या भडीमारामुळें राक्षस मागे सरकला. त्यानंतर राक्षस त्याची भ्रमसिद्धी वापरण्यास प्रारंभ करतो. त्यामुळें अभिमन्यूच्या पुढे अंधार पसरला, त्याला कांहीं दिसेना. त्या अंधारामुळें कोणीही कांहीं पाहू शकत नव्हते. कोण कोणाला ओलखू शकत नव्हते. मित्र व शत्रू समजतक नव्हते. अभिमन्यूने त्याचे दैवी अस्त्र ज्याला सूर्य अस्त्र सोडले. त्याच्या मुळे राक्षसाचे अंधार करणारे निष्प्रभ ठरले. सगळयाना सगळे दिसू लागले. त्यानंतर सगळे रागावलेले राजे आणि अभिमन्यू राक्षसांवर बाणांचा वर्षाव करू लागले. राक्षस तरीसुद्धा त्याचे भ्रम प्रयोग करत होता व सुभद्रेचा पुत्र ते सगळे निष्प्रभ करत होता. त्यानंतर आपले कांहीं चालणार नाही हे समजल्याने तो त्याच्या रथातून पोबारा करतो. त्यानंतर अभिमन्यू तुमच्या सैन्याचा संहार करण्यास सुरूवात करतो मोठ्या जोमांने. भिष्म पहातो कीं कौरवांचे सैन्य अभिमन्यू उध्वस्त करत आहे, तो त्याच्यावर बाणांचा भडिमारा सुरू करतो. दोघांत द्वंद्व सुरू होते, ते पहाण्यासारखे होते. त्यावेळी अभिमन्यू त्याच्या मामा सारखा तेजस्वी दिसत होता. त्यानंतर अर्जुन त्याच्या मुलाच्या मदतीला जातो. भिष्म अर्जुनाला अडवतो जसे राहू सूर्याला ग्रासतो. तुमचे पुत्र अनेक भिष्माला मदत करण्यासाठी

अर्जुनाला वेढा घालतात. कृप अर्जुनालर बाण मारत असतात. त्यावेळी सत्यकी मध्ये शिरतो व कृपांवर वार करू लागतो. कृपाना तो जबर जखमी करतो. कृप संतापून सत्यकीवर जोरानो कांहीं बाण मारतो. त्याच्या छातीत जखमा होतात. त्यांचे द्वंद्व चालू असतांना मध्येच अश्र्वत्थामा येतो. तो सत्यकीचे धनुष्य मोडून टाकतो. धनुष्य तुटल्यामुळे सत्यकी भाले फेकू लागतो. ते भाले अश्र्वत्थामाला वर्मी लागतात. तो बेहोष होतो. स्वताच्या ध्वजस्तंभाला धरून तो त्याच्या रथाच्या टपावर बसून रहातो. थोड्याच वेळांत तो शुद्धीवर येतो व पुन्हा जोराने सत्यकीवर हल्ला करतो. द्रोणाचा पुत्र सत्यकीचा ध्वजस्तंभ उखडून टाकतो. ते केल्यावर अश्र्वत्थामा मोठ्याने गर्जना करतो. दोनही हाताच्या मुठी छातीवर मारत आनंद व्यक्त करतो. थोड्याच वेळात द्रोणाच्या मुलावर बाणांचा मोठा वर्षाव सुरू होतो जो त्याला झेपणारा नव्हता. आपल्या मुलाला सत्यकी हरवत आहे ते पाहिल्यावर द्रोण त्याचा मदतीला जातात. द्रोण सिनीच्या नातवावर जोराचा वार करतात बाणांचा. त्यानंतर सत्यकी अश्र्वत्थामाला सोडतो व द्रोणांवर लक्ष केंद्रीत करतो. त्या युद्धात कोण सरशी करतो ते ठरणार तेव्हढ्यात अर्जुन सत्यकीच्या मदतीला जातो. त्यानंतर द्रोण आणि धनंजय ह्यांच्यामध्ये तुफान द्वंद्व होते.

युद्धाचा आठवा दिवस भाग अठ्ठ्यांण्णवावा संपला.

# युद्धाचा आठवा दिवस

## भाग नव्व्याण्णवावा

धृतराष्ट्र पुढे विचारतात, मला सांग संजया द्रोण आणि धनंजयामध्ये झालेल्या द्वंद्वाची माहिती. मी विचारण्याचे कारण द्रोण अर्जुनावर प्रेम करत होते कारण तो त्यांचा खास होता इतका कीं त्याच्यासाठी त्या ब्राह्मणांने एका निष्पाप शबर धनुर्धाऱ्याची फसवणूक केली होती. अशा परिस्थितीत शिष्य प्रेम व स्वामीभक्ती ह्यात काय श्रेष्ठ ठरते ते मला पहावयाचे आहे.

संजय सांगतो, ऐका राजे, त्यांचे द्वंद्व युद्ध नितीच्या नियमानुसार होत होते. पार्थ द्रोणांवर एका क्षत्रियाच्या परंपरेनुसार बाण मारत होता. त्यामध्ये पार्थ द्रोणांना तीन बाण वर्मी मारतो. त्याकडे द्रोण दुर्लक्ष करतात. त्यानंतर पार्थ त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करतो. थोडावेळ ते त्याचा गुरू सहन करतो पण त्यानंतर एकदम अग्नी भडकावा असें द्रोण चवताळून पार्थावर हल्ला करतात. द्रण थकलेले वाटत होते ते लक्षात आल्यावर दुर्योधन सुशर्मनला त्यांच्या मदतीसाठी धाडतो. तो त्रिगर्ताचा राजा नव्या उत्साहाने अर्जुनावर चालून जातो. त्याचे सगळे बाण लोखंडी होते. ते बाण धनंजयाच्या अंगात शिरत होते. ते झाल्यावर अर्जुन मोठ्याने गर्जना करत त्यांच्यावर असे बाण मारतो कीं त्यामुळें तो मेला पाहिजे. सुशर्मन व त्याचा मुलगा जीवावर उदार होऊन पार्थाशी लढू लागतात. त्यांच्यामध्ये बाणांचे युद्ध सुरू होते ज्यात एका बाजूस पार्थ व दुसऱ्या बाजूस सुशर्मन व त्याचा मुलगा होते. अर्जुन एकाच वेळी दोघांना आवरत होता. ते एक पहाण्यासारखे युद्ध होते. आकाशात जमलेले देव, दानव, ऋषी ते युद्ध पाहून फारच संतुष्ट झाले. असें युद्ध त्यांना फार पूर्वी झालेल्या युद्धाची आठवण देत होते. अर्जुन वायव्य अस्त्र त्यांच्यावर फेकतो. त्यामुळें वादळी वारे सुरू होतात. त्रिगर्ताचे त्या वादळामुळे अस्वस्थ होतात. त्याना लढणे अशक्य होते. द्रोण ते पाहून सैल्य नांवाचे अस्त्र सोडतात. त्यामुळें वायव्यने सुरू केलेले वारे थांबतात व सगळे शांत होते. तोपर्यंत सुशर्मन व त्याचा मुलगा तेथून निधून गेले होते. त्यानंतर दुर्योधन कृप, अवंतीचे विंद व अनुविंद, अश्र्वत्थामा, सल्य सुदक्षिण, वल्हीक त्याच्या फौजेसह पार्थाला वेढा घालतात. त्यासह भागादत्त, श्रृतयूष भिमाला वेढा घालतात त्यांच्या हत्तीदलाने. भुरिश्रव, साल, शकूनीचा मुलगा उलूक माद्रीच्या देघांना घेराव करतात. त्यांच्यात बाणयुद्ध प्रारंभ होते. भिष्म तुझ्या मुलांसह युधिष्ठीरावर चालून जातो.

भिमाला दिसते कीं भागादत्त व त्याचे सहकारी हत्तीदल घेऊन त्याच्यावर स्वारी करण्यासाठी येत आहेत, भिम ते आव्हान मोठ्या आनंदाने स्वीकारतो व त्याची भलीमोठी गदा घेऊन तयार होतो. भिम आता त्या हत्तींच्या गराड्यात गेला होता. त्यावेळी तो कुतीपुत्र सूर्यासारखा तेजस्वी

झाला होता. गदेच्या प्रहारानी तो त्या हत्ती दलाला इतरत्र पिटाळण्यास सुरूवात करतो. भिमाच्या शरीरावर त्या हत्तींच्या सुळयांचे वळ उठलेले होते. त्यात कांहीं हत्ती मरतात व कांही घायाळ होतात. त्या जखमातून भिमाचे रक्त वाहत होते तो त्या रक्तात नाहून गेला होता. कांहीं हत्तींचे सुळे तो मोटून टाकतो. कांहींच्या डोक्यावर जोराने प्रहार केल्यामुळे ते हत्ती बेहोष होऊन पडतात. तोडलेले सुळे सुर्यासारखे वापरत तो हत्तीना जखमा करू लागतो. त्याची गदा हत्तींच्या रक्ताने भरलेली होती. तो त्याचा अवतार साक्षात रुद्रासारखा होता. त्या हल्ल्यामुळे उरलेले हत्ती पाठी फिरून पळून गेले. तो भिमाचा अवतार पाहून तुमचे सैन्य पुन्हा एकदा रणभूमी सोडून पळू लागते.

युद्धाचा आठवा दिवस भाग नव्याण्णवावा संपला.

## युद्धाचा आठवा दिवस

## भाग शंभरावा

संजय पुढे सांगतो, ती दुपारची वेळ होती. सोमक आणि भिम ह्यांच्यात एक भयंकर सुद्ध झाले. भिष्म पांडवांचे सैन्य धुमधडाक्याने ठार मारत होता. धृष्टद्युम्न, शिखंडी, विराट, द्रुपद, असें सगळे भिष्मावर तुटून पडतात. त्या सगळयांना भिष्म त्याच्या मोठ्या बाणाने जखमी करतो. त्यामुळे तो अपमान समजून ते योद्धे जास्त चवताळतात. त्यानंतर शिखंडी भिष्माला अनेक बाण मारून जखमी करतो. परंतु, शिखंडी स्त्री आहे म्हणून ते कोणत्याह प्रकारचा प्रतिवार करत नाहीत. ते त्या बाणांना सहन करत रहातात. परंतु, जेव्हां धृष्टदुम्न त्यांच्यावर बाण सोडतो तेव्हां आजोबा त्याच्यावर बाणांचा वर्षाव करून त्याची पिछेहाट करतात. तरी द्रुपद भिष्मावर जोराचा मारा करतात. त्यानंतर विराट त्यांना अनेक ठिकाणी जखमी करतात. ते सगळे शिखंडीच्या आडून वार करत होते. अशाप्रकारे अनेक जोरदार बाणाने जखमी झालेले भिष्म त्यांच्या रक्तानेच नाहून गेलेले दिसत होते. असे प्रथमच झाले होते. त्यानंतर गंगाधराने त्या योद्ध्यांवर बाण मारावयास सुरूवात केली. त्यात त्या प्रत्येकाला पांच बाण त्याने मारले परंतु, शिखंडीला एकही बाण मारला नाही. त्यानंतर ते भिष्माच्या सारथ्याला जखमी करतात. ते भिष्माला घेरून मारत आहेत ते पाहिल्यावर पांडवांचे इतर योद्धे द्रौपदीची पांचही मुलं, कैकेया बंधू, सत्यकी, युधिष्ठीर असे सगळे त्यांच्यात सामील होतात व भिष्माला बाण मारू लागतात. ते जसे भिष्माभोवती जमा होतात जसे गिधाडं मरणासन्न जनावराच्या भोवती जमा होतात. त्यावेळी दुर्योधन त्याच्या पलटणींना भिष्माला संरक्षण देण्यासाठी जाण्याचे आदेश देतो. त्यानंतर अक धमासान युद्ध पहावयाला मिळते. त्यात बरेच योद्धे यमाच्या घरी धाडले जातात. त्याच प्रमाणे अनेक घोडे, हत्ती मारले जातात भाल्यांच्या युद्धात. रथाचे घोडे मेल्यामुळें त्यावरील इंद्रासारखे सामर्थ्यवान, कुबेरापेक्षा जास्त श्रीमंत आणि वृहस्पतीसारखे विद्वान असे राजे सामान्य रयते सारखे पायी इकडे तिकडे धावत असतात. माऊत मेल्यामुळे दिशाहीन झालेले अडदांड हत्ती असे धावत होते कीं, त्यांच्या पायाखाली तुमचे व पांडवांचे शूरयोद्धे चिरडले जात होते. त्या हत्तींवरील अंबाऱ्या, झेंडे, अंगावरील जरी भरलेल्या चादरी असें सगळे त्या रणांगणात विखरून पडलेले होते. त्यात विविध देशांचे सैनिक मृत झालेले होते. कांहीं तलवार बहाद्दर त्यांचे घोडे गेल्यामुळें हातात तलवारी घेऊन शत्रूपक्षाच्या सैनिकांना मारत असतांना दिसत होते. ती एक भयंकर लढाई झाली त्या आठव्या दिवशी. रथाच्या चाकाखाली कित्येक सैनिक गेले व त्यामुळें मारले गेले. अशाप्रकारे प्रत्यक्ष युद्धापेक्षा असेंच जास्त लोक मारले जात होते. रणभूमीत असंख्य बाण, धनुष्य, भाले, गदा, ढाली, माणसांची चिलखतं असें बरेच युद्ध साहित्य इतस्ततः पडलेले होते. त्याशिवाय विविध

देशांचे व पलटणींचे ध्वज, त्यांच्या काठ्या, स्तंभ, रथाची मोडलेली चाकं असे बरेच कांही तेथे पसरून पडलेले होते व त्यामुळे त्यांतून पळणेसुद्धा अशक्य झाले होते. प्रेतांचे ढीग जागोजागी पडलेले होते. त्यांतून एकप्रकारची दुर्गंधी बाहेर येत असल्याचे जाणवत होते. मोठ्या संख्येने क्षत्रिय मरत होते त्या युद्धात. तेथे वहाणारी रक्ताची नदी त्या वैतरणा नदीची आठवण देत होती जिच्या किनाऱ्याला सगळे मृत जमा होतात यमाच्या घरी जाण्या आधी. सगळे दोष देत होते कीं दुर्योधनाच्या मूर्खपणामुळे असे क्षत्रिय मारले जात आहेत. कांहीं बोलत होते त्या धृतराष्ट्राच्या लोभीपणामुळें ज्यामुळें त्यांने पंडुच्या सद्गुणी मुलांचा द्वेष केला, तो ह्या नरसंहाराला कारणीभूत आहे. अनेक जण अनेक मतं मांडत होती. सगळे मात्र पांडवांची स्तुती करत होते. दुर्योधनाला गुन्हेगार ठरवत होते. ते भिष्म, द्रोण कृप ह्या सगळयांना दोष देत होते. त्यांची अक्कल कोठे गेली होती असे विचारत होती जनता हस्तिनापूरची. हे सगळे त्या द्युताच्या खेळांतून सुरू झाले. त्याच वेळी भिष्म का नाही कौरवांना आवरू शकले? अहो राजर्षी, आता पहा तुमच्या सत्तेच्या व मुलाच्या लोभामुळें किती माणसं मरत आहेत. त्यात तुमची मुलं सुद्धा मरत आहेत हे कसे झाले? दुर्योधनाला तुमची फूस होती म्हणूनच हे घडले ह्याची प्रामाणिक कबूली आपण देणार कां? जर दुर्योधनाला भिष्माने रोकले असते तर हे झाले नसते मग त्यांनी कां नाही रोकले असे हस्तिनापूरची प्रजा विचारत होती. आता ती नियती होती, असें बोलून आपण पळवाटा शोधणार कां?

युद्धाचा आठवा दिवस भाग शंभरावा संपला.

## युद्धाचा आठवा दिवस

## भाग एकशे एकावा

संजय पुढे सांगत असतो, सुशर्मनाचे क्षत्रिय अर्जुनाच्या मारामुळें यमाच्या घरी पोहोचतात. परंतु, सुशर्मन पार्थाला दखमी करतो त्याच्या बाणांने. तो वासुदेवाला सुद्धा नव्वद बाण मारतो. त्या संहारामुळे उरलेले क्षत्रिय रणभूमी सोडून पळून जातात. पाईक आपल्या हातातीस शस्त्रं तेथेच टाकून जातात. रथी रथ तेथेच टाकून जातात. घोडे हत्ती असें बेवारशासारखे इकडे तिकडे फिरत होते. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात अशी परिस्थिती झालेली होती. सगळे जीवाच्या भितीने पळत होते. राजे मेले होते त्यांचे सैनिक युद्धभूमी सोडण्याचा विचार करत होते. कारण जर राजा नाही तर कशासाठी लढावयाचे व मरावयाचे असा प्रश्न ते विचारत होते. भिष्म व दुर्योधन सुशर्मनाच्या संरक्षणासाठी लढत होते बाकीचे दुर्योधनाला न विचारता रणांगणातून निघून जात होते. कौरवांचे सैन्य आता पहिल्या इतके राहिलेले नव्हते. त्यातील कांहीं युद्धाचा कल पाहून कौरवांची बाजू पडणार हे समजून तेथून निघून जात होते. बरेच तुझे मुलगे आधीच मारले गेले होते, त्यामुळें त्यांचे सैनिक लढण्याच्या मनस्थितीत नव्हते. आपली बाजू सरशीत आहे हे सक्षात आल्यावर पांडवांच्या बाजूचे राजे व सैनिक उत्साहाने धनंजयाच्या नेतृत्वाखाली लढत होते. ते आता भिष्माचा पुन्हा घेराव घालतात. त्यांना फार जोर आलेला होता. योद्धे रणगर्जना करत होते. ताडाचा ध्वजस्तंभ असलेला भिष्माचा रथ पांडवांच्या सैन्याने वेढला होता. तेव्हां भिष्म त्याचे मोठे बाण मारण्यास सुरूवात करतो. त्यावेळी सूर्य उतरणीला लागला होता. कौरव गोंधळलेव्या मनस्थितीत पांडवांशी लढत असतात. सत्यकी कृतवर्मनाला पांच बाणाने भोसकतो व जखमी करतो. द्रुपद द्रोणाला अनेक बाणांने पुन्हा पुन्हा घायाळ करत असतो. भिमसेन त्याच्या पणजोबाला, वल्हीकाला बाणाने जखमी करतो व त्याचा आनंद दाखवण्यासाठी तो जोरांने किंचाळतो. अभिमन्यूला चित्रसेनाने बरेच बाण मारले होते त्याच्या बदल्यात तो अर्जुनाचा मुलगा चित्रसेनाला बाणाने जखमी करतो असे त्यांचे एकमेकांना जखमी करण्याचे सत्र चालू होते. अभिमन्यू चित्रसेनाचे घोडे मारून टाकतो. त्यानंतर तो मोठ्याने गर्जना करतो त्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी. चित्रसेन संतापाने त्याच्या निकामी झालेल्या रथातून उडी मारून खाली उतरतो व दुर्मुखाच्या रथात चढतो. तेथून त्याचे युद्ध चालू रहाते. द्रोण द्रुपदाचे घोडे मारतो त्यामुळें जुन्या वैराला स्मरून तो पांचल नरेश पलटणाचे घोडे वापरून द्रोणावर बाणांचा वर्षाव करतो. भिमसेन वल्हीकाचे घोडे मारतो. त्याचा रथ निकामी करतो. वल्हीक त्याच्या रथातून उतरतो आणि दुर्योधनाच्या रथात चढतो. सत्यकी कृतवर्मनाला हरवल्यानंतर भिष्माकडे त्याचा मोर्चा वळवतो. भिष्म ते पाहून त्याच्यावर एक लोखंडी भाला फेकतो. तो भाला त्याच्या कडे वेगांने येत आहे ते

पाहून सत्यकी थोडा बावचळतो. परंतु, वेळीच सावरत तो त्या भाल्यावर बाण मारून त्याची दिशा बदलतो. एक निश्र्वास घेतो. थोडक्यात बचावलो असें तो स्वतःला सांगतो. सत्यकी तसांच भाला भिष्मावर तितक्याच जोरांने फेकतो. भिष्म तो भाला तोडून उलटवतो. भिष्म चिडला होता तरी हसत हसत सत्यकीवर बाण मारतो नऊ त्याच्या छातीच्या दिशेने. त्या सुमारास युधिष्ठीर सत्यकीला संरक्षण देण्यासाठी त्याचे घोडदल, हत्तीदल घेऊन भिष्माला गराडा घालतो. त्यामुळें एक तुंबळ युद्ध सुरू होते युधिष्ठीर व भिष्मामध्ये. दोघे जिंकण्याच्या इर्षेने लढत होते.

युद्धाचा आठवा दिवस भाग एकशे एकावा संपला.

# युद्धाचा आठवा दिवस

## भाग एकशे दोन

संजय पुढे सांगतो. भिष्माला पांडवाने अशारितीने वेढलेले पाहून दुर्योधन त्याचा भाऊ दुःशासनाला सांगतो, पांडवांनी आपल्या सरसेनापतीला घेरले आहे त्यांला संरक्षण देणे तुझी जबाबदारी असेल. भिष्म वाचले तर ते त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे सगळ्या पांचालांना व पांडवांना आज ठार मारणार आहेत म्हणून त्यांना सांभाळणे फार महत्वाचे आहे. त्यांचे जीवंत रहाणे कौरवांच्या भल्याचे आहे. पुढे तुझा मुलगा त्याच्या भावाला सांगतो कीं, कौरवांचे सैन्य जमा करून भिष्माला वेढा घालणाऱ्या पांडवांवर हल्ला करावा. ते सोपे नाही पण करणे आवश्यक आहे असे ते एकमेकांत बोलत असतात. त्याप्रमाणे तो करू लागतो. शकूनी त्याच्या पलटणी घेऊन, ज्यांच्या हातात तलवारी, भाले, दांडपट्टे अशी आयुध होती, पांडवांवर चाल करतात. त्याच्या पलटणीत घोडेस्वार पाईक दोनही होते. जेव्हां ते हस्सा करून जातात तेव्हां त्यांचे ध्वज वाऱ्याने फडफडत होते ते फारच सुंगर वाटत होते. शकूनीच्या सैन्याचे कपडे देखणे होते. शकूनी सहदेव, युधिष्ठीर व नकूल ह्यांना शह देतो. त्यानंतर दुर्योधन, तुझा मुलगा, दहा हजाराची फौज पांडवांच्या सैन्यावर सोडतो. मोठा गलबलाट एकू येतो. सैनिक लढू लागतात. डोंगरावर वाऱ्यामुळें जेव्हा बांबूचे बन हलल्याने जसा आवाज होतो तसा आवाज त्या रणभूमीवर त्या शस्त्रांच्या, घोड्यांच्या टापांचा, खिंकाळण्याचा असा मिळून येत होता. तो कैरवांकडून झालेला हल्ला पांडवांत, चलबिचल उत्पन्न करतो. युधिष्ठीर व माद्रीची मुलं तो कौरवांचा हल्ला रोकतात यशस्वीपणे. ते तीन पाडव चाल करून येणाऱ्या कौरवांच्या योद्ध्याची मुंडकी उडवू लागतात. मुंडके नसलेली धडं सगळीकडे पडलेली दिसू लागतात. माडाच्या झाडाचे नरळ जमिनीवर पडावेत असें त्यांची मुंडकी धडापासून तुटून पडत होती. त्यामुळे नीर्जीव झालेले ते योद्धे तेथे तडफडत पडलेल दिसत होते. आपला जीव वाचवण्यासाठी त्यांची धडपड पहाण्यासारखी होती अरे राजा. पार्श्र्वभूमीवर रण वाद्ये ज्यांत मोठे झांज, ढोलकी, नगारे जोरा जोरांने वाजवली जात होती त्यांच्या गोंधळात मरणाऱ्या सैनिकांचे करूण रुदन ऐकू येत नव्हते. तो पराजय पाहून तुझा मुलगा फार दुःखी झाला होता. तो सल्याला बोलतो, आपल्या नजरेसमोर तो मोठा पांडव आणि त्याचे सावत्र बंधू आपल्या सैन्याची खुलेआम कत्तल करत आहेत आणि आपण कांहींच करू शकत नाही हे मोठे नामुष्कीचे आहे. त्यांचा नाश केला पाहिजे. तुम्ही व तुमचे मित्र राजे त्यांना आवरू शकले नाहीत तर हे युद्ध आपल्या हातून गेल्या सारखेच समजावे लागेल. मग तुम्हालासुद्धा कांहीच मिळणार नाही, तुमची सगळी मेहनत वाया जाईल. हे युद्ध करण्या मागील जो आपल्या सगळयांचा उद्देश आहे तेसुद्धा संपुष्टात येईल. तुझ्या मुलांचे ते उद्गार ऐकून सल्य पांडवांना आवरण्यासाठी पुढे जातो. तो नव्याने

युधिष्ठीरावर नव्याने हल्ला करतो. पुन्हा जोमाने युद्ध सुरू होते. युधिष्ठीर सल्याला बाणाने घायाळ करतो. नकूल व सहदेव तसेंच करतात. सल्य कांहीं कमी नसतो, तोसुद्धा त्या तिघांना बाणाने जखमी करतो. ते होत असतांना दूरून भिम ते पहातो व तेथे येण्यासाठी निघतो. त्याला सल्याला ठार मारावयाचे असते. तो युधिष्ठीराच्या मदतीसाठी सल्याच्या रथाजवळ जातो. भिमाला कशाचीच भिती वाटत नसते. आता सूर्य मावळतीला लागला होता, त्यामुळें त्या दिवसाचे युद्ध आटोपते घेण्याच्या तयारीला सगळे लागतात.

युद्धाचा आठवा दिवस भाग एकशे दोन संपला.

## युद्धाचा आठवा दिवस

## भाग एकशे तीन

संजय पुढे सांगत असतो, भिष्म रांगाने पांडवांवर बाणांचा वर्षाव करू लागतात. ते भिमाला बारा बाण मारतात. नकूलाला तीन मारतात, सत्यकीला नऊ, आणि सहदवाला सात मारतात. युधिष्ठीराच्या छातीत आणि हातावर असें बारा बाण मारतात. ते धृष्टद्युम्नालासुद्धा बाणांने जखमी करतात. त्यानंतर मोठी गर्जना करतात. त्याच प्रमाणे युधिष्ठीर भिष्मावर बारा बाण फेकतो. त्यावेळी द्रोण मध्ये येतात आणि भिमाला व सत्यकीला प्रत्येकी पांच बाण मारतात. त्या बदल्यात ते पांडवसुद्धा द्रोणांना बाणाने जखमी करतात.

सौवीर, कितव, असे पश्चिम आणि पूर्वेकडील तसेंच उत्तरेकडील व मालवातील राजे, अभिशहा, सुरसेना, सिवी, वसस्ती, भिष्मावर हल्ला करतात कारण बिष्माने त्यांच्या सैनिकांना मारलेले असते. त्यांची अयुध भिन्न प्रकारची होती. त्यात अग्नीबाण प्रामुख्याने होते. ते पांडवांचे दोस्त राजे होते. अशारितीने ते सगळे मिळून भिष्मावर चाल करतात. त्या सगळयांच्या एकत्रित हल्ल्याने भिष्म यत्किंचितही घाबरत नाहीत. तो वृद्ध योद्धा त्या सगळयांना एकटाच झेलत असतो. तो त्या सगळयांचा पराभव करत असतो. भिष्म त्या योद्ध्यांचे हत्ती घोडे मारत जातो त्यामुळे ते रथ हत्ती सोडून जमिनीवर येतात. त्यांच्याकडे असलेली नळीका शस्त्रं कुचकामी ठरतात. लवकरच ते योद्धे समजून चुकतात कीं, ते भिष्माला पराजित करू शकणार नाहीत. त्याच्या धनुष्याच्या टणत्काराने ते दचकूं लागतात. भिष्माचे बाण शत्रूच्या अंगात घुसून मातीत रुतत होते असा त्यांचा वेग व जोर होता. चौदाहजार रथी जे छेड्डी, काशीस, करुष अशा राजांचे होते ते पांडवांसाठी जीव देण्यास तयार होते, भिष्माच्या बाणांच्या वर्षावामुळें यमाच्या घरी गेले होते. असंख्य रथ मोडलेल्या अवस्थेत त्या रणभूमीत पडलेले होते. रथांचे तुटलेले भाग सर्वत्र विखूरलेले होते. त्यात मेलेलेया युद्ध्यांची मुंडकी त्यांच्यावरील चंदनाच्या लेपासह दिसत होती. त्यांच्या गळयातील दागिने सूर्यप्रकाशात चमकत होते. असंख्य शस्त्रं मातीत पडलेली होती. ज्यांचे धनी यमाकडे गेले होते. मेलेले घोडे, हत्ती व त्यांचे तुटलेले अवयव सगळीकडे पडलेले दिसत होते. मोडून पडलेले ध्वजस्तंभ, फाटलेले झेंडे, गळयातील फुलांच्या माळा सर्वत्र इतस्ततः पडलेले दिसत होते, म्हणजे मोठे युद्ध झाले होते हे जाणवत होते. पांडवांचे सैन्य त्या संहारामुळें मोठ्याने आक्रोश करत होते. जे शिरकाड भिष्माने केले होते त्यामुळें ते फारच व्यथीत झालेले दिसत होते. त्या युद्धात बाप मुलाला मारत होता व मुलगा बापाला मारत होता असें भीषण युद्ध ते होते. पांडवांचे अनेक योद्धे त्यांची शस्त्रं टाकून पळून जात होती. त्यांच्या चेहऱ्यावर भय स्पष्ट दिसत होते. ते

पाहून कृष्ण अर्जुनाला बोलतो, "अरे पार्था, ज्या घडीची तू वाट पहात आहे ती येऊन ठेपली आहे. तुला आठवते कां, त्या विराटाच्या सभेत तू बोलला होतास कीं, तू धृतराष्ट्राचे मुलगे आणि द्रोण व भिष्म अशा सगळयांना मारून टाकणार आहेस. ते शब्द खरे करण्याची वेळ आली आहे. क्षत्रियाचे कर्तव्य समजून तू बिनधास्तपणे युद्ध कर". वासुदेवाचे ते उद्गार ऐकून अर्जुन गप्प बसला तो कृष्णाकडे प्रश्नार्थक दृष्टीने पहात राहीला. पार्थ त्याला बोलतो, अशारितीने आप्तांचे मृत्यू घडवून मला नरकातच सत्ता मिळेल. वनवासात जे तपोश्चरण केले त्याचा काय उपयोग झाला. असें बोलून तो माधवाला आश्वासन देतो कीं, मी तू जे सांगशिल ते करणार आहे. तुझ्या आदेशांचे पालन करण्यात आम्हा पांडवांचे भले आहे. मी कुरु घराण्याचे आजोबांना ठार मारणार आहे. कारण, ती तुझी आज्ञा आहे. त्यानंतर जिश्नु माधवाला त्यांचा रथ भिष्माच्या समोर नेण्यास सांगतो. त्यानंतर पुन्हा पांडवांचे बिथरलेले सैन्य गोळा होते व युद्धाच्या तयारीत होते. त्याठिकाणी भिष्म एकाद्या सिंहासारखे आव्हान देत होतो सगळया योद्ध्याना. लवकरच अर्जुनाचा रथ त्यांच्या पुढे जातो. भिष्म त्याच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतात. त्या बाणांमुळें अर्जुनाचे शुभ्र घोडे जखमी होतात परंतु, मोठ्या शिताफीने कृष्ण ते घोडे आवरत असतो. अर्जुन त्याच्या गांडीवातून एक बाण फेकतो त्यामुळे भिष्माचे धनुष्य तुटते. ते त्यांच्या हातातून पडते. भिष्म दुसरे मोठे धनुष्य हातात घेतात. त्यांच्या डोळयात एक वेगळीच चमक दिसते. अर्जुन रागात ते धनुष्यसुद्धा मोडून टाकतो. त्यावर शंतनुपुत्र त्याची वहाव्वा करतात. ते मोठ्याने बोलतात की, "फार छान, फार छान", भिष्म आणखीन एक नवीन सुंदर व मोठे धनुष्य धारण करतात. त्या धनुष्यातून तो अर्जुनाच्या रथावर अनेक बाण मारतात. कृष्ण त्याचे घोडे कसेतरी आवरत असतो. कारण, त्या बाणांमुळें ते घोडे बिचकत होते. रथाचे चक्राकार फिकवण्यामुळे भिष्माचे नेम चुकत होते. कृष्णाचे सारथ्य पणाला लागले होते. दोघांचे बाण एकमेकांना लागत होते. वासुदेव पहातो कीं, पार्थ मनापासून युद्ध करत नाही व भिष्म मात्र त्यांच्या वेगांने युद्ध करत आहेत ते त्याला सहन होत नाही. कृष्ण सारथ्य सोडतो व रथातून उतरतो, मोठी गर्जना करत भिष्माकडे धावत जाऊ लागतो. त्याचे डोळे क्रोधाने लालेलाल झाले होते. त्याच्या हातात फक्त चाबूक होता जे सारथ्याचे शस्त्र असते. त्या चाबकाने तो भिष्माला मारणार होता, कृष्णाचा तो अवतार पाहून पहाणाऱ्यांचे श्वास थांबले होते. तो ओरडू लागला, "भिष्माचा वध झाला, भिष्माचा वध कृष्णाने केला", असे ते प्रेक्षक ओरडू लागले. पितांबर नेसलेला तो पूर्णावतार तो जनार्दन ज्याची कांती सावळी होती, भिष्माकडे धावत होता. ते दृष्य विलक्षण होते राजश्री.

भिष्म तो कृष्णाचा अवतार पाहून आपले धनुष्य बाजूला करून बोलतात, "अहो भगवंत या, माझ्याकडे या, अहो देवांचे देव, शतवतकुळी जन्म घेतलेले साक्षात विष्णू, माझा पराभव करून मला मृत्यू द्या, त्याचीच मी वाट पहात होतो कित्येक वर्षे. आपल्या हातून मरण्याचे मला भाग्य लाभू द्या. अहो गोविंदा, तुला हवे तसे तू मला मारू शकतोस, कारण मी आपला गुलाम आहे चिरंतन. ते त्याचे बोलणे होत असतांना अर्जुन लाजिरवाणा झाल्यासारखा कृष्णाच्या मागे धावत जातो व कृष्णाचे हात पकडतो त्याला थांबवण्याचा प्रयत्न करतो. तरीसुद्धा तो जनार्दन अर्जुनाला दूर ढकलून वेगांने भिष्माकडे जातच रहातो. अखेरीस पार्थ कृष्णाचे पाय पकडतो. हृषिकेशाला तो कसेतरी थांबवतो. अखेरीस अर्जुन कृष्णाचे पाय घट्ट धरतो व त्याच्या पाया पडतो तेव्हां कोठे भगवंत थांबतात. रडकुंड्या आवाजात धनंजय त्याला बोलतो, "अहो सर्वज्ञ केशवा, आपण मला वचन दिले होतके कीं, आपण ह्या लढाईत लढणार नाही, आपल्याला लोक खोटे वचन देणारा समजतील, त्याचे पाप मला लागेल, मी सुद्धा दिलेले वचन पाळून दाखवीन, मी आमच्या पितामहाचा वध करून दाखवीन. मी आमच्या शत्रूमचा नाश करून दाखवीन. मी त्या महारथींना त्यांच्या रथांतून खाली पाडीन. माधव ते ऐकल्यावर कांहीं बोलत नाही. तो पुन्हा त्यांच्या रथात जाऊन बसतो. ते दोघे त्यांच्या रथात चढल्यावर भिष्म हसत हसत, पुन्हा एकदा अर्जुनावर बाणांचा वर्षाव करू लागतो. तुमचे देवव्रत युद्धात असंख्य योद्ध्यांचे जीव घेत होते, त्यानां ते आवडत असावे कदाचित. आता पर्यंत पांडव तुमच्या आघाड्या फोडत होते आता भिष्म पांडवांच्या आघाड्या मोडण्याचे काम करू लागतात. असंख्य सैनिक जीवानिशी जातात. त्या अवतारात भिष्माकडे कोणी पाहू शकत नव्हतं. भिष्म दुर्योधनाला दिलेला शब्द पाळण्याची पराकाष्ठा करत होते. भिष्म पांडवांच्या बाजूच्या राजांना कंठस्नान घालत होते. त्या सुमारास आठव्या दिवसाचा सूर्य क्षितिजाला टेकला होता. सूर्याचे किरण सुद्धा शांत होत होते. तो दिवस संपल्याचे रणवाद्यांनी सुचीत केले, दोनही कडची वाद्ये एका सुरात सांगत होती कीं, सैनिकांनो, आता आपला विश्रांती घेण्याचा समय आला आहे.

दिवसभराच्या मारामारीने थकलेले दोनही बाजूचे योद्धे आवरू लागतात. झपाट्याने अंधार पसरू लागतो. अहो राजश्री, तुमचा मुलगा त्याच्या सल्लागारांबरोबर उद्याच्या लढाईचे ठरवण्यासाठी त्याच्या शामियान्यात जातो.

कोल्हे, लांडगे, गिधाडं, कुत्री आणि त्याबरोबर राक्षस व पिशाच्च त्या अंधारातून रणांगणावर मरून पडलेल्या प्रेतांचा घास करण्यासाठी पुढे सरकत होती.

युद्धाचा आठवा दिवस भाग एकशे तीन संपला.

# युद्धाचा नववा दिवस

# युधिष्ठीर भिष्माला भेटतो

# भाग एकशे चार

संजय पुढे सांगत असतो, त्यांचे युद्ध जोरात चालू असतांना सूर्य मावळला. अंधार पसरू लागला. कोणी कोणाला ओळखू शकत नव्हते त्यामुळें लढाई थांबली व त्याच वेळी युद्ध बंदीचे नगारे वाजू लागले. पांडवांचे लष्कर भिष्माच्या प्रतिकारामुळें इतके घाबरलेले होते कीं, ते रणभूमी सोडून पळू लागले होते. त्यांना थांबवणे युधिष्ठीराला प्रयत्न करतो पण ते सोपे नव्हते. ते कौरवांचे युद्धभूमी सोडून आपापल्या तंबूत गेले. त्या भयानक रात्री पांडव, वृश्नी आणि श्रींजय पुढच्या हालचालीसाठी मसलत करण्यासाठी एकत्र बसतात. कोणत्या हालचाली केल्याने आपले भले होईल त्याच्या वर ते खलबत करतात. भरपून बातचीत झाल्यानंतर युधिष्ठीर ठरवतो कीं, "अरे कृष्णा, भिष्माला आवरणे कोणालाही शक्य नाही. तो तक्षकासारखा विषारी झालेला आहे. त्याच्या शस्त्रांपुढे कोणीही उभा राहू शकत नाही. वरुणदेव, कुबेर असे कोणीही भिष्माच्या बरोबरीला राहू शकत नाहीत. अशी परिस्थिती आहे. त्यामुळें मी दुःख सागरात बुडलो आहे. अशा युद्धापेक्षा मी वनात जाऊन बसणे पसंत करीन. मला युद्ध मुळातच नको होते. भिष्म आम्हा सगळयांना मारून टाकणार आहे. आम्ही वनात होतो ते चांगले होते, जास्त सुखात होतो. अखेरीस जन्म कशासाठी असतो, आत्मानंदासाठी हे तू जाणतोस. त्यासाठी सत्ता कशाला पाहिजे"? "अरे जनार्दना, माझ्या भावांना बाणांच्या जखमा त्रास देत आहेत. त्यातून ते दररोज कसे लढतात ते त्यांना माहीत. माझ्यामते जीवन मौल्यवान आहे, परंतु, ते किती मुष्कील आहे ते आता मला समजत आहे. माझ्या योग्यतेचे काय कार्य आहे ते सांग जे माझ्या क्षत्रिय वर्णाच्या नियमांत आहे".

कृष्ण त्याला बोलतो, "अरे धर्माच्या मुला, तू सत्यवादी आहेस तुला चिंता करणे शोभत नाही. तुझ्या पदरी चार अजिंक्य भावंडे आहेत. अशा परिस्थितीत तू कां असें विचार करतोस. भिष्माची पर्वा करू नकोस, वेळ आली तर मी त्याला मारीन, तू मला ते काम करण्याची आज्ञा करू शकतोस. असे कांहीं नाही, जे मी तुझ्यासाठी करू शकत नाही. भिष्माला युद्धात ठार मारण्याचे काम कांहीं मला विशेष नाही. धृतराष्ट्राच्या समक्ष त्यांचा वध मी करू शकतो. जर फाल्गुनी भिष्माला मारण्यास तयार नसेल तर ते काम मी करीन पण तू असा निराश होऊ नकोस. तुला ह्या युद्धात खात्रीचा विजय देण्यासाठी भिष्माला मारणे अगत्याचे आहे म्हणून ते होईल. माझी हिम्मत पहा जी इंद्राच्या सारखी आहे, त्या म्हाताऱ्याला मी त्याच्या रथातून खाली पाडीन जो नेहमी

सगळयांना बाण मारत असतो. जो माझ्या पांडवांचा वैरी तो माझा वैरी असतो. जे तुझे ते माझे तसें जे माझे ते तुझे आहेत. तुझा बंधू अर्जुन माझा सखा आणि शिष्य आहे. अर्जुनासाठी मी माझ्या शरीराचा तुकडा कापून देईन इतका तो मला प्रिय आहे. त्याच प्रमाणें तुझा भाऊ सुद्धा माझ्यासाठी कांहींही करावयाला तयार आहे असे आमच्यात सख्य आहे. आम्ही एकमेकांचे संरक्षण करण्यास तयार असतो. म्हणून आता मला आज्ञा दे कीं, मी भिष्माला केव्हां व कसे ठार मारू. अरे राजा तुला आठवते कां, उपप्लव्य मध्ये पार्थाने शपथ घेतली होती कीं, तो गंगापुत्राचा वध करेल. ते त्या हुशार माणसाचे बोल लक्षात घे. जर पार्थाने मला सांगितले तर मी त्याला मारीन नाहीतर तो मारेल. त्याला मारणे कांहीं फार अवघड गोष्ट नाही. जर भिष्माने जिश्नुला आव्हान दिले तरच तो त्याला मारू शकतो कारण तसे त्यांच्यात ठरले आहे. पार्था कांहींहीं करू शकतो. तो देवांनासुद्धा भारी जाणारा आहे. तो दैत्य, दानव राक्षस अशा सगळयांना आटपणारा नाही. त्यामुळें भिष्म त्याच्यासाठी कांहीं मोठी गोष्ट नाही. शंतनुचा मुलगा आता मतिभ्रष्ट झाला आहे, त्याची सद्‌बुद्धी नष्ट झाली आहे. त्याला काय करावे व काय करू नये ते समजत नाही".

ते ऐकून युधिष्ठीर बोलतो, तसेंच हो. तुझ्यापुढे कोण टिकणार नाही. मला जे हवे ते नेहमी मिळत गेले आहे. तू नेहमीच माझ्या बरोबर असतोस. अरे गोविंदा, तू माझा नेहमीच संरक्षक झाला आहेस. भिष्म मला म्हणाले होते कीं, मी पांडवांना सल्ला देईन पण लढाई झाली तर मी कौरवांच्यासाठी लढेन. त्यासाठी मला असें वाटते कीं, आपण एकदा भिष्मांना भेटून त्यांच्या मृत्यूची काय कथा आहे ते समजून घेऊया. त्यासाठी आपण सगळे एकत्रपणे आजोबांना भेटण्यास लवकरात लवकर जाऊ. मला खात्री वाटते कीं, ते चांगला सल्ला देतील. त्यानंतर युद्धात मी ते करीन जे ते मला सांगतील. आम्ही जेव्हां लहानपणी आईबापाशिवाय मोठे झालो तेव्हां तेंच आम्हाला काय योग्य व काय अयोग्य ते सांगत होते. मला वाईट वाटते कीं आम्हाला आमच्या आजोबाला मारावे लागत आहे. ह्या क्षत्रिय वर्णाचा धिक्कार असो. संजय सांगतो, ते युधिष्ठीराचे ऐकून कृष्ण बोलतात, मला तुझे हे योग्य वाटते, ते देवव्रत असें आहेत कीं, ते नुसत्या नजरेने शत्रूचा नाश करू शकतात. तू विचारलेस तर ते खात्रीने खरे तेंच सांगतील. त्यांना सल्ला विचारल्यावर त्याप्रमाणे आपण लढाई करू. ते योग्य आहे.

ते ठरल्यावर सगळे पांडव आणि वासुदेव भिष्माकडे जाण्यास निघतात. त्यांच्या शामियान्यात ते शिरतात व त्यांच्यापुढे मान खाली घालून उभे रहातात. भिष्म त्यांचेस्वागत करतात. बोलतात, या बसा, अरे धनंजया, भिमा आणि युधिष्ठीरा आणि माद्रीच्या मुलांनो या तुमचे स्वागत करतो. तुमच्यासाठी मी काय करू शकतो. जरी ते फार अवघड असले तरी ते सांगा. मी ते करण्यास तयार आहे. ते त्यांचे ऐकून युधिष्ठीर आनंदीत झाला. तो आजोबाला बोलतो,

"आपण सगळया गोष्टींत प्रवीण अहात. मला सांगा आम्ही ह्या युद्धात कसे जिंकू. आम्हाला सत्ता कशी मिळेल. हे संहाराचे सत्र कसे थांबेल? मला ते सांगा. मला सांगा, आपल्याला कसे हरवता येईल"? तुम्ही जेव्हां बाणांचा वर्षाव करू लागता तेव्हां कोणीही तुमच्यापुढे उभा राहू शकत नाही. आपल्या पुढे कोणीही लढू शकत नाही. असें सांगा ज्यामुळे आम्ही ही लढाई जिंकू व आमचे राज्य आम्हाला मिळेल आणि आमच्या सेनेचा विध्वंस होणार नाही.

भिष्म सांगतो, "जोवर मी जीवंत आहे, तोवर कोणीही माझ्यावर जिंकू शकत नाही. मला मारावे लागेल तरच तुम्ही जिंकाल. दुसरा कांहीं मार्ग तुमच्यासाठी नाही जिंकण्याचा. मी मेल्यावर सगळे मारले जाणार आहेत. म्हणून तुला जिंकावयाचे असेल तर मी जे सांगतो तसे करावे लागेल. मी नष्ट झाल्यानंतर तू जिंकशिल व तुझे राज्य तुला मिळेल. मला मारण्यातच तुझे अंतीम हित आहे. कारण तशी नियति आहे, पंडुपुत्रा. तू पार्थाला मला मारण्याची परवानगी दे. पुढे भिष्म बोलतो, जोवर माझ्या हातात माझे धनुष्य आहे तोवर मी अजिंक्य आहे परंतु, जर मी ते खाली ठेवले तर मला पार्थ किंवा शिखंडी मारू शकेल. त्याच प्रमाणे, मी ज्याने शस्त्र टाकली आहेत, जो मला सांगतो कीं तो माझा आहे, जो असहाय्य आहे, ज्याचे वळण बायकांसारखे आहे, ज्याला फक्त एकच पुत्र आहे, जो फालतु आहे अशा जणांबरोबर मी लढू शकत नाही. आणखीन सांगतो ते ऐक, जर मी एकादे अशुभ चिन्ह पाहिले तर लढणे बंद करतो. तो शिखंडी मला मारू शकतो. कारण तो सुरूवातीला स्त्री होता. त्याच्या मागे एक इतिहास आहे. त्या शूर योद्ध्याला पुढे करून त्याच्या मागून पार्थ माझ्यावर वार करू शकतो. मला सगळया शरीराला अर्जुन बाणांने छेदून टाकील. मी मरणासन्न अवस्थेत पडीन पण मरणार नाही. कारण अरे कुंतीपुत्रा तुला माहीत आहे कीं, मी इच्छामरणी आहे. मला फक्त दोनच मारू शकतात सगळया तिनही जगात त्या अवस्थेत ते म्हणजे कृष्ण व अर्जुन. विभत्सू त्याची शस्त्र घेऊन माझ्यावर असा हल्ला करील की मी रथातून खाली फेकला जाईन. तसा पडले तरी मला मृत्यू येईल. मला मारल्यानंतर तू सगळे कौरव मारू शकशिल.

संजय पुढे सांगतो, ते ऐकल्यावर पांडव आजोबाला वंदन करून त्यांच्या तंबूत जातात. त्यानंतर गंगापुत्र मरणाच्या तयारीने अर्जुनांकडे पहातो, तो सांगतो, अर्जुन रडकुंडा झाला होता. त्याला त्याच्या हातांने त्याच्या प्रिय पितामहास मारावे लागणार होते. ती कल्पना त्याला सहन होत नव्हती. तो कृष्णाला बोलतो, "अरे माधवा, खरोखरच मी माझ्या आजोबांना मारले पाहिजे कां? ते माझे वडील आहेत. त्यांच्यावर मी वार करावा हे कसे योग्य होईल"? आम्ही लहान होतो

तेव्हां मी त्यांच्या मांडीवर चढण्याचा खेल खेळत असें त्यावेळी माझ्या मळलेल्या पायांने त्यांचे कपडे खराब होत असतं. मी त्यांना बाबा म्हणून हांक मारत असें तेव्हां ते सांगत कीं, ते माझे बाबा नाही तुझ्या बाबांचा बाबा आहे. अशा माझ्या प्रिय पितामहास मी कसे मारणार? अरे माधवा, मी त्यांना नाही मारू शकणार. त्यावर कृष्ण त्याला सांगतो, तू त्यांचा वध करण्याची शपथ घेतली आहेस हे तू विसरू शकत नाहीस. तू पुन्हा पुन्हा तुझ्या क्षत्रिय कर्तव्याचा अपमान करत असतोस. त्यांना रथातून खाली टाकण्याचे काम कर. त्यांना मारल्याशिवाय तुम्हाला यश मिळणार नाही. त्यानंतर तो यमाच्या घरी जाईल. जे भाग्यात लिहीले आहे ते होणारच. भिष्माना इंद्रसुद्धा हरवू शकत नाही. त्यांना बिनदिक्कत मारून टाक. तुला ते सांगतो जे बृहस्पती शक्राला सांगत होते, नितीशास्त्र सांगते की, जर गुणवान वृद्ध तुमचा शत्रू म्हणून तुला मारावयाला आला तर त्याला मारावयाला घाबरू नये. कारण कोणीतरी एक जगणार असते. हे क्षत्रियाचे कर्तव्य आहे. दुसरे असे कीं, शिखंडी भिष्माच्या मृत्यूस कारणीभूत असेल कारण तसे नियतित आहे तू केवळ कारणमात्र असशिल.

संजय पुढे सांगतो, भिष्माच्या परवानगीने त्याचा कशाप्रकारे वध करावयाचा ते निश्चित होते. त्यानंतर सगळे पांडव समाधानाने आपापल्या तंबूत विश्रांती घेण्यासाठी जातात.

युद्धाचा नववा दिवस भाग एकशे चार संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे पांच

धृतराष्ट्र बोलतो, मला सांग संजया, शिखंडी कसा भिष्माच्या पुढे गेला. तसेंच भिष्म कसे पांडवांवर चालून गेले.

संजय सांगतो, सूर्य उगवण्याच्या सुमारास युद्ध प्रारंभाचे नगारे वाजू लागले. झांजा, तुताऱ्या जोरजोराने नांद करू लागले. शंखनाद सगळीकडे गांजू लागले. त्यात आजच्या दिवशी शिखंडी आघाडीला रहाणार असतो. भिष्मांच्या समोर तो जाणार असतो. भिमसेन व अर्जुन शिखंडीचे संरक्षक झाले होते. त्यांच्या मागे द्रौपदीची मुलं होती. त्यांच्या बरोबर अभिमन्यू होता. त्यामागे सत्यकी व चेकीतन होते. त्यांच्या मागहे होता धृष्टद्युम्न. त्यांच्या मागे युधिष्ठीर होते. सर्वांच्या मागे होते नकूल व सहदेव. त्यांच्या मागे विराट त्यांच्या सैन्यासह होते. अशारचनेचे पांडवांचे सैन्य कौरवांवर चालू गेले. त्याच प्रमाणे कौरवांची सेनासुद्धा पांडवांच्यावर चाल करते. भिष्माला तुझे मुलगे संरक्षण देत असतात. त्यांच्या मागे द्रोण होते. त्याना अश्र्वत्थामाची साथ होती. त्यामागे भागादत्त होते. त्यांचे हत्तीदल त्यांच्या बरोबर होते. त्यांच्या मागे कृप, कृतवर्मन, सुदाक्षिणा, जयद्रथ, शकूनी, बृहद्बल अशी व्यवस्था होती. त्याशिवाय इतर अनेक राजे त्यांच्या उरलेल्या सेनेनिशी लढण्यासाठी तयार होते. दररोज प्रमाणे भिष्म आजचे व्यूह तयार करतात. त्यानंतर युद्ध आरंभ होते. त्यामुळें यमाच्या राज्यात आणखीन माणसे फेकली जात असतात.

पार्थ शिखंडीला ठरल्याप्रमाणे आघाडीला ठेवतात. भिष्म त्यांच्या बाणांच्या वर्षावाने असंख्य योद्ध्यांना कंठस्नान घालत असतात. नकूल सहदेव तुझ्या सैन्याचा खत्मा करत होते. दोनही बाजूच्या सैन्याची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होत होती. कित्येक राजे व त्यांच्या सैन्याने आधीच आपली सैन्ये युद्धातून काढून घेतलेली होती. त्यामुळें कुरुक्षेत्र पहिल्या दिवसा सारखे गजबजलेले दिसत नव्हते. पुन्हा एकदा नरसंहार सुरू झाला होता. श्रींजय आणि पांडवांच्या जोरदार माऱ्यापुढे तुझे सैन्य टिकू शकत नव्हते.

धृतराष्ट्र विचारतो, मला सांग संजया, महाबली भिष्म युद्धात काय करत होता. जोरदार हल्ला करणाऱ्या पांडवांचा त्यांने कसा बंदोबस्त केला. त्याने पांडवांच्या व सोमकांच्या फौजांचा कसा खात्मा केला.

संजय सांगतो, मी आपल्याला सांगतो, जेव्हा पांडवांचे योद्धे तुमच्या आजोबांवर तुटून पडले. युधिष्ठीराने तुमच्या अनेक फौजांचा नायनाट केला. त्यात माणसांप्रमाणे घोडे, हत्तीसुद्धा मारले

जात होते. भिष्माला ते सहन झाले नाही. तो मोठ्या ताकदीने पांडवांच्या फौजांवर बाणांचा वर्षाव करू लागला. त्यात पांडव, पांचाल, श्रींजय अशा सगळयाचे सैन्य मार खात होते. पांच पांडव जोरांने युद्ध करत होते ते कौरवांचे घोडे हत्तीसुद्धा मारत होते. सर्वकडे हलकल्लोळ माजला होता. दोनही बाजूंचे सैनिक मोठ्या संख्येने त्या दिवशी सुद्धा मरत होते. सगळे भिष्मावर तुटून पडतात. भिष्म त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने लढत असतात. भिष्म गोल फिरत त्यांच्या बाणांचा वर्षाव करत होते. पांडव त्यामुळें दुःखी झाले होते. शिखंडीचे सैन्य तो सफा करतो. तरी शिखंडी त्यांच्या छातीत तीन बाण मारतो. त्यामुळे भिष्माला फार रांग येतो परंतु, तो कांही करू शकत नाही. तो शिखंडीला पाहून मोठ्याने हसत बोलतो, "तू मला मरलेस तरी मी तुझ्यावर वार करणार नाही. तू खरा स्त्री आहेस म्हणून मी तुझ्याशी लढणार नाही". ते ऐकल्यावर संतापलेले शिखंडी त्याला प्रत्यत्तर देतो, "अरे क्षत्रियवंशाचा नाश करणाऱ्या, ज्यांने परशुरामाला सुद्धा जेरीस आणले त्याच्याशी मी आज दोन हात करणार आहे. मी तुला आज मारणार आहे म्हणून तू आता मरण्यास तयार हो. हे माझे बोलणे ऐकल्यावर तुला काय करावयाचे ते कर. मी तुला सोडणार नाही".

संजय पुढे सांगतो, ते बोलून शिखंडी आणखीन पांच बाण भिष्मावर फेकतो. ते संभाषण होत असतांना अर्जुन शिखंडीला बोलतो कीं, "अरे शिखंडी मी तुझ्या मागून भिष्मावर वार करत रहातो. युद्ध जिंकण्यासाठी अशा सगळया गोष्टी केल्या जातात, त्याची लाज वाटण्याची आवश्यकता नाही. तू आजोबांवर हल्ला करत रहा. त्यावेळी मी भिष्माला मदत करण्यासाठी येणाऱ्या सगळया म्हणजे द्रोण, कृप, दुर्योधन, चित्रसेन, विकर्ण, जयद्रथ, विंद अनुविंद, सुदाक्षिणा, भागादत्त अशा सगळयांना सांभाळीन. त्याशिवाय राक्षस अलमवुषाला सुद्धा आवरीन. तू त्यांची काळजी करू नकोस, तू देवव्रतावर ध्यान ठेव आणि त्याला ठार मार".

युद्धाचा दहावा दिवस भाग  एकशे पांचवा संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे सहावा

धृतराष्ट्र विचारतात, शिखंडी कसा रागाच्या भरात आजोबांच्यावर चालून गेला ते सांग.

पांडवांचे शूरवीर योद्धे शिखंडीला कसे संरक्षण देत होते. भिष्म त्याला कसे तोंड देत होता. मला पटत नाही कीं शिखंडी एकटा भिष्माला तोंड देऊ शकेल.

संजय सांगतो, त्या लढाईत भिष्माच्या धनुष्याला व रथाला कांही झाले नव्हते. ते शत्रूचे पारिपत्य करत होते. तुमचे असंख्य हत्ती व घोडे वापरले जात होते. तो व्रतस्थ क्षत्रिय पांडवांचे सैन्य मारत होता. नेहमी प्रमाणे पांडव व पांचाल त्यांना आटपू शकत नव्हते. त्यावेळी विभत्सू तेथे पोहोचला. तो आल्यावर मोठ्याने गर्जना करतो. अर्जुनाचा तो अवतार पाहून दुर्योधन सुद्धा घाबरला होता. तो भिष्माना बोलतो, "तो अर्जुन आपले सैन्य कापून काढत आहे. बाकीचे सैन्य पळून जात आहे. जसे गुराखी खिल्लार पळवतात तसे अर्जुन कौरवांच्या सैन्याला पळवत होता. त्या कामात भिम त्याला मदत करत होता. सत्यकी, चेकितन, माद्रीची मुलं आणि धैर्यशिल अभिमन्यू हे सगळे कौरवांच्या पलटणीवर पलटणी मारून टाकत आहेत. महाबली धृष्टद्युम्न व राक्षस पुत्र घटोत्कच दुर्योधनाचे सैन्य फोडून काढत आहेत असे तो सांगत होता. ह्याचा अर्थ आपल्या होण्याने काहींच फायदा मला होत नाही. म्हणून तुम्ही त्यांना आवराल तरच काही फायदा होईल. आपणच माझ्या सैन्याचे खरे रखवालदार अहात". असें दुर्योधन भिष्माला बोलतो. ते ऐकल्यावर थोडा वेळ देवव्रत विचार करतो व कांही ठरवल्यासारखे करून दुर्योधनाचे सांत्वन करण्यासाठी बोलतो, "शांत हो मुला, ऐक मी काय सांगतो ते, अरे राजा, दररोज दहा हजार क्षत्रिय मारण्याचे माझे लक्ष्य आहे ते संपवून मगच रणभूमी सोडतो. ते मी आज पूर्ण केले आहे. त्यापेक्षा जास्त क्षत्रियांची मी कत्तल ह्यापुढे करणार आहे आजच्या युद्धाच्या दहाव्या दिवशी. आज मी एकतर मारला जाईन नाहीतर मी पांडवांना मारीन. कोणते तरी एक होईल. तसे करून मी तुझ्या अन्नाच्या ऋणातून मुक्त होईन. मी त्या ऋणासाठी आज युद्धात झोकून देतो".

ते बोलल्यानंतर तो अजिंक्यतारा पांडवांच्या फौजांवर बाणांचा वर्षाव करू लागला. पांडवांच्या फौजा तो मारा सहन करत होत्या. त्या वर्षावात हजारो सैनिक मारले गेले. पांचालांच्या योद्ध्यांची ताकद पणाला लागली होती. त्या कृत्याने भिष्माचे सामर्थ्य सगळयांना समजले. त्यामुळें पांडव घाबरलेले नव्हते. त्याचे श्रींजय भिष्माला तोंड देत होते. भिष्माची तुलना

मेरू पर्वतासारखी करावी लागेल. तुझे मुलगे त्याच्या भोवती उभे होते. ते भिष्माला संरक्षण देत होते. त्यानंतर पुन्हा एकदा दोघात तुंबळ युद्ध प्रारंभ झाले.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे सहावा संपला.

## युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे सात

संजय सांगत असतो. अर्जुन भिष्माचा तो भीषण अवतार पाहून शिखंडीला सुचना करतो कीं, तो भिष्माच्या जवळ जाईल. भिष्माला अजिबात न भिता ते त्याने करावयाचे असते. त्यानंतर अर्जुन त्याला बोलतो कीं, तो भिष्माला त्याच्या रथातून खाली पाडेल. ते ठरल्यानंतर शिखंडी भिष्माच्या जवळ जाऊ लागतो. त्याच वेळी धृष्टद्युम्न, अभिमन्यू ज्यानी सुद्धा अर्जुनाच्या शिखंडीला दिलेल्या सुचना ऐकल्या होत्या ते सुद्धा आजोबाच्या रथाजवळ जाऊ लागतात. त्या प्रमाणे विराट राजा, द्रुपद, कुंतीभोज, भिष्माच्या दिशेने वेगांने जातात. तुझा मुलगा ते सगळे पहात होता. त्याच वेळी नकूल, सहदेव आणि युधिष्ठीर सुद्धा भिष्माच्या रथाकडे जाऊ लागतात. ते पाहून तुझे चांगले योद्धे पांडवांना सह देण्यासाठी पुढे होतात. चित्रसेननाने चेकितनावर हल्ला केला जेव्हां चेकितन भिष्माच्या रथाजवळ गेला होता. कृतवर्मन धृष्टद्युम्नाला अडवण्याचा प्रयत्न करतो. सोमदत्ताचा मुलगा भिमाला अडवण्याचा प्रयत्न करतो. विकर्ण नकुलाला अडवतो. कृप सहदेवाला थांबवण्याचा प्रयत्न करतात. दुर्मुख घटोत्कचावर धावून जातो. तुमचा मुलगा सत्यकीला अडवण्याचा प्रयत्न करत असतो. सुदक्षिणा अभिमन्यूला अडवतो. अश्र्वत्थामा विराटाला अडवण्याचा प्रयत्न करतो. द्रोण द्रुपदाला थांबवण्याचा प्रयत्न करत असतो, त्यात त्यांची धुमश्र्चक्री सुरू होते. दुःशासन अर्जुनाच्या वेगांने जाणाऱ्या रथाला अडवण्याचा प्रयत्न करतो. शिखंडीचा रथ अर्जुनाच्या रथापुढे जात असतो. दोनही रथ वेगांने देवव्रताच्या रथा जवळ जात होते. धृष्टद्युम्न भिष्मावर स्वताच चालून जातो व त्याच्या पलटणीच्या योद्ध्याना न भिता भिष्मावर हल्ला करण्यासाठी जोरांने आवाहन करत असतो. अर्जुन असल्यामुळे भिष्माला घाबरण्याचे कारण नाही असें तो त्याच्या सैनिकांना सांगत असतो. त्याचे ते ऐकून त्याचे सैनिक मोठ्या उत्साहाने भिष्मावर चालून जातात. पांडवांचे सगळेच सैन्य देवव्रतावर चालून जाते. तुझे योद्धे पांडवांच्या योद्ध्यांना अटकाव करत असतात. दुःशासन अर्जुनावर न घाबरता हल्ला करतो. दोघेही तोलामोलाचे योद्धे होते. प्राचीन काळी होऊन गेलेल्या माया व शक्रच्या द्वंद्वासारखे ते होते. दुःशासन पार्थाला तीन बाण व कृष्णाला वीस बाण मारतो. ते दोघे रक्तबंबाळ होतात. दुःशासनाला आणखीन चेव येतो. तो आणखीन बाण मारून अर्जुनाला जखमी करतो. त्यानंतर मात्र जिश्नु त्याच्या गांडीवाने दुःशासनाचा रथ मोडून टाकतो त्यात दुःशासन जायबंद होतो. तुझा मुलगा मरत नाही एवढेच. ते सगळे खूप गमतीशीर वाटत होते पहायला. ते केल्यानंतर पार्थ भिष्माच्या रथाकडे वेगांने निघतो. भिष्माच्या भोवती सगळे पांडव असे गोळा झाले होते कीं, तो त्यात अडकला होता. हे सगळे इतक्या सहजपणे होत होते कारण देवव्रतांना काय होत आहे त्याची

पूर्ण जाणीव होती, जणूकाय त्यांच्या मर्जीनेच ते होत होते. दुःशासन शुद्धीवर आल्यावर पुन्हा अर्जुनाच्या मागे जाऊ लागला. दुःशासन पुन्हा पार्थावर बाण मारू लागला. परंतु, त्यामुळे अर्जुनाला कांहींच दुःख होत नाही.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे सातवा संपला.

## युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे आठ

संजय पुढे सांगत असतो, त्या बाजूला महाबली राक्षस अलमवुष ऋष्यशिंगाचा मुलगा, सत्यकीशी लढत असतो ते सोडून तोसुद्धा भिष्मांना संरक्षण देण्यासाठी तेथे जाऊ लागतो. राक्षसाच्या त्या आगाऊपणामुळें रागावलेला सत्यकी त्याच्यावर नऊ बाण फेकतो. त्यानंतर राक्षस त्याच्यावर पुन्हा नऊ बाण मारतो. मोठ्याने ओरडून त्याला आणखीन आव्हान देतो. सत्यकी जबर जखमी झाला होता परंतु, सच्च्या क्षत्रियाप्रमाणे तो त्या जखमांकडे तुच्छपणे हसत जोरांने राक्षसाला प्रतिआव्हान देतो. त्यावेळी प्रागजोतिषचे भागादत्त त्यांच्या हत्तीने येतात. सिनीचा नातु अलमवुषाला सोडतो व भागादत्ताच्या हत्तीवर बाणांचा वर्षाव करू लागतो. भागादत्त त्याच्या मोठ्या धनुष्यातून एक असा बाण मारतो कीं सत्यकीचे धनुष्य तुटून जाते. सत्यकी कांहीं कमी नव्हता तो दुसरे धनुष्य घेऊन राक्षसावर हल्ला करतो. भागादत्त एक शर सत्यकीवर फेकतो जो पोलादाचा होता व त्यावर सोन्याचा मुलामा होता, त्याची धार निलमण्यांची होती. जणू यमाचा शर असावा असें वाटत होते. सत्यकी भागादत्तावर बाण मारत असतो. भागादत्ताची होणारी पिछेहाट दुर्योधन पहातो व त्याला आधार देण्यासाठी तुझा मुलगा एक मोठे सैन्य सत्यकीवर पाठवतो. तुझा मुलगा समजत असतो कीं, एक सत्यकी मेला तरी पांडव मेले असे आहे. तुमच्या सैन्यातील मोठे योद्धे सत्यकीच्या बरोबर लढू लागतात जसे दुर्योधनाला पाहिजे होते. ते युद्ध भिष्माच्या समक्ष होत असते. परंतु ते त्यात भाग घेत नाहीत. कंबोजचा राजा अभिमन्यूला विरोध करत असतो कारण तो भिष्माकडे जात होता. अभिमन्यू कंबोजच्या राजाला जखमी करतो. सुदक्षिणा अभिमन्यूशी लढत असतो व त्यावेळी शिखंडी भिष्माचार्यांकडे सरकत असतो. राजा विराट, द्रुपद भिष्माच्या रथाजवळ जात असतात. अश्वत्थामा आणि राजा विराट ह्यांच्यात द्वंद्व सुरू होते. त्यावेळी द्रुपद सुद्धा अश्वत्थामावर वार करतात. ते दोघे अश्वत्थामाचे सगळे वार परतवतात. सहदेव भिष्माकडे जात आहे ते पाहून शरद्वताचा कृपाचर्य त्याच्यावर हल्ला करतो. परंतु, तो माद्रीचा मुलगा ते सगळे वार चुकवत जातो. भिष्माला वाचवण्यासाठी कृपा सहदेवाशी लढत असतो. विकर्ण नकूलावर वार करतो. नकूलसुद्धा त्याला अनेक जखमा करतो. त्यांचे द्वंद्व मोठे भीषण होते. दुर्मुख भिष्माना संरक्षण देण्यासाठी पुढे होतो. तो भिमसेनावर जातो. मोठ्यानो ओरडत भिमावर हल्ला करतो. हृद्रीकाचा पुत्र धृष्टद्युम्नाला आव्हान देतो. परंतु, हृद्रीकाच्या कृतवर्मनाला तो घायाळ करून सोडतो. त्याच्या द्वंद्वामुळे आकाशात बसलेल्या देवांना प्राचीन काळी झालेले वृत्र आणि शक्राच्या द्वंद्वांची आठवण येते. भिमसेन भुरिश्रवाला गाठतो. सोमदत्ताचा मुलगा व भिम ह्यांच्यात युद्ध होते. सोमदत्ताच्या मुलांने मरलेले बाण भिम झेलतो त्याला कांहींच

होत नाही. भारद्वजाचा मुलगा द्रोण युधिष्ठीराला भिडतो. द्रोणाला पाहून प्रभद्रक घाबरून जातात. ते द्रोणापुढे निष्प्रभ ठरतात. तुझा मुलगा चित्रसेन चेकितनाला अडवतो. त्यांचा जोर पहाण्यासारखा होता. अर्जुनाला तुझी मुल सर्वप्रकारे अडवत होती परंतु, तो त्याना पुरा पडला. दुःशासन अर्जुनाला अडवण्याची पराकाष्ठा करत होता. त्यावेळी मोठ्या प्रमाणात नरसंहार झाला.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे आठवा संपला.

## युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे नऊ

संजय पुढे सांगत असतो. द्रोण त्यांचा भलामोठा तिरकमटा हातात घेतात. तो इतका प्रभावी होता कीं, त्यातून मारलेला बाण हत्तीलासुद्धा ठार मारू शकतो, पांडवांवर जातो. चारही दिशांचे शकून तो तपासतो व त्याच्या मुलाला बोलतो, "आजचा दिवस आहे, जेव्हां पांडव भिष्माचा वध करण्याचा आटोकाट प्रयत्न करतील. माझ्या भात्यांतून बाण आपोआप बाहेर येत आहेत, माझे धनुष्य आळस दाखवते आहे, माझी इतर आयुध माझ्या आज्ञेचे पालन करण्यास राजी दिसत नाहीत, माझे मनसुद्धा खिन्न आहे. प्राणी व पक्षी घाबरल्यासारखे ओरडत आहेत. गिधाडं फिरत आहेत, सूर्याचे तेज गेलेले आहे, पृथ्वी रडत आहे, सगळीकडे भितीचे वातावरण आहे, कोल्हे लांडगे ओरडत आहेत, धुमकेतू आकाशातून कोसळत आहेत. हि लक्षण क्षत्रियांसाठी चांगली नाहीत. कुरु वंशाची कुलदेवता तिच्या मंदिरात मधूनच हसते, मधूनच रडते, विचित्र प्रकारे नाचते. पांचजन्य व गांडीवाचा टणत्कार सगळी कडे मला ऐकू येत आहेत. ह्याचा अर्थ अर्जुन त्याचे खास शस्त्रं घेऊन भिष्मावर चाल करणार आहे. माझे अंग आकुंचन पावत आहे. ह्याचा अर्थ भिष्म व जिश्नु ह्यांच्या करारी द्वंद्व होणार आहे. त्यासाठी शिखंडी त्याच्या पुढे रहाणार आहे. द्रुपद स्वतः एक अशुभ मनुष्य आहे असें ते त्याला सांगतात. गंगापुत्र त्याच्यावर वार करणार नाही. बहुतेक करून त्याच्या आडून अर्जुन पितामहांवर हल्ला करणार आहे असें दिसते. युधिष्ठीराचा राग, भिष्म व अर्जुनांचे युद्ध आणि माझे त्यात धनुष्य चालवणे हे सगळे अशुभ आहे. त्यामुळे कांहीतरी मोठा धोका मला जाणवतो. अर्जुन एक महान योद्धा आहे, त्याचे शस्त्रविद्येचे ज्ञान अतुलनीय आहे, सगळे शकून त्याच्या बाजूचे आहेत, त्याची प्रखर बुद्धीमत्ता, शौर्य देवांनासुद्धा ऐकणार नाही असें आहे. आज तू त्याच्या वाटेला जाऊ नकोस. इतरत्र जाऊन तू कौरवांसाठी लढत रहा. आज किर्तीन त्याचे स्वर्गीय सामर्थ्य दाखवणार आहे. तो एकटा असंख्य योद्ध्यांना कंठस्नान घालणार आहे. अनेक ध्वज तो खाली पाडणार आहे. ही वेळ नाही कीं, तू त्याच्या समोर जाशिल. पांडवांचे पावित्र्य, वैराग्यवृत्ती, उच्च दर्जाची वागणूक, ब्राह्मणांबद्दलचा आदर ह्या गुणांमुळे ते श्रेष्ठ ठरत आहेत. त्यात भर म्हणजे त्यांच्या संगतीला आहे जनार्दन जेथे नेहमी विजय असतो. आपल्या सैन्यातून दुःखमय आक्रोश मला ऐकू येत आहेत. मी मात्र युधिष्ठीराशी लढण्यासाठी जाणार आहे. त्याची व्युहरचना तोडण्यात मला आनंद वाटेल. त्याच्या फौजांमध्ये अतिरथी, सत्यकी, अभिमन्यू, धृष्टद्युम्न, वृकोदर, माद्रीचे दोघे, आहेत त्यांचे संरक्षणासाठी. त्यातील अभिमन्यू बापासारखा उंच कौरवांवर जात आहे ते पहा जणू दुसरा फाल्गुनीच. आता तू तुझी आयुध घे आणि शिखंडीवर चालून जा. किंवा

भिमसेनावर जा, असा कोण आहे ज्याला त्याचे मुलग लवकर मरावे असे वाटेल? मी क्षत्रिय कर्मात गुंतलो आहे, त्याच प्रमाणे भिष्मसुद्धा आहेत, आम्ही पांडवांचा पराभव करण्यासाठी बांधलेलो आहोत. अरे माझ्या मुलां हे युद्धक्षेत्र म्हणजे यमाचे घर असते किंवा वरुणाचे समज". द्रोण बोलत असतात त्यांच्या मुलाशी.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे नऊ संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे दहा

संजय पुढे सांगत असतो, द्रोणांचे ते ऐकून भागादत्त, कृप, सल्य, विंद, अनुविंद, जयद्रथ, चित्ररथ, विकर्ण, दुर्मुशन, आणखीन दहा तुझे योद्धे त्यांच्या विविध राष्ट्राच्या सैन्यानिशी भिमसेनाशी भिष्माच्या नांवाने लढू लागले. सल्य भिमावर तुटून पडला. कोणी दहा, कोणी नऊ, कोणी पांच असें बरेच बाण भिमावर मारले जात होते. दुर्योधन भिमावर बारा बाण मारतो. भिम मात्र त्या एकेकाला त्याच्या बाणांने पिंजून काढत होता. कोणाला किती बाण मारले त्याची गणती नव्हती. त्यानंतर तो मोठी गर्जना करतो. कृप रागांने भिमाला एक नवीन धनुष्य घेऊन दहा बाण मारतात. त्यामुळें चिडलेला भिम कृपावर बाणांचा वर्षाव करतो. त्याचा त्यावेळी अवतार साक्षात यमाचा होता. त्यानंतर जयद्रथाचे घोडे तो यमाकडे पाठवतो. तो ताबडतोब रथातून उडी मारून खाली उतरतो. जमिनीवरून तो भिमावर अनेक बाण मारत रहातो. भिमसेनाची हिम्मत सल्याला सहन झाली नाही. सल्याला बरे वाटावे म्हणून ते सगळे ज्यांचा उल्लेख आधी मी केला आहे ते भिमावर बाणांचा वर्षाव करू लागतात. भिम सल्यावर जोराचा बाणांचा मारा करतो. ते भिमाच्या रथाचे नुकसान करतात. त्याचा सारथी अशोक फार जखमी होतो. सल्य अशोकाला जखमी केल्यानंतर मोठ्यानी सिंहगर्जना करतो. भिम सल्याला बाणाने बेजार करतो. त्यानंतर तो भागादत्तावर वार करतो. त्यानंतर कृतवर्मनला मारतो. कृपावर चढाई करतो. ते योद्धेसुद्धा त्याला बाण मारत असतात. त्यांत जयद्रथ सामील झाला तो बाण मारू लागला. कृपाने शतघ्नीने युद्ध करण्यास सुरूवात केली. त्याचा कांहींच परिणाम भिमावर झाला नाही. भिमाने ती शतघ्नी तोडून टाकली. भागादत्ताचे सगळे हल्ले भिम उलटवतो. अर्जुन भिमाचा पराक्रम पहातो व त्याला मदत करण्यासाठी त्याच्या दिशेने रथ वळवतो. ते दोघे पांडव एकत्र आले आहेत ते पाहिल्यावर तुझ्या य़ोद्धानी त्यांच्याशा लढण्याचे सोडून दिले.

अर्जुन भिष्माला मारण्याच्या इराद्याने ठरल्याप्रमाणे शिखंडीला त्यांच्या समोर लढण्यासाठी जाण्यास सांगतो. त्यामध्ये ते दोघे तुझ्या दहा जबरदस्त योद्ध्याना मारतात. अर्जुन भिमाशी लढणाऱ्या सगळयांना बाणाच्या वर्षावाने पिटाळतो व भिमाला मदत करतो. दुर्योधन शुसर्मनाला सांगतो कीं तो भिम व अर्जुना ह्यांना आव्हान देईल. त्यावर शुसर्मन मोठी फौज घेऊन भिमावर चाल करतो. त्यांच्यात मोठी लढाई सुरू होते.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे अकरावा

संजय पुढे सांगतो. अर्जुन सल्याला त्याच्या बाणांनी जेरीस आणतो. त्याच बरोबर जयद्रश आणि शुसर्मन, कृप, भागादत्त ह्यांनासुद्धा अडवतो. त्या सगळयात नेहमी प्रमाणे युद्ध होत रहाते. कोणीही मागे हटायला तयार नव्हते. भिम आणि अर्जुन दोन सिंहासारखे लढत होते. असंख्य गाड्या, घोडे नष्ट झाले. योद्धे किती मेले त्याची गणती नाही. अर्जुनाचे सामर्थ्य कमालीचे होते. चमत्कारा सारखे ते सगळे होत होते. तरी कृप, कृतवर्मन, सल्य, जयद्रथ, विंद आणि अनुविंद मात्र युद्धापासून दूर गेले नाहीत. त्यानंतर भिम व इतर पांडव तुझ्या फौजांचा फडशा पाडण्यास सुरूवात करतात. सल्याच्या वर्मस्थानी तो एक बाण असा मारतो किं, सल्य बेहोष होतो. तो शुद्धीवर आल्यावर जिश्नुवर तीन आणि जनार्दनावर नऊ बाण मारतो. ते द्वंद्व होत असतांना द्रोण आणि मगधचा राजा जयत्सेन तेथे दुर्योधनाच्या आदेशानुसार येतात. तेसुद्धा पांडवांशी लढू लागतात. भिमाच्या एका मोठ्या बाणामुळें जयत्सेनाचा सारथी मरतो व त्यामुळे घोडे पिसाळल्यासारखे वेडेवाकडे धावू लागता. द्रोण भिमाला बाण मारतात. नाइलाजाने भिमाला त्याच्या गुरूवर बाणांचा मारा करावा लागतो कारण तो क्षत्रिय धर्म आहे.

अर्जुन शुसर्मनाला अनेक बाण मारतो. त्यामुळे त्यचे सैन्य पळून जाते. भिमाच्या संहारक आवेशामुळे भडकलेले भिष्म, दुर्योधन व बृहद्बल भिमावर जोराचा हल्ला करतात. त्याच वेळी पांडवांची मोठे सेना घेऊन धडष्टद्युम्न भिश्मावर चाल करून जातो. शिखंडी त्यावेळी भिष्मांच्या मागावर असतोच. त्यावेळी सगळे पांडव शिखंडीला आघाडीवर ठेवून व मागून श्रींजय व इतर पांडव भिष्माचा समाचार घेण्यासाठी निघतात. त्यानंतर एक भयंकर युद्ध सुरू होते कौरव आणि पांडवांत. कौरवांचा विजय सर्वस्वी भिष्मांच्या जोरावर होता. धृष्टद्युम्न त्याच्या फैजांना आदेश देतो कीं ते भिष्माच्या पुढे जातील. त्यांच्या सरसेनापतीने आदेस केल्यावर पांडवांचे सैन्य मोठ्या उत्साहाने पुढे सरकते, ते भिष्मावर चाल करून जातात.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे अकरावा संपला.

## युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे बारावा

धृतराष्ट्र बोलतात, "मला सांग संजया, त्या दहाव्या दिवशी शंतनुचा पुत्र पांडवांशी व श्रींजयांशी लढला कां? कौरव पांडवांशी कसे लढत होते"? आता पर्यंत मी तुम्हाला त्याचेच वर्णन करून सांगत आहे व ह्यापुढे सुद्धा आणखीन सांगणार आहे. गेल्या दहा दिवसांत अर्जुनाने तुमच्या बऱ्याच योद्ध्यांना यमाकडे पाठवले होते. भिष्म त्यांनी दुर्योधनाला दिलेल्या वटचनानुसार पांजवांच्या मोठ्या सैन्याचा चुराडा केला होता. भिष्माचे लढणे व अर्जुनाचे लढणे पहाता यश कोणत्या बाजूला जाईल ते सांगता येत नव्हते. नुसत्या नदहाव्या दिवशी दोनही बाजूंचे अक्षरशः हजारो सैनिक मारले गेले आहेत. देवव्रताला लक्षात आले होते कीं, त्याचा काळ समीप आला आहे तेव्हां तो त्याच्या मनाशी ठरवतो कीं, तो ह्यापुढे पांडवांचे सैनिक मारणार नाही. भिष्म युधिष्ठीराला त्याच्या जवळ येतांना पहातो, तेव्हां तो त्याला बोलतो, "अरे युधिष्ठीर, तू मोठे सूज्ञ आहेस, तुझे सगळ्या विषयाचे ज्ञान समर्पक असते, ह्यापुढे मी माझ्या ह्या शरीराने तुझ्या सैन्याचा संहार न करण्याचे ठरवलेले आहे, तुला जर माझा वध करावा असें वाटत असेल तर मी तुला त्याची परवानगी देत आहे. त्यासाठी तुझे पांचाल व श्रींजय लोक त्यांच्या रथातून माझा परामर्श करू शकतात. कारण मी त्यांच्यावर वार करणार नाही. युधिष्ठीर त्यांना विचारतो ते कां ह्यापुढे वध सत्र चालू ठेवणार नाहीत, तेव्हां देवव्रत त्याला सांगतात कीं, त्यांने जेवढे योद्धे मारण्याचे वचन दिले होते दुर्योधनाला तेवढे आतापर्यंत मारून झालेले आहेत व म्हणून ते त्या वचनातून मुक्त झालेले आहेत.

धृष्टद्युम्न ते संभाषण ऐकतो व मोठ्या उत्साहाने त्याच्या फौजा भिष्माच्या सैन्यावर पाठवतो. तो त्याच्या सैनिकांना आश्वासन देतो कीं, आपले सरसेनापती आता जिश्नु झाले आहेत व त्यांच्या संरक्षणाखाली आपण सगळे लढणार आहोत. शिखंडीला आघाडीला ठेवून आपण भिष्माचार्यांचा वध रणार आहोत. आजचा दिवस मोठा आहे. खात्री असूद्या कीं आज आपण भिष्माचार्यांना संपवू शकू. त्यासाठी तुम्हाला भिमसेन संरक्षण देणार आहेत. भिष्माचा पराभव करण्यासाठी ते सगळे अटीतटीचे प्रयत्न सुरू करतात.

तुझ्या बाजूने काय प्रतिकाराची व्यवस्था होत होते आता सांगतो. द्रोण आणि त्यांचे सुपुत्र त्यांच्या फौजा घेऊन त्याशिवाय तुझे मुलगे दुःशासनाच्या नेतृत्वाखाली त्याना मिळतात. शिखंडी भिष्माला पकडण्याचा प्रयत्न करत होता. त्याला छेड्डी आणि पांचाल मदत कत असतात. त्याच्या

पिछाडीला अर्जुन असतो. सत्यकी द्रोणांच्या मुलाला अडवतो. पुरु वंशाचा धृष्टकेतू आणि युधमन्यू तुझ्या मुलाबरोबर त्यांच्यावर चाल करून जातात.

राजा विराट त्याची मोठी फौज घेऊन जयद्रथाला आव्हान देतात. वर्धक्षत्राची वारस तुझ्या चित्रसेनाला आव्हान देतो. युधिष्ठीर त्याचा भलीमोठी फौज घेऊन सल्यावर चाल करतो. भिमसेन पूर्ण तयारीनिशी तुझ्या हत्तीदलावर स्वारी करतो. धृष्टद्युम्न त्याच्या भावासह द्रोणांवर चाल करतो. तुझ्या बाजूचा बृहद्बल त्याच्या मोठ्या ध्वजस्तंभ असलेल्या रथाने अभिमन्यूवर जातो. तुमचा मुलगा त्याचे सैन्य घेऊन शिखंडीवर चाल करतो. त्यांच्यात धुमश्च्चक्री युद्ध होते. त्या युद्धात तुम्हा दोघांचे सैनिक एकमेकात गुंतलेले असतात. त्या लढाईचा आवाज पार मोठा होता. कानठळ्या बसतील असा गोंधळ उडाला होता. त्यात रणवाद्ये भर घालत होती. मरणाऱ्या सैनिकांच्या किंकाळया ऐकवत नव्हत्या. रणाची धूळ उंच आकाशात पसरलेली होती. धनुष्यांचे टणत्कार सगळूकडून ऐकू येत होते. सैनिकांना फेकलेले भाले, शर, बाण आकाशातून जाताना एक वेगळेच नयनरम्य दृष्य दिसत होते. हत्ता हत्ताला भिडलेले होते. पाईक एकमेकांना भोसकत होते. एका मांसाच्या तुकड्यासाठी जसे दोन ससाणे लढतात तसे तुझे व पंडुचे त्या छोट्याशा जमिनीच्या तुकड्यासाठी त्यांच्या समर्थकांसह एकमेकांना ठार माऱ्यासाठी उत्सुक होते.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे बारावा संपला.

## युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे तेरा

संजय पुढे सांगतो, अभिमन्यू तुझ्या मोठ्या सैन्याला आवरत असतो तेव्हां दुर्योधन त्याच्या छातीत नऊ बाण मारतो. त्यामुळे भडकलेला अर्जुनाचा मुलगा त्याच्या रथावर एक प्रभावी शर असा फेकतो कीं, त्याच्यामुळे तो रथ उलटला असता परंतु, तुझा मुलगा वेळीच एक बाण असा मारतो कीं त्यामुळे तो शर मध्येच फाटतो व व्यर्थ ठरतो. ते पाहून चिडलेला अर्जुनाचा मुलगा तुझ्या मुलावर आणखीन बाण मारतो. दुर्योधन व अर्जुनाचा मुलगा ह्यांच्यातील लढाई पहाण्यासारखी होती. द्रोण दुसरी कडे होणाऱ्या लढाईत सत्यकीला घायाळ करतात. एकाच वेळी सत्यकी सिनिचा नातू द्रोण व त्याचा मुलगा अशा दोघाने आवरत असतो. त्याचे युद्धकौशल्य वाखाणण्यासारखे होते, पहाण्यासारखे होते.

तेथे पौरवांचा वंशज धृष्टकेतूला जेरीस आणत असतो. ते दोघे जोराजोराने ओरडत होते. ते लढतांना त्यांचे रथ मोडतात त्यानंतर ते त्यांच्या तलवारी घेऊन जमिनीवर द्वंद्व सुरू करतात. त्याच्या हातात बैलाच्या कातड्याच्या ढाली आसतात. त्यांवर सुंदर असे नक्षीकाम होते. त्यांच्या खड्ग युद्धाची तारिफ किती करू. ते एकमेकांवर पार करतात ते ढालीने रोकले जातात. एकमेकांना ते आव्हान देत लढत होते. कोणी मागे हटायला तयार नव्हते. छेड्डी पौरवावर वार करतो त्याचा खांदा दुखावला जातो. लढता लढता ते दोघे मातीत पडतात. तुझा मुलगा जयत्सेन पौरवाला उचलून घेईन जातो. धृष्टकेतूला पांडवांचे सहदेव, उचलून घेऊन जातो. अशारितीने त्यांचे द्वंद्व संपते. तुझा मुलगा चित्रसेन पांडवांच्या बाजूने लढणारा दुसरा शुसर्मन (कौरवांचा वेगळा) आहे त्याला एक मोठा बाण मारतो. ह्या आऐणि इतर सगळया लढाया भिष्माला संरक्षम देण्यासाठी होत असतात. अभिमन्यू बृहद्वलाला हरवतो व भिष्माच्या आणखीन जवळ जातो.

भिमसेन हत्तीदला आव्हान देतो. ते युद्ध मोठे विलक्षण होते. त्याच्या माराने हत्ती मरून पडत होते तेव्हा त्यांचे चित्कीर ऐकवत नव्हते. मरुन पडलेले हत्ती सावळया ढगांचे ढीग असावेत असे दिसत होते. दुसरीकडे युधिष्ठीर सल्याशी मुकाबला करत असतो. ती लढाई सुद्धा विलक्षण होती. दोघांचे शौर्य वाखाणण्यासारखे होते. जयद्रथ विराटाला आव्हान देत असतो. त्यांचे द्वंद्व पहाण्यासारखे होते. द्रोण धृष्टद्युम्नाला आव्हान देतात. त्यांच्यात एक भयानक युद्ध होते. द्रोण त्याचे एक धनुष्य तोडतो व द्रुपदाच्या मागे लागतो. त्याला आव्हान देतो. त्यामुळें चिडलेला प्रिशताचा मुलगा द्रोणांवर गदा फेकून मारतो. द्रोण ती गदा अनेक तुकड्यात मोडून टाकतो.

प्रिशताचा मुलगा एक शर असा मारतो कीं, द्रोण त्याने गोंधळून जातात. तरीसुद्धा नंतर ते तो शर सुद्धा मोडून टाकतात. अशी द्रैं व प्रिशताच्या मुलात लढाई होते.

अर्जुन भिष्मावर चाल करून जातो व त्यांच्यावर असंख्य बाणांचा वर्षाव करत असतो. चवताळलेल्या हत्तीप्रमाणे जिश्नु भिष्मावर वार करत असतो. मध्येच भागादत्त अडमडतो, तेव्हां त्याला अर्जुन बाणाच्या वर्षावाने अडकवतो. त्यानंतर तो भागादत्ताला घायाळ करतो. त्याच बरोबर कुंतीपुत्र शिखंडीला भिष्माकडे सरकण्याची सुचना करत असतो. त्याला मारून टाक असे मोठ्याने सांगत असतो. भागादत्त युधिष्ठीराला सोडतो व द्रुपदाच्या मागे लागतो. जो भिष्माकडे वेगांने सरकत होता. योग्य संधी पाहून अर्जुन वेगांने भिष्माकडे जातो. ते पाहून पुन्हा सगळे तुमचे योद्धे अर्जुनाला अडवण्यासाठी त्याच्याकडे वेगांने जाऊ लागतात. त्या सगळ्यांना अर्जुन पिटळून लावत लावत भिष्माच्या दिशेने जातच असतो. अखेरीस तो व शिखंडी पितामहांच्या नजिक येतात. जवळ जातांच शिखंडी त्यांच्यावर बाणांचा मारा सुरू करतो. भिष्माचा रथ एक आगीचा बंब असावा असे वाटत होते, त्यांच्या प्रतक्येक बाणातून आग  येत असे. त्याने तो क्षत्रियांचा विध्वंस करत असतो. त्याची सगळी शस्त्रं दैवी होती. कुरु सैन्य सोमकांचा नाश करत असतात. भिष्म त्याच्या बाणांने अजून कांहीं क्षत्रियांचा नाश करतो. त्याच्या हल्ल्यामुळे अनेक रथ मोडून तोडून पडलेले दिसत होते. अनेक नामचंद योद्धे त्यांचे रथ हरवल्यामुळे व कांहीं त्यांची शस्त्रसुद्धा घालवल्यामुळें त्या रणांगणात फालतू झाले होते. अर्जुनाचे सामर्थ्य पहात बसणे एवढेच काम त्याना उरलेले होते. भिष्माचे बाण त्यांच्या शरीरातून आरपार जात होते. बेवारस झालेले असंख्य रथ इकडे तिकडे विनाकारण फिरत होते. आतापर्यंत चौदाहजार कुलीन क्षत्रिय मारले गेले होते व त्याच्या बरोबर इतर क्षत्रिय सुद्धा मारले जात होते. ते सगळे भिष्म करत होते एकटे. त्यात प्रामुख्याने सोमक, काशीस, कुरुष व छेड्डु होते. त्यांच्यासह त्यांचे घोडे व हत्तीसुद्धा मारले गेले होते. भिष्माचा तो अवतार पाहिल्यावर कोणीही समजू शकत होते कीं, त्याचा मृत्यू निश्चित आहे. त्यामुळें एक अर्जुन सोडला तर आतापर्यंत कोणीही त्यांच्यापुढे उभा राहू शकत नव्हता. अर्जुनाचे सारथ्य साक्षात कृष्ण करत होते. दुसरा होता पांचालांचा राजपुत्र शिखंडी. त्याचे सामर्थ्य वाखाणण्या सारखे होते.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे तेरावा संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे चौदा

संजय पुढे सांगत असतो, शिखंडी भिष्माच्या छाताडात बाण मारतो. परंतु, गंगापुत्र फक्त शिखंडीकडे जळजळत्या नजरेने पहातो पण कांहीं करत नाही. त्याचे पूर्वस्त्रीत्व लक्षात घेऊन त्याला कांहीं करत नाहीत. परंतु, शिखंडी त्याचा फायदा उठवण्याचे ठरवतो. त्यावेळी अर्जुन शिखंडीला बोलतो, "मित्रा झटकन त्याच्यावर चाल करून जा आणि पितामहांना जीवे मारून टाक. युधिष्ठीराच्या सगळया सैन्यात भिष्माला सगळ तोंड देऊ शकल असा दुसरा कोणी नाही तुझ्याशिवाय. ते ऐकल्यावर मोठ्या उत्साहाने शिखंडी भिष्माचार्यांवर विविध शस्त्रांनी हल्ला करू लागतो. ते हल्ले दुर्लक्षून भिष्म अर्जुनाकडे लक्ष ठेवू लागतात. ते अर्जुनावर वार करू लागतात. ते त्यानंतर सगळया पांडवांवर बाणांचा वर्षाव करू लागतात. त्या बाणांच्या वर्षावामुळे अनेक पांडव वीर यमाकडे धाडले जातात. भिष्मांच्या बाणांमुळें सगळे आकाश असे भरते कीं, सूर्य दिसेनासा होतो. भिष्माच्या बाणांच्या वर्षावामुळें दोनही बाजूचे योद्धे मारले जात होते. तुझ्या मुलाची, दुःशासनाची हिम्मत पहाण्यासारखी होती. कारण तो अर्जुनाशी भिष्मांना संरक्षण देण्यासाठी मोठी लढाई देत होता. ते पाहून स्वर्गातील ऋषी, देव संतुष्ट झाले. तो एकटा सगळया पांडवांना भारी जात होता. अर्जुनालासुद्धा तो कठीण झाला होता. पांडवांचे कित्येक रथ त्याच्या हल्ल्याने नष्ट झाले होते. अनेक हत्ती त्यांच्या पोटात बाण घुसल्यामुळें घाबरून इतस्ततः पळत होते. एकादा अग्नी तळपत असावा तसा तुझा मुलगा त्या रणभूमीत तळपत होता. अखेरीस इंद्राचा मुलगा त्याच्या शूभ्र घोडे असलेल्या रथाने ज्याचा सारथी कृष्ण आहे, तेथे पोहोचतो. तो दुःशासनाचा पराभव करतो. त्याचा धोका दूर झाला असे पांडवांचे लष्कर समजते तेव्हां तो जिश्नु भिष्माचार्यांवर चाल करण्यासाठी पुढे जातो. अर्जुन तेथे लढत असतांना फार तेजस्वी दिसत होता. शिखंडी त्याचे काम चोख करत होता. त्याचे बाण भिष्माला लागत होते पण ते त्याकडे दुर्लक्ष करत होते. ते त्याच्याकडे पहात व हसत होते. मोठ्या आनंदाने एकादा माणूस मुसळधार हावसात उभा रहातो तसे ते शिख्डीच्या धुंव्वाधार बाण वर्षावाचा स्वीकारत होते. त्याचवेळी ते पांडवांचे सैन्य ठार मारत होते. दुर्योधन त्याच्या सैनिकांना आदेस देतो कीं ते सगळे अर्जुनाला वेढा घालतील. त्यांचे संरक्षण भिष्म करतील. ते ऐकल्यावर कौरवांचे सैन्य तसे करते. दुर्योधन पुन्हा सांगतो, तो आपला सरसेनापती तुमचे संरक्षण करत रहातील. त्यासाठी कोणीही माझा सैनिक युद्धभूमी सोडून पळून जाणार नाही, असें तो बोलतो. तुझ्या मुलाचे ते आवाहन ऐकल्यावर त्याचे सैनिक नव्या उत्साहाने अर्जुनाशी लढू लागतात. विदेही, कलिंगी, दसरेक असें राजे

फाल्गुनीवर तुटून पडतात. त्याश्वाय निशाद, सौवीर, वल्हीक, दरद, हे पश्चिमेकडील त्यात सामील होतात. त्याच प्रमाणे, सलव, अभिगस्त, सुरसेनी, सिवी, वसत, सल्व, शक, त्रिगरास, अमवश्थ आणि केकय हे उत्तरेकडील त्यात असतात. त्यांच्याशी एकटा धनंजय ज्याला विभत्सू म्हणतात तो त्यांने स्वर्गातून आणलेली अस्त्रं व शस्त्रं त्या असंख्य योद्ध्यांचा परामर्ष घेण्यासाठी वापरत होता. त्या देवांच्या आयुधांमुळें कौरवांचे सैन्य किडे माकोड्या सारखे मारले जात होते. स्वर्गातील मंडळी त्यामुळे फार संतुष्ट होत होती. कौरवांचे ते दोस्त त्या अस्त्रां पुढे हार मानतात. ती रणभूमी त्या मेलेल्या योद्ध्यांच्या मुडद्यांनी भरलेली होती. त्यात माणसांप्रमाणे हत्ती, घोडे सुद्धा होते. रक्ताचे पाट वाहू लागले होते. त्यानंतर अर्जुन दुःशासनाचे घोडे व सारथी मारून टाकतो. विविंगसतीचा रथ तो तोडून टाकतो. कृपांना घायाळ करतो, त्याच प्रमाणे विकर्ण,सल्य ह्यांचीसुद्धा तशीच गत करतो. त्याचे रथ व इतर सामुग्री नष्ट झाल्यामुळें ते योद्धे रणांगण सोडून पळू लागतात. त्या धावपळीत धावणारे हत्ती व घोडे अनेक योद्ध्यांना पाया खाली तुडवतात,त्याने कित्येक मरतात. सगळीकडे किंकाळया ऐकू येत होत्या. मारलेल्या योद्ध्यांच्या अंगावरील दागिने जमिनीवर विखूरलेले दिसत होते. त्यात सोन्याच्या दागिन्याचे प्रमाण जास्त होते. मोडून तोडून गेलेले रथ जिकडेतिकडे अस्ताव्यस्त पडलेले होते. मेलेल्यांचे मांस खाण्यासाठी रानटी कुत्री, कोल्हे, लांडगे, गिधाडं त्यांचे आवाज करत रणभूमीकडे येत असलेले दिसत होते. त्यात नरमांस खाणारे राक्षस, पिशाच्च क्षितीजावर उभा दिसत होती. त्यांचे रडण्यासारखे किळसवाणे आवाज अंगावर कांचां उभा करत होते. त्यावेळी भिष्म कुंतीच्या मुलाकडे वेगांने जातो. त्याची दैवी आयुध त्याने काढलेली असतात. ते पाहून शिखंडी भिष्माकडे जातो. शिखंडीला येतांना पाहून भिष्म त्याचे अग्नी अस्त्र पाठी घेतो म्हणजे शिखंडीला ते लागत नाही. कारण त्याला शिखंडीला मारावयाचे नसते, त्याच्या व्रता प्रमाणे ते आवश्यक होते. त्यावेळी कुंतीचा सुपुत्र तुझ्या सैन्याचा फडशा पाडतो जे भिष्माला संरक्षण देत होते. त्यामुळें आता भिष्म उघडा पडला होता.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे चौदावा संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे पंधरा

संजय पुढे सांगत असतो, दोनही बाजूंचे लढवय्ये एकमेकासमोर उभे राहिले तेव्हां त्याचे लढम्याचे नियम बदलले होते. साधारणपणे एकाच प्रकारचे लढण्याचा नियम युद्ध शास्त्रात दिला आहे परंतु, आता ते योद्धे तो नियम धाब्यावर बसवतात व एकमेकांशी कोणीही कसेही लढू लागतात. ते वेड्यासारखे एकमेकांच्या उरावर बसतात. ते मरण्यासाठी लढत असतात. हातापाई चालू होते. बाणांपेक्षा तेंच त्याना जास्त चांगले पाटू लागले असावे. त्यामुळें त्यांच्यावर मोठी अरिष्टे ओढवतात. हत्ती सगळया पाईक सैनिकांना अक्षरशः त्यांच्या पायाखाली तुडवू लागतात. त्याच्या युद्ध कौशल्याला फारसे महत्व रहात नाही. कृप, चित्रसेन, दुःशासन, विकर्ण पांडवांच्या सैन्याचे तीन तेरा वाजवतात. पांडवांचे सैन्य सैरावैरा पळू लागते. जशी तुफानात अडकलेले जहाज वेडेवाकडे हलत रहाते तशी गत त्यांची झाली होती. जे त्यांचे होत होते त्यापेक्षा कांहीं वेगळी परिस्थिती तुमच्या सैन्याची नव्हती. पार्थ तुमच्या फौजा कापून काढत होते. तुमचे अनेक हत्ती पांडव मारत होते व त्यांच्या प्रचंड धुडाखाली कित्येक तुमचे सैनिक मारले जात होते. पुन्हा एकदा सगळीकडे मृत शरीरांचा ढीग लागलेला दिसू लागला. दुर्योधन पुन्हा पितामहांना भेटतो. तो त्याचे सैन्य आघाडीला पाठवतो. पांडव जुने वैर न विसरता तुमच्या मुलांचे जीव घेण्यात गुंतलेले दिसत होते. धृष्टद्युम्न त्याच्या सैनिकांना बोलतो, "अहो सोमकानो, श्रींजयानो, भिष्मावर चालून जा. ते एकच आपले ध्येय आहे. ती आज्ञा नझाल्याबरोबर ते सोमक आणि श्रींजय भिष्मावर चालून जातात जरी ते सगळे बरेच जखमी झालेले होते. आता त्यांना फक्त स्वर्गाची स्वप्ने पडत होती. अशाप्रकारे हल्ला झाल्यावर भिष्म चिडतात व श्रींजयांवर बाण फेकावयाला सुरूवात करतात. भिष्माला भार्गवाने जे शिक्षण दिले होते ते तो आता वापरत होता. त्या तंत्रानेच तो भिष्म दररोज हजारे सैनिक मारत होता. आजच्या दहाव्या दिवशी एका हाताने तो दहा हजार योद्धे स्वर्गात पाठवतो. त्या शिवाय मत्स्य आणि पांचालांचे मोठे योद्धे तो पराभूत करतो. अशारितीने त्याने पांडवांच्या सैन्याची संख्या खूप कमी केलेली असते. भिष्माच्या जवळ जे जात ते सगळे तो यमाकडे पाठवत होता. भिष्म कौरवांच्या सैन्याच्या आघाडीत होते. आज दहाव्या दिवशी ते दोनही सैन्यांच्या मध्ये होते व त्यांचे तेज मध्यान्हीच्या सूर्यासारखे असहय्य होणारे होते. जसे शक्र दैत्यांना भादून काढत असे तसे गंगापुत्र पांडवांना भाजून काढत होते. त्यावेळी देवकीपुत्र कुंतीपुत्राला बोलतो, तेथे पहा तो शंतनुचा मुलगा दोन सैन्याच्या मधोमध आहे. हे वेळ आहे तुझी हिम्मत वापरून तू त्याचा वध करू शकशिल. जेव्हा तो त्या जागेवरून हलेल तेव्हां तू

त्याचे बाण झेलत वार करावयाचा आहे. त्याच वेळी अर्जुन त्याच्या बाणांच्या वर्षावाने त्याला व त्याच्या रथाला व घोड्याना अदृष्य करतो, परंतु, भिष्म त्याला दाद देत नाही. पांडवांचे सगळे रथीमहारथी जसे, धृष्टकेतू, भिमसेन, धृष्टद्युम्न, नकूल, सहदेव, केकया बंधू, सत्यकी, चेकितन, अभिमन्यू, घटोत्कच, द्रैपदीची पांचही मुलं, शिखंडी, कुंतीभोज, विराट थकलेले असतात भिष्माचा बाणांचा मारा सहन करत. पांडवांच्या क्षेत्री दुःखाचे सावट पसरते. तरी फाल्गुनी त्याना त्यातून काढण्यात यशस्वी होतो. आता परिस्थिती पाहून अर्जुन भिष्माचार्यांवर एकटाच चढाई करतो. त्यासाठी तो प्रथम भिष्माच्या बरोबर असलेले सगळे मारून टाकतो. आता भिष्म एकटाच रहातो. त्यावेळी तो व सत्यकी, चेकितन, धृष्टद्युम्न विराट द्रुपद,नकूल व सहदेव, अर्जुनाच्या मागेमाग त्याच्यावर हल्ला करतात. अभिमन्यू, द्रौपदीची पांच मुलं, त्यांच्या सामील होतात. ते सगळे प्रवीण धनुर्धारी भिष्माला सगळ्या बाजूने बाणाने जखमी करत रहातात. ते होत असतांना भिष्म न घाबरता पांडवांच्या गोटात घुसतो. तो सारखा शिखंडी कडे पहात व हसत असतो. तो त्याच्यावर एकही बाण मारत नाही. त्या ऐवजी ते भिष्म द्रुपदाचे सात महारथी मारून टाकतो. त्यावेळी मत्स्य, पांचाल आणि छेड्डी गोटातून विचित्र प्रकारचे ओरडणे ऐकू येते. ते सगळे जीवावर उदार होऊन भिष्मावर प्राणघातक हल्ला करण्याच्या तयारीत होते. ते त्या एका भिष्मावर यशस्वी चढाई करतात. भगिरथाचा भिष्म तो सगळ्या शत्रूनां भाजून काढणारा व ते पांडवांचे वीर अशी लढाई सुरू होते. शिखंडीच्या आडून तो भिष्मावर बाणांचा मारा करू लागतो. मध्येच शिखंडी असल्याने भिष्म अर्जुनाला बाण मारू शकत नव्हता. ते भिष्माला असंख्य जागी बाणांने जखमा करत असतो.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे पंधरावा संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे सोळा

संजय पुढे सांगत असतो, शिखंडीटी ढाल करून अर्जुन गंगापुत्राला जखमी करत असतो. त्यावेळी सगळे श्रींजय एकत्र येऊन त्याच्यावर संघटीतपणे वार करू लागतात. ते त्यासाठी बाणापेक्षा भाले, कुर्हाडी, सोटे, गदा अशी शस्त्र वापरत होते. त्याशिवाय धारदार बाण सुद्धा वापरले जात होते. अग्नीबाणांचा वापर त्यावेळी ते भिष्मावर करू लागले होते. अशा चौफेर होणाऱ्या हल्ल्यामुळे भिष्माचे अभेद्य चिलखत फाटून गेले होते. तरी त्याला दुःख झाल्याचे दिसत नव्हते. त्या ऐवटी ते त्या मारेकऱ्यांना युगांताच्या वेळी दिसणाऱ्या अग्नी सारखे वाटत होते. भिष्म त्या गाड्यांच्या मधून भरकटत जात असलेला दिसत होता ज्या त्या राजांच्या होत्या जे त्याला मारत होते. त्यानंतर तो पांचाल व धृष्टकेतू सोडून पांडवांच्या गोटात येतो. तो सहा पांडव योद्ध्याना बाणाने जखमी करतो. त्यात सत्यकी, भिम, धनंजय, द्रुपद, विराट आणि धृष्टद्युम्न होते. भिष्माचा तो मारा होत असतांना ते न डगमगणारे योद्धे त्याचा पिच्छा सोडत नाहीत. एक बाण भिष्माच्या अंगात खोलवर घुसतो. अर्जुन शिखंडीच्या मागे राहून भिष्माचे धनुष्य तोडून टाकतो. ते होत असतांना तुझ्या गोटातील द्रोण, कृप, कृतवर्मन, जयद्रथ, सल्य, साल, भागादत्त, भिष्माना संरक्षण देण्यासाठी येतात परंतु, अर्जुनाच्या पुढे त्यांचा टिकाव लागत नाही. त्या सगळयांकडे दैवी आयुध होती. मारा, झोडा, भोसका अशा आरोळया ऐकू येत होत्या. त्यावेळी पांडवांचे सैन्य त्यांच्यावर तुटून पडते. ते अर्जुनाला संरक्षण देत असतात. त्यामध्ये होते सत्यकी, धृष्टद्युम्न, भिमसेन, विराट, द्रुपद आणि राक्षस घटोत्कच होते. त्यात पुढे होता अभिमन्यू. ते सात तेजस्वी योद्धे त्यांची धनुष्ये घेऊन वेगांने कौरवांवर चाल करतात. एक भीषण युद्ध होते. जसे देव व दानवांत प्राचीन काळी होत असे. शिखंडी मात्र त्याचे ध्यान भिष्मांवर ठेवून होता व त्याला अर्जुन संरक्षण देत होता. ते दोघे भिष्माला सतत बाणांने जखमी करत होते परतु, त्याना त्यामुळे कांहींच होत नव्हते. भिष्माचे धनुष्य मोडले जाते, त्यानंतर त्याचा सारथी जखमी होतो. गंगापुत्र दुसरे जास्त मजबूत धनुष्य घेतो पण तेसुद्धा ताबडतोब अर्जुन तोडून टाकतो. तो सव्यसांची भिष्माची धनुष्ये तोडत असतो व भिष्म नवीन धनुष्य काढत असतो. शेवटी संतापलेले भिष्म एक प्रभावी शर अर्जुनावर फेकतात. अर्जुन तो शर सुद्धा तोडून टाकतो. ते पाहून भिष्म संतापले. ते ओरडून बोलतात मी एका बाणांने सगळे पांडव मारू शकतो पण त्यांच्याकडे जनार्दन आहे. त्याच्यामुळे मला ते करता येणार नाही. पाडव कधीच अशाप्रकारे मारले जीणार नाहीत हे मी जाणून आहे. परंतु, माझ्या पित्यामने मला दोन वर दिले आहेत त्यातील एक आहे कीं, माझा मृत्यू माझ्या हातात असेल व दुसरा आहे किं, माझी मरणाची वेळ मी ठरवणार आहे. त्या दोन वरांचा उपयोग

करण्याची वेळ आली आहे. ते तो बोलतो ते आकाशातील ऋषी व वसु ऐकत असतात. ते त्याला दुजोरा देतात. ते त्याला अनुमोदन देत आहेत असे सांगतात. ते त्याला सांगतातकीं, आता त्याने युद्धातून बाहेर येण्याची वेळ आली आहे. त्याचा जाण्याचा काळ समीप आला आहे. ते ऐकू आल्यानंतर स्वर्गातून सुगंध पृथ्वीवर पसरू लागला. सगळी शुभलक्षणं दिसू लागली. वातावरणात वाऱ्याबरोबर सुगंध परू लागला. ते त्या स्वर्गस्थ मंडळींचे उद्गार फक्त भिष्म व मी ऐकू शकत होतो. मला दिलेल्या वरामुळें मी ते ऐकू शकत होतो. त्यावेळी भिष्म त्याच्या रथातून खाली पडले. ते उठतात व विभत्सूवर चाल करतात. त्यांना शिखंडी त्या अवस्थेत सुद्धा बाण मारत असतोच. मारलेले बाण त्यांच्या चिलखतातून आरपार गेलेले होते. त्या कोणत्याही गोष्टींचा भिष्मावर कांहीं परिणाम झालेला दिसत नव्हता. विभत्सू त्याचे गांडीव काढतो व हसत हसत गंगापुत्रावर नेम धरतो. ते बाण भिष्माच्या वर्मी लागतात. भिष्म तरीसुद्धा लढत होते. अर्जुनाचा प्रत्येक वार ते उलटवत होते. फक्त शिखंडीच्या बाणांना भिष्म उत्तर देत नव्हते. अर्जुन पुन्हा एकदा भिष्माचा तिरकमटा तोडून टाकतो. अर्जुन तीन बाण त्याच्या रथाला असे मारतो कीं त्याचा रथ हादरतो. भिष्म आणखीन एक धनुष्य घेतो ते सुद्धा अर्जुन तोडतो. अशारितीने भिष्माची सगळी आयुध तो निकामी करत असतो. त्यानंतर भिष्म अर्जुनाशी न लढण्याचा निर्णय घेतो. त्यावेळी भिष्म दुःशासनाला सांगतात, "अरे दुःशासना, तो पार्थ रागांने माझ्यावर वार करत आहे. तो इंद्रालासुद्धा ऐकणारा नाही. माझे बघशिल तर देव, दानव, राक्षस, सगळे एकत्र आले तरी मला हरवू शकणार नाहीत मग माणसांची काय कथा"? ते असे दुःशासनाशी बोलत असतांना अर्जुन शिखंडीच्या मागून एक जबरदस्त बाण भिष्माला मारतो. भिष्म पुन्हा दुशासनाला हसत हसत बोलतात कीं, "हे बाण अर्जुनाचे आहेत, ते शिखंडीचे नाहीत.त्या बाणांच्या स्पर्शाने समजते कीं, ते ब्राह्मणाच्या दंडासारखे तेजस्वी आहेत. इंद्राच्या वज्राची शक्ती त्यांत आहे. त्यांच्या स्पर्शाने सुद्धा कोणी नष्ट होईल. माझ्या शरीरात घुसणारे बाण शिखंडीचे नाहीत. तरी ते मला कांहीं बाधा करू शकत नाहीत. सगळे पृथ्वीचे राजे एकत्र येऊन जरी माझ्याशी लढले तरी मला हरवणे शक्य नाही. ते बोलत असतांना तो पांडवांवर एक शर पार्थावर फेकतो. पार्थ तो उडवून लावतो. भिष्म आता रथातून उतरू लागतात. त्यांच्या हातात तलवार व ढाल होती. अर्जुन त्यांची ढाल तोडून टाकतो.त्या ढालीच्या ठिकऱ्या उडतात. ते पहाण्या सारखे होते. युधिष्ठीर ते पहातो व त्याच्या सैनिकांना भिष्मावर चाल करण्याची आज्ञा करतो. बोलतो, "धावा गंगापुत्राला धरा, अजिबात घाबरू नका". पांडवांये योद्धे विविध प्रकारची आयुधं घेऊन त्या एकटा पडलेल्या भिष्मावर हल्ला

करतात. त्यावेळी पांडवांच्या गोटातून मोठा गदारोळ ऐकू येतो. ती दहाव्या दिवशीची लढाई फारच भीषण होती. भिष्म व अर्जुन एकमेकाला भिडतात. जशी नदी सागराला मिळते.

भिष्माना त्यांच्या सर्वांगावर बाण लागलेले असतात. त्याने त्या एका दिवशी दहा हजार योद्धे मारलेले असतात. त्यावेळी भिष्माला मदत करण्यासाठी आलेले पूर्वे कडील, पश्चिमा कडील, उत्तरे कडील व दक्षिणे कडील सगळे राजे त्यांच्या सैन्यासह तेथून पोबारा करतात. सल्य, सल्व, त्रिगर्त, अमवश, कैकेया असे कौरवांचे खास राजेसुद्धा भिष्माला सोटून जातात. तो एकटा पडतो. अर्जुन कौरवांच्या सगळया योद्ध्यांचे पारीपत्य करतो. "धरा, कापा, मारा, तुकडे करा, अशा आरोळया ऐकू येत होत्या.

भिष्माच्या अंगात असा भाग नव्हता जेथे बाण घुसलेला नव्हता. अशारितीने तुमचे पितामह छिन्नभिन्न झाले होते. त्या अवस्थेत अखेरीस भिष्म त्यांच्या रथातून खाली पडतात.

त्यावेळी संध्याकळ झाली होती. भिष्म पडल्याचे पाहून सगळे आकांत करतात. आकाशातून सुद्धा आक्रोश ऐकू येतात. त्यांचे सते पडणे पाहून कोणालाही वाईट वाटले असते. ते दृष्य विदारक होते. सगळी पृथ्ली हादरली होती. त्यांच्या अंगाला इतके बाण रुतलेले होते की, ते त्या शरपंजरी पडले. तो काळ दक्षिणायनाचा आहे व त्या काळात देह त्याग करणे उचीत नसते असें शास्त्र सांगते असे सगळे बोलतात. भिष्माला ते माहीत होते म्हणून ते त्यांचा जीव धरून ठेवतात. भिष्म आकाशातील देवांना सांगतात की, ते उत्तरायमनापर्यंत जीवंत रहाणार आहेत. गंगानदीला ते समजते कीं, तिचा मुलगा शरपंजरी पडला आहे. गंगा मानससरोवराकडून कांहीं ऋषी तिच्या मुलाला पहाण्यासाठी पाठवते. ते राजहंसाच्या रुपात तेथे येतात व भिष्माला शरपंजरी पडलेले पहातात. ते त्याच्या भोवती प्रदक्षिणा करतात. नंतर ते एकमेकांत बोलतात, "उच्च दर्जाच्या माणसाने दक्षिणायनात मरणे योग्य नाही". भिष्म त्यांचे ऐकतो व बोलतो, "मी ह्या अशुभ काळी मरणार नाही, त्याबद्दल निश्चिंत रहा. कारण तो माझा निर्णय आहे. मी माझ्या पूर्वजांच्या ठिकाणी उत्तरायनातच जाणार आहे. माझ्या पित्यानू जो वर मला दिला आहे त्याचा उपयोग आता मी करणार आहे.

भिष्म गेले हे कौरवांना समजते. त्यांची वाचा बंद होते. ते त्यांना अशक्य वाटत होते ते घडलेले होते. तो मानसिक धक्का कौरवांना पेलण्यासारखा नव्हता. ते अचंबित झालेले जागच्याजागी उभे असतात. युद्ध थांबलेले होते. भिष्म गेल्याच्या वार्तेने पांडवांच्या गटात

समाधान दिसत होते परंतु, ते सगळयांचे पितामह असल्यामुळें त्यांना त्यांचा जुन्या आठवणी येत होत्या.

कांहीं बोलतात आता कौरवांचा नाश निश्चित होणार. पांडवांचे शंखनाद करू लागतात. सोमक, पांचाल सगळे आनंद व्यक्त करतात. हजारे तुताऱ्या वाजू लागतात. नगारे पिटले जातात. आनंद व पितामह गेल्याचे दुःख अशा दुहेरी मनस्थितीत पांडव होते.

दहावा दिवस संपत आला होता. आकाशातून ऋषी व पितर भिष्माचे स्वागत करत होते. त्यावेळी भिष्म मात्र उपनिषदात दिलेले योग करण्यात गुंलेले दिसत होते. ते ध्यानात गेले होते. त्यांचा जाण्याचा क्षण येई पर्यंत ते तसेंच त्या शरपंजरी निजलेले रहाणार होते. त्यांच्या भोवती मेलेल्या योद्ध्यांची कलेवरे विखरून पडलेली होती.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे सोळावा संपला.

# युद्धाचा अकरावा दिवस

## भाग एकशे सतरा

धृतराष्ट्र विचारतात संजयाला, "अरेरे, संजया असे कसे झाले, आता माझ्या सैन्याची काय परिस्थिती आहे ते सांग. अरे संजया, जेव्हां त्यांचे सरसेनापती भिष्म अशा रितीने पराजिय झाले तेव्हां काय झाले"? मला तरी वाटत होते की, सगळे कुरु पांडवांकडून मारले जाणार आहेत जेव्हां भिष्म द्रुपदाच्या मुलावर (शिखंडी) वार करत नाहीत. माझ्या सारखा दुर्दैवी मींच कारण, मला माझ्या पितामहांच्या वधाचे ऐकावे लागत आहे. त्यापेक्षा मोठे दुःख नाही. मला वाटत होते कीं ते कधींच हरणार नाहीत. परंतु, भिष्माच्या निधनाच्या वृत्ताने मी खिन्न झालो आहे. मला सांग संजया, त्या नंतर माझ्या योद्ध्याने काय केले. माझा अजून विश्वास बसत नाही कीं, देवव्रत युद्धात मारले गेले आहेत. ज्याला भार्गवसुद्धा मारू शकत नव्हता त्याला शिखंडीने अर्जुनाच्या मदतीने पदच्युत केले आहे हे माझे कान ऐकण्यास तयार नाहीत.

संजय सांगतो, त्या दहाव्या दिवशी भिष्म मारले गेले त्या वार्तेने पांडवांच्या गोटात समाधान दिसत होते व तुमच्या म्हणजे कौरवांच्या गोटात दुःखाची छाया पसरलेली होती. भिष्म सध्या जमिनीवर त्यांच्या अंगात बाण घुसले आहेत अशा स्थीतीत त्या बाणांच्या शय्येवर पहुडले होते. जेव्हां भिष्म रथातून त्या अवस्थेत खाली पडले तेव्हां सगळी कडून अरेरे, हाय हाय असे आक्रोश ऐकू येत होते. भिष्माच्या मरण्याने क्षत्रिय राजात घबराट पसरली. भिष्माचा झेंडा त्याच्या स्तंभासह खाली पडलेला होता व त्याच्या बाजूलाच ते कोसळलेले होते ते दृष्य भीषण होते. कौरवांच्या खिन्न होण्याला कांहीं मर्यादा राहिली नव्हती. कोणी कांहींबोलत नव्हते. फक्त एकमेकांकडे पहात होते. पुढे काय असा प्रश्न त्यांच्या पुढे होता हे स्पष्ट जाणवत होते. आकाशातील देव ऋषी सुद्धा गुपचुप होते सगळीकडे सुतकाचे वातावरण झाले होते. भिष्म वेदाचे चांगले जाणकार होते, काहीं त्यांच्याबद्दल चांगले बोलत होते तर कांहीं भितीने बोलत नव्हते. आपल्या पित्याला कामरोग झाला तेसमजल्यावर तो त्याचे वीर्य स्तंभन करू लागतो व ब्रह्मचर्य आचरू लागतो. जसे ऋषी व साधक करत असतात. आता तो वीर शांतपणे शरपंजरी निजला होता. ध्यान करत होता त्याच्या अखेरच्या वेळेसाठी.

जसे तुझ्या मुलांना समजले कीं आता भिष्म राहिलेले नाहीत त्यांच्या साठी लढण्याकरता, ते पुढे काय करावे त्याच्या फिकीरीत विचार करत होते. त्यांचा सगळा रुबाब संपला होता. ते निस्तेज झाले होते. ते शरमेने चूर झाले होते कारण ते भिष्माना शेवटच्या क्षणी संरक्षण देऊ शकले

नाहीत. ते एकमेकांना दोष देतांना दिसत होते. त्या उलट पांडवांचे सगळी कडे आनंद व्यक्त करत होते. कांहीं आनंदाने शंखनाद करत होते. त्या दिवसाची युद्धाची वेळ संपली होती पण त्याची वाद्ये वाजवण्यास कोणाला उत्साह नव्हता. त्या ऐवजी पांडवांचे तुताऱ्या, नगारे, शंख जोराजोराने वाजवत होते दाखवण्यासाठी कीं ते त्या दिवशीची लढाऊ जिंकले आहेत. भिमसेन त्या खुषीत आणखीन कांहीं तुमच्या गोटातील योद्धे मारून टाकतो. कौरवांची मनस्थिती कमालीची व्यस्त झाली होती. कर्ण व दुर्योधन जोर जोराने श्वास घेत होते. त्यांना समजत नव्हते आता ह्यापुढे म्हणजे उद्या कसे लढावयाचे. तुमच्या गटातील लोकांना समजत नव्हते आता नवीन सरसेनापती कोण होणार? जेव्हां भिष्म वारले तेव्हां कौरवांपैकी अक दुःशासन त्यांच्या जवळ होता. म्हणून जसा तो तुझ्या मुलांत येतो सगळे त्याच्या भोवती जमा होतात. त्यांनेच प्रथम द्रोणांना सांगितले कीं पितामह राहिले नाहीत. त्यांना अर्जुनाने व शिखंडीने मिळून मारले आहे. ती वार्ता ऐकल्यानंतर ते रथातून बेहोष होऊन खाली पडतात. ताबडतोब ते उठतात. ते त्वरित सांगतात कसेही झाले तरी युद्ध चालू राहिले पाहिजे. त्यातच दुर्योधनाची शान आहे. कौरवांच्या सैन्याने लागलीच युद्धबंदी जाहिर केली व पांडव सुद्धा प्रतिक्रिया स्वरुप युद्ध थांबवतात. सगळे भिष्मांना पहाण्यासाठी गर्दीने त्या जागी जातात जेथे तो महान योद्धा शरपंजरी निजला होता. त्यांच्या बाणाच्या शय्ये भोवती ते सगळे जमा होतात. सगळयांना त्यांच्या बद्दल अतीव आदर असतो पण युद्धात ते एकमेकां विरुद्ध लढत होते. ते दोनही बाजूचे भिष्माना मोठा सलाम करतात. सूर्य क्षितिजा खाली गेला होता.

त्या पांडव आणि कौरवांना पाहून आजोबा त्यांचे कौतुक करत बोलतातकीं, तुम्ही सगळे खूप चांगले योद्धे अहात देवांनासुद्धा हरवू शकाल असे अहात. हे बोलतांना त्यांना त्यांचे मस्तक वर उचलावे लागत होते म्हणून ते त्या कुरु पांडवाना सांगतात की त्याच्या डोक्याखाली उशी ठेवावी. तेथे जमलेल्या राजांनी उत्तम प्रतीची उशी आणून त्यावर भिष्माचे मस्तक ठेवले. परंतु, भिष्माना तू नको होती, ते अर्जुनाकडे पहात बोलतात अरें अर्जुना तू माझ्यासाठी उशी तयार कर. ते ऐकल्यावर जिश्नु काय ते समजतो व त्याच्या धनुष्याला बाण लावून त्या बाणांची उशी तयार करतो. त्या बाणांच्या उशीवर ते त्यांचे मस्तक ठेवतात. त्यामुळें त्यांना सगळयांशी बोलणे सोपे झाले. आजोबा त्या सगळयांना सांगतात, अशी उशी क्षत्रियांसाठी असली पाहिजे.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे सतरावा संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

## भाग एकशे अठरावा

संजय पुढे सांगत असतो, अर्जुन त्याचा बाण धनुष्याला लावतो. सन्मानपूर्वक आजोबाला नमस्कार करतो, त्याचे डोळे अश्रूने भरलेले होते. प्रसंग मोठा करुणामय होता. कित्येक पांडव व कौरव रडत होते. पुढे अर्जुन बोलतो अहो सरसेनापती मला आज्ञा द्या मी आपला सेवक आहे. मी कशाप्रकारे आपल्यासाठी बाणांची गादी करावी ते सांगा. आजोबा त्याला सांगतात, माझे डोके टांगल्यासारखे खाली लोंबत आहे त्याला डोक्याखाली आधार देणारी असली पाहिजे. जर माझा बिछाना बाणांचा आहे तर त्या प्रमाणे माझी उशीसुद्धा बाणांचीच असली पाहिजे. असे मला वाटते. तू एक हुशार दनुर्धारी आहेस, तू क्षत्रियांची कर्तव्ये चांगली जाणतोस. अरे फाल्गनी, त्या प्रमामे माझी बाणांची उशी तयार कर व त्या वर माझे शीर असेल असे पहा. ते ऐकल्यावर गांडीव घेऊन धनंजय मंत्र बोलून तीन बाण असें जमिनीत मारतो कीं त्यांच्या मागे असलेली पिसाची झुबकेदार गादी तयार होते. प्रथम तिरके मारलेले बाण नंतर मारलेल्या बाणांने असे उभे होतात की त्यावर भिष्माचार्यांचे मस्तक व्यवस्थितपणे राहू शकते. तो प्रकार पाहून सगळे अचंबित होतात. ती शराची गादी तयार झाल्यावर त्यावर आपले मस्तक ठेवल्यावर आजोबा मोठ्या खूषीने त्याचे कौतुक करतात. ते अर्जुनाला बोलतात जर त्यांने तशी उशी बनवली नसती तर त्यांनी धनंजयाला शाप दिला असता. खरे क्षत्रिय युद्धभूमीवर अशा शरपंजरी झोपले पाहिजेत. ते झाल्यावर आजोबा इतरांना बोलतात, "पहा पंडुच्या मुलांनी माझ्यासाठी केली आहे. ह्या बिछान्यावर मी उत्तरायण येई पर्यंत ध्यानस्थ रहाणार आहे जसे ऋषीमुनी तपस्या करतात. त्या काळापर्यंत मी असाच पडून रहाणार आहे असे तुम्ही राजे पहाल. जेव्हां उत्तरायणात सूर्य वैश्रावणाला मिळेल तेव्हां मी माझ्या जीवाचा अंत करून जाईन. जसे एक मित्र (जीव) दुसऱ्या मित्राचा (आत्मा) त्याग करून जातो. माझ्या ह्या शरपंजरी भोवती एक विस्तीर्ण खंदक करा. अशा स्थितीत मी बाणांचे अर्घ्य देणार आहे. आता माझे ऐका मुलांनो, वैर सोडून द्या. लढई बंद करा".

संजय पुढे सांगतो. त्यानंतर कांही वैद्य तेथे आले. ते त्यांच्या अंगात घुसलेले बाण काढतात. त्या वैद्यांना पाहून भिष्म सांगतो त्यांना त्यांचे पैसे द्या व दानं सुद्धा करा. आता मला त्यांची गरज नाही. मी क्षत्रियांचा सर्वात श्रेष्ठ दर्जा मिळवला आहे. म्हणून आता मला वैद्यांची आवश्यकता नाही. तेथे जमलेले राजे नवल करतात. ते ऐकल्यावर दुर्योधन त्या वैद्यांना सन्मानपूर्वकपणे परत पाठवतो. त्या नंतर कौरव आणि पांडव एकत्र येतात व भिष्मांच्या पाया पडतात. त्यांना प्रथेनुसार

तीनदा प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर त्यांच्या संरक्षणासाठी पहारेकरी ठेवले जातात. त्यांचे शरीर रक्ताने माखलेले होते. त्यानंतर सगळे योद्धे आपापल्या तंबूकडे जातात. त्या नंतर वेळ पाहून माधव पांडवांना बोलतो, "जेव्हां सगळे पांडव भिष्माच्या पराजयामुळें खूष झालेले दिसत होते, युधिष्ठीरा, सुदैवाने आजचा विजय तुमचा झाला. सुदैवाने भिष्म संपले. कदाचित भाग्य असे की, एवठा मोठा योद्धा तुमच्या विरुद्ध लढत होता हे माहीत असूनही कीं, तू निव्वळ नजरेने शत्रूचा नाश करू शकतोस आणि तेंच झाले आज". ते ऐकल्यावर युधिष्ठीर कृष्णाला बोलतो, "तुझ्या कृपेमुळे विजय मिळाला आहे. तुझा क्रोझ म्हमजे पराभव असें असते हे मी जाणतो. ज्यांना तुझे संरक्षण असते ते नेहमी यशस्वी होतात. ते ऐकल्यावर जनार्दन स्मित करत बोलतात, असें तूंच केवळ बोलतोस.

युद्धाचा दहावा दिवस भाग एकशे अठरावा संपला.

# युद्धाचा दहावा दिवस

# भाग एकशे एकोणीस

# भिष्म शरपंजरी झोपतात

संजय पुढे सांगतात, रात्र संपल्यावर म्हणजे अकाराव्या दिवशी सगळे पांडव आणि धृतराष्ट्राचे आजोबांच्या शरपंजरी जातात. ते क्षत्रिय तेथे त्यांच्या महान क्षत्रियाला सलाम करतात. ते तेथे शांतपणे उभे रहातात. हजारांनी कुमारीका भिष्माच्या शरीरावर चंदनाचे गंध शिंपडतात. भाजलेले तांदळाचे तुरे (अक्षदा),विविध प्रकारची फुलं, त्यांच्या शरीरावर सोडतात. त्यांना हार हालतात. त्यांच्या नंतर अनेक कलाकार, विदूषक, कारागिर, तेथे जातात व त्यांना अभिवादन करतात. धुःख व्यक्त करणारी धीरगंभीर धून वाजत असते. त्या दिवशी युद्ध न होण्याचा निर्णय दोनही बाजजूमनी केला जातो त्याप्रमाणे ते क्षत्रिय आपापली शस्त्रास्त्रे बाजूला ठेवून भिष्माना नमस्कार करत असतात. एका ओळीत ते सगळे पुढे सरकत असतात. आपल्यातील वैरभाव बाजूला ठेवून ते एकमेकांशी सलोख्याने गप्पा मारत असतात. वातावरण फार शांत होते. युद्धाचा मागमूस नव्हता. भिष्म त्या परिस्थितीत तेजस्वी दिसत होते. तेथे जमलेले राजे देवांसारखे वाटत होते. भिष्म त्यांच्या अंगात रुतलेल्या बाणांच्या जखमामुळे वेदना होत असतांना सुद्धा शांत दिसत होते. तेथे जमलेल्या राजांकडे ते पहात होते. ते राजे उत्तमोत्तम पेये त्यांच्यासाठी देत होते. ते त्यांना ती औषधीयुक्त पेये पाजत होते. कांहीं त्याना पिण्यासाठी पाणी देतात. तेव्हां आजोबा त्यांना बोलतात, मी ह्यापुढे माणसांच्या भोगात रमणार नाही. मी माणसांच्या अवस्थेतून बाहेर पडलो आहे. मी ह्या शरपंजरावर निजलो आहे, ते त्या उत्तरायणाच्या प्रतिक्षेत. त्यानंतर ते अर्जुनाची आठवण करतात. ताबडतोब अर्जुन हजर होतो हात जोडून उभा रहातो आजोबांच्या समोर. तो नम्रपणे त्यांना विचारतो, "आज्ञा करा पितामह". त्याला पाहून भिष्म आनंदीत होतात व त्या उद्देशून बोलतात, "मी तुझ्या बाणाने भरलेला आहे. माझे शरीर त्या जखमांमुळें जळत आहे. माझ्या अंगाचे सगळे अवयव वेदनांनी जळजळत आहेत. माझे तोंड सुकलेले आहे. अर्जुना तू एक महान योद्धा आहेस, तेव्हां तू मला पाणी पाज. अर्जुन आज्ञा प्रमाण असे बोलून त्याच्या रथात चढतो व हातात गांडीव घेतो. त्याला बाण लावून त्याची दोर खेचतो. त्याचा टणत्कार काढतो. तेथे जमलेले राजे ते पहात रहातात. त्यांच्या मनांत भिती उत्पन्न होते. अर्जुन त्याच्या रथाने भिष्माच्या शय्येला प्रबक्षिणा घालतो. मंत्र बोलत बाणाचा नेम धरतो व पर्जन्य अस्त्रं फेकतो. ते सगळे तेथे जमलेल्या लोकांच्या समक्ष होत असते. अर्जुन त्याचा बाण भिष्म झोपले होते त्यांच्या दक्षिणेस जमिनीत मारतो. त्या बरोबर त्या मातीतून एक थंड पाण्याची कारंजी उडू लागते अशी

कीं तिची धार भिष्मांच्या तोंडात पडू लागते. तो चमत्कार पाहून तेथे जमलेले नवल करत होते. त्या पाण्याची चव अमृतासारखी होती. त्या पाण्याच्या फवाऱ्याने भिष्माचे जखमी रक्ताने भरलेले शरीर न्हाऊन निघत होते. त्यांमुळें त्यांना सतत आराम मिळत होता. ते पाणी सामान्य नव्हते. तो फवारा सतत तसांच रहाणार होता ज्यामुळें भिष्मांना आराम मिळणार होता. विभत्सूची ती करामत पाहून कौरवांच्या अंगाला कापरे भरले. सर्वांनी त्यांचे शेले हवेत उडवून अर्जुनाला अभिवादन केले. तेथे जमलेल्या महिला आनंदाने गजर करतात, शंखनाद होतात. नगारे वाजू लागतात, तुताऱ्या वाजू लागतात.

भिष्म ते पाणी पिऊन तृप्त होतात व त्याला बोलतात, "मला ह्याबद्दल नारद मागे एकदा बोलले होते. वासुदेव तुझा साथी आहे, त्यामुळें तू पुढे असें कांहीं करू शकशिल ते इंद्रसुद्धा कधी करू शकणार नाही. ज्यांना ज्ञान आहे ते सगळे समजतात कीं, तू सगळ्या भ्रष्ट क्षत्रियांचा नाश करण्यासाठी आला आहेस. तू धनुर्धाऱ्यात श्रेष्ठ आहेस. माणसात तू श्रेष्ठ आहेस जसे पक्षात गरुड आहे. सर्व जलाशयात समुद्र श्रेष्ठ, सर्व ताऱ्यात सूर्य श्रेष्ठ, तसा तू पुरूषात सर्वश्रेष्ठ आहेस".

दुर्योधन ते ऐकत असतो. भिष्म पुढे बोलतात जे सगळे ऐकत असतात, धृतराष्ट्राचा मुलगा मी, विदूर, भार्गव, जनार्दन असे सगळे पुनः पुनः सांगत असतांना ऐकत नव्हता. त्यामुळे पुढे तो कायमचा नष्ट होणार आहे हे निश्चीत. भिम त्याला ठार मारणार आहे". ते आजोबांचे उद्गार ऐकून दुर्योधन बेचैन होतो. दुर्योधनाकडे पहात ते पुढे बोलतात, "क्रोध टाकून दे, शांत हो, पार्थाची करामत पाहिली आहेस, असे कोणीही करू शकणार नाही. अग्नी, वरूण, सोम, वायू, विष्णू, इंद्र, प्रजापती, परमेस्थी, यम अशांची सगळी आयुध त्याच्याकडे आहेत अशापुढे तू काय टिकणार"?

त्याशिवाय प्रजापती, धात्री, तश्त्री, सावित्री, विवस्वात, हे सगळे अर्जुनाचे आहेत. त्याशिवाय कृष्ण त्यांचा साथी आहे. त्याला हरवणे कोणालाही शक्य नसते हे समजून तू त्यांच्याशी सलोखा करावा असें मला सांगावयाचे आहे. युद्धा हा मार्ग नाही. म्हणून शातता आण. तू युद्ध आणले आहेस म्हणून तूंच ते बंद केले पाहिजेस. जोवर तुझे सगे बंधू अजून जीवंत आहेत तोवर तू शांतता करार कर पांडवांशी. युधिष्ठीराची दिव्य दृष्टी तुमचा नाश करू शकते हे लक्षात ठेव. जेवर भिम नकूल व सहदेव तुझ्या भावंडांचा नाश करत नाहीत तोपर्यंत शांतता आण. पांडवांशी सलेखा करण्यातच तुझे हित आहे. हे युद्ध ताबडतोब थांबव. त्यातच सगळयांचे भले आहे. माझ्या जाण्यानंतर तरी शांतता प्रस्थापित कर असे मी तुला सांगत आहे. उरलेल्या क्षत्रियांना जगू दे. युधिष्ठीराला त्याचे इंद्रप्रस्थ सन्मान पूर्वकपणे देऊन टाक. तुझ्या नीचपणाची

हद्द झाली आहे. वैर विसरून एकत्र या त्यात कुरु घराण्याचे भले आहे, माझे म्हणणे मान त्यात तुझ्या भावंडांचे भले आहे". असे गंगापुत्र दुर्योधनाला सांगत असतात. भिष्म वेदनांनी बेचैन धाले होते त्यावेळी ते ध्यानसाधना करू लागतात. संजय पुढे सांगतो, भिष्माचे ते शहाणपणाचे सांगणे तुमच्या मुलाने मानले नाही.

युद्धाचा अकरावा दिवस भाग एकशे एकोणीस संपला.

# युद्धाचा अकरावा दिवस

# भाग एकसे वीस

# सगळे भिष्माना भेटतात

संजय पुढे सांगत असतात, भिष्म त्यानंतर शांत होतात. जमलेले सगळे राजे आपापल्या निवासस्थानी जातात. भिष्माचा अंत झाला हे समजल्यावर राधासुत घाबरलेल्या स्थितीत भिष्मांच्या स्थानी जातो. तो त्या महान शूराला बाणांच्या बिछाईतीवर झोपलेले पहातो. दुर्योधनाकडे जातो. तेथे जवळ जाऊन गहिवरलेल्या अवस्थेत त्यांना पहातो. ते डोळे मिटलेले पहातो, त्यांच्या पाया पडतो. बोलतो, "अहो कुरु घराचे वरिष्ठ मी राधाचा मुलगा आलो आहे. तुम्ही नेहमी माझी हेटाळणी केली आहे". ते ऐकल्यावर भिष्म ज्यांचे डोळे झाकलेले होते त्यांच्या भोवती असलेल्या पहारेकऱ्यांना दूर जाण्यास सांगतात. त्यानंतर ते करण्णाला त्याना मिठी मारण्यासाठी सांगतात. ते तसे कांहीं करण्याच्या स्थितीत नव्हते. ते असे होत होते जसे पितामह आपल्या नातवाला जवळ घेत आहेत. त्यानंतर त्याला बोलतात, "ये मुला ये, तू माझी प्रतिस्पर्धी होतास, नेहमी माझ्याशी तुलना करत होतास, जर तू आता माझ्याकडे आला नसतास तर ते तुझ्यासाठी चांगले झाले नसते. तू कुंतीचा मुलगा आहेस, राधाचा नाहीस हे लक्षात घे. तो अधिरथ तुझा पितासुद्धा नाही. तुझा पिता आहे सूर्यदेव. तुझ्या बद्दल मी नारदा कडून व कृष्णद्वैपायनां कडून ऐकले आहे. ते खोटे असणार नाही. मी हे तुला खरे तेंच सांगत आहे. तू एक चांगला व्रतस्थ जीवन जगणारा असून विनाकारण पांडवांच्या बद्दल द्वेष बाळगत असतोस. तुझा जन्म पापमार्गाने झाला आहे. त्यामुळे तुझ्या मनात खोट असते. अहंकाक व दुर्जन संगती ह्यांमुळे तुझा वाणी सुद्धा बिघडलेली असते. त्यासाठी मी तुला नेहमी समज देण्यासाठी रागे भरत असे, त्याचा तू चुकीचा अर्थ काढत असें. तुझे युद्ध सामर्थ्य चांगले आहे, फार थोडे लोक असे योद्धे होतात. तू ब्रह्मणांचा किती आदर करतोस ते मी जाणून आहे. तुझी दानशूरता मी जाणतो. तुझे युद्ध कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. एका परीने तू अर्जुनासारखाच आहेस. मला आढवते तू हातात धनुष्य बाण घेऊन काशालागेला होतास कौरवांसाठी पत्नी आणण्यासाठी तेव्हां तू सगळ्या राजांचा पराभव केलास ज्यात बलाढ्य जरासंध सुद्धा होता हे मी जाणतो. तुझा ब्राह्मणांबद्दलचा जिव्हाळा मी जाणतो. मला माहीत आहे कीं, तुझी युद्ध कला निर्दोष असते. माझ्या मनातील राग धोरणात्मक होता, त्यात पापबुद्धी नव्हती. तुला सुधारण्यासाठी ते सोंग मी घेत असे. कारण जर तू सुधारला असतास तर आता आहेस त्यापेक्षा जास्त मोठा झाला असतास. कर्माने आपण आपले

भाग्य बदलू शकत नाही. पांडव तुझे मातृत्वे बंधू आहेत. जसे ते एकमेकांचे आहेत. मला वाटते तू माझे मानवशिल, तुझ्या भावांत जा. तेथे तुझे बाग्य वाट पहात आहे. पण जर तू हट्टीने कौरवांबरोबर राहिलास तर मारला जाशिल. पांडवांचा द्वेष करणे सोडून दे. माझा द्वेष करणे सोडून दे. त्यामुळे पृथ्वीवरील सगळे राजे सुखी होतील".

कर्ण भिष्माला सांगतो, "अहो पितामह, तुम्ही जे सांगता ते सगळे मला आधीपासून ठाऊक आहे. परंतु, मला कुंतीने टाकले होते. माझी देखभाल सुतानी केली. मी दुर्योधनाबरोबर संपत्तीचा भोग घेत आहे. त्याने माझ्याकरता खूप कांहीं केले आहे, त्याची उतराई करणे माझे कर्तव्य आहे. माझी सगळी खानदान सुत कुळीन आहे. मी दुर्योधनासाठी माझे सगळे देण्यास तयार आहे इतके त्याचे माझ्यावर उपकार आहेत. क्षत्रियांचा मृत्यू युद्धभूमीवरच झाला पाहिजे हे आपण जाणता. दुर्योधनास खूष करण्यासाठी मी माझ्या भावंडांचा, पांडवांचा द्वेष केला हे मी मान्य करतो. ते माझी नियति आहे, त्यात कांहीं बदल करणे मला शक्य नाही. आम्हाला माहित आहे कीं, कृष्ण व अर्जुन ह्यांना कोणीही हरवू शकणार नाही, तरी आम्ही युद्ध करण्याचे ठरवले हे आमचे दुर्भाग्य समजले पाहिजे. तरी ते आम्ही बदलू शकणार नाही. आता परिस्थिती अशी आहे कीं, मी पांडवांचा द्वेष करणे थांबवू शकणार नाही. त्यासाठी मी माझ्या क्षत्रिय व्रतानुसार अर्जुनाशी लढणार आहे ह्यापुढे. तो माझी निश्चय आहे, मला परवानगी द्यावीत. मी जे अपशब्द तुमच्या बद्दव वापरले असतीव त्यासाठी मला क्षमा करावी आपण. तो माझी मूर्खपणा होता असे समजून मला समजून घ्या".

भिष्म ते ऐकल्यावर त्याला बोलतात, "खरे आहे आता ह्या परिस्थीतीत तो द्वेष तू संपवू शकत नाहीस. मी तुला आज्ञा करतो, कर्णा लढ अर्जुनाशी भरपूर लढ, तुझ्या क्षात्र कर्मात ते बरोबर बसते. परंतु, चांगुलपणा सोडू नकोस. चांगुलपणात राहून क्षात्र धर्म सांभाळ त्यातच तुझे भले आहे. मी कौरव व पांडवांत सलोखा आणण्याचा प्रयत्न केला पण नियतिला ते मजूंर नाही. तुझे कर्म धर्माला धरून पार पाड".

संजय पुढे सांगतो, भिष्माचे ते बोलणे ऐकल्यावर कर्ण उठतो, त्याना एक मोठा सलाम ठोकतो व आपल्या रथात बसून तुझ्या मुलाकडे निघतो.

## - भिष्मपर्व भाग तिसरा संपला –

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे

त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबऱ्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले

आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बऱ्याच गटांना आवडत नाही. बऱ्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

**ई साहित्य प्रतिष्ठान -**

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा.

हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद